सोलापूर तरुण भारत
आसमंत



# उध्वस्त शेजारी आणि भारतापुढील आव्हाने

**लक्ष्यवेध**
**प्रतिनिधी**

**बांगलादेशातील राजकीय अस्थिरतेमुळे देश पुन्हा एकदा कट्टरतावाद्यांच्या हाती जात आहे. या पार्श्वभूमीवर भारतासही नव्या आव्हानांचा सामना करण्यासाठी सावध राहणे आवश्यक बनले आहे. बांगलादेशमध्ये आरक्षणाविरोधात पेटलेल्या आंदोलनाची परिणती शेख हसीना यांचा पंतप्रधानपदाचा राजीनामा आणि देश सोडण्यात झाली आहे. त्यामुळे त्या आंदोलनाच्या नेमक्या मनसुब्याविषयीही आता शंका निर्माण झाली आहे. बांगलादेशचे भुराजकीय स्थान पाहता हा देश अस्थिर राहण्यात जगातील अनेकांचा स्वार्थही आहेच.**

सध्या भारतात असलेल्या शेख हसीनादेखील लवकरच अन्यत्र राजकीय आश्रय घेतील. मात्र, त्यानंतर बांगलादेशमध्ये स्थापन होणार्या सरकारकडे भारतास बारकाईन लक्ष ठेवावे लागणार आहे. बांगलादेशला स्वातंत्र्य मिळवून देण्यात भारताचा सिंहाचा वाटा होता. भारताने १९७१ साली वंगबंधू शेख मुजीबुर रहमान यांच्यासोबत भारताचे सलोख्याचे संबंध होते. त्यानंतरही अपवाद वगळता दोन्ही देशांची मैत्री जवळपास ५० वर्षे जुनी आहे. मात्र, आता शेख हसीना यांनी सत्ता सोडताच बांगलादेश उध्वस्ततेच्या वाटेवर जात आहे. त्यामुळे दोन्ही देशांमधील संबंध आगामी काळात कसे असतील, बांगलादेशच्या नव्या सरकारचा कल नेमका कोठे असेल ही आणि अशी काही आव्हाने भारतासमोर निर्माण होऊ शकतात.

बलशाली भारत हा जगात कोणालाच नको आहे. आपल्या शेजाऱ्यांना तर मुळीच नको आहे. या शेजारी देशांवर नैसर्गिक किंवा मानवी आपदा येते, तेव्हा हे देश मदतीसाठी आपला हात सर्वप्रथम भारतापुढेच पसरतात. पण, भारत विकसित किंवा शक्तिशाली बनता कामा नये, ही या देशांच्या नेत्यांची आंतरिक मनोकामना आहे. त्यामुळे संधी मिळेल, तेव्हा हे देश भारतविरोधी भूमिका घेतात किंवा भारताच्या शत्रूशी करार करतात. नेपाळमध्ये भूकंप झाल्यावर सर्वाधिक आणि सर्वप्रथम मदत भारतानेच केली होती.

नेपाळच कशाला, अगदी अफगाणिस्तान, तुर्कीये किंवा सीरिया यांसारख्या देशांनाही भूकंपाच्या आपत्तीत भारतानेच मोठी मदत पाठविली होती. चार वर्षांपूर्वी श्रीलंका दिवाळखोर बनली होती आणि त्या देशात सध्याच्या बांगलादेशासारखीच अराजकसदृश स्थिती होती. तत्कालीन अध्यक्ष राजेपक्षे देश सोडून पळून गेले होते. तेव्हा अब्जावधी डॉलर्सची मदत भारतानेच केली. त्यामुळेच श्रीलंका आज सावरला असून आर्थिक गर्तेतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत आहे. पण, याच श्रीलंकेने चीनला आपले हंबनटोटा हे बंदर दीर्घकालीन भाडेपट्ट्याने दिले असून तेथे चीनने नाविक तळ उभारला आहे. भारताचा सर्वात मोठा आणि प्रबळ शत्रू चीन असून त्याने भारताची जागतिक स्तरावर नाकेबंदी करण्याचे धोरण आखले आहे. त्यानुसार भारताच्या सर्व शेजारी राष्ट्रांमध्ये भारतविरोधी राजवटी प्रस्थापित करणे हे त्याचे ध्येय आहे. त्यात तो बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाला आहे.

या सर्व शेजारी देशांमध्ये बांगलादेश हाच भारताचा सर्वात जवळचा मित्रदेश बनला होता. त्यामागे शेख हसीना यांच्या सरकारचे धोरण कारणीभूत होते. त्यांनी बांगलादेशातील कट्टरपंथीयांना आटोक्यात ठेवले होते आणि भारतविरोधी गटांच्या मुसक्या आवळल्या होत्या. त्यांनी चीनलाही फारसे महत्त्व दिले नव्हते. अर्थात, त्या देशातील लोकशाही व्यवस्था ही यथातथाच होती. त्यामुळे त्यांच्या विरोधात असंतोष पसरविण्याचा कट आखला गेला आणि तेथे अराजक निर्माण करण्यात आले. त्यामागे केवळ चीनच असेल, असे नव्हे, तर अमेरिकेचाही काही प्रमाणात हात असू शकतो, असे सांगितले जाते. बांगलादेश कट्टरपंथीयांच्या हाती जात असल्याने आता भारतासमोर असणारी आव्हाने वाढणार आहेत. सर्वात महत्त्वाचे आव्हान असणार आहे ते घुसखोरीचे. भारत आणि बांगलादेशदरम्यान जवळपास ५ हजार किमी लांबीची आंतरराष्ट्रीय सीमा आहे. भारतातील पश्चिम बंगाल, आसाम, मेघालय, मिझोराम आणि त्रिपुरा या राज्यांशी ही सीमा जोडलेली आहे. हा सीमेवर घुसखोरी, अंमली पदार्थांची तस्करी, मानवी तस्करी, गुरांची तस्करी आणि दहशतवाद अशा अनेक समस्या आहेत. बांगलादेशातील अस्थिर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर बीएसएफचे सीमेवर बारकाईने लक्ष आहे. त्याच बरोबर बांगलादेशातील हिंदूंसह अल्पसंख्यांकांवरील हल्ले थांबविणे हे देखील भारतासमोरील आव्हान आहे.

बांगलादेशातील अल्पसंख्यांकांवर, प्रामुख्याने हिंदूंवर तेथे मोठ्या प्रमाणात अत्याचार होत आहेत. गेल्या काही दिवसात तेथील हिंदू समाज, मंदिरे, घरे आणि व्यवसायांवर मोठ्या प्रमाणात हल्ले झाले आहेत. त्याचप्रमाणे शिक्षण, व्यवसायासह अन्य कारणांसाठी तेथे गेलेल्या भारतीयांचीही काळजी केंद्र सरकारला घ्यावी लागणार आहे. तसेच चीन आणि पाकिस्तानचा डाव उथळणे हे देखील महत्तत्त्वाचे आव्हाने आहे. चीन आणि पाकिस्तान या भारताच्या दोन त्रासदायक शेजाऱ्यांचाही हुरूप वाढण्याची शक्यता आहे.

बांगलादेशात आता लष्कर, जमात ए इस्लामी हा राजकीय पक्ष आणि चीन-पाकधार्जिण्या खालिदा झिया हे घटक पुन्हा केंद्रस्थानी आले आहेत. त्यामुळे बांगलादेशातील नव्या सरकारचा कल नेमका कसा असेल, हे भारतासाठी महत्त्वाचे असेल. त्याचबरोबर व्यापारी संमंध टिकविण्याचे आव्हान असणार आहे.

भारत बांगलादेशला कांदा तसेच वीज, कृषी आणि औद्योगिक उपकरणे आणि पेट्रोलियम उत्पादनांसह आवश्यक अन्नपदार्थांची निर्यात करतो. शेख हसीना यांचे सरकार गेल्यानंतर या निर्यात बाजाराला आता अनिश्चिततेने घेरले जाऊ शकते. दोन्ही देशांमध्ये सुमारे १२.९ अब्ज डॉलर्सचा व्यापार आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात ११ अब्ज डॉलर्ससह बांगलादेश भारताचा आठवा सर्वात मोठा निर्यातदार भागीदार आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारताने बांगलादेशात मोठी आर्थिक गुंतवणूक केलेली आहे.

भारताने बांगलादेशमध्ये मोठी गुंतवणूक केली आहे. देशातील सध्याच्या परिस्थितीचा परिणाम तेथे सुरू असलेल्या प्रकल्पांवरही होण्याची भीती आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांसमोर मोठा धोका निर्माण झाला आहे. दोन्ही देशांच्या चांगल्या संबंधांमुळे गेल्या काही वर्षांत अनेक बड्या भारतीय कंपन्यांनी बांगलादेशमध्ये मोठी गुंतवणूक केली आहे. भारतीय कंपन्यांनी तेथे ऊर्जा, वस्त्रोद्योग, औषधनिर्माण यांसारख्या क्षेत्रात गुंतवणूक केली आहे. बांगलादेशातील बदलत्या राजकीय वातावरणाचा भारतावर कितपत परिनाम होणार हे येणारा काळच सांगणार असला तरी भारतानेही सर्व तयारी केलेली आहे.

भारताकडून मदत तर सर्वच शेजारी देशांना हवी आहे, पण भारत जागतिक स्तरावर बलशाली झालेला या देशांना पाहवत नाही. त्यातच चीनने भारताच्या सर्व शेजारी देशांमध्ये भारतविरोधी राजवटी प्रस्थापित करण्याचा डाव आखला असून, त्यात तो बर्याच प्रमाणात यशस्वीही झाला आहे. परिणामी, भारताने आपली खरी ताकद दाखविण्याची वेळ आली आहे.

# संघाविषयी ‘फेक नॅरेटिव्ह’तून अपप्रचार आणि वास्तवदर्शन

**वेधक**
**पंकज जयस्वाल**

**आजच नाही, तर अगदी प्रारंभीपासून अपप्रचाराविरुद्धची लढाई राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने अगदी नेटाने लढली. गांधीहत्येच्या बेछूट आरोपांपासून ते संघबंदीच्या संकटातूनही संघ अगदी तावूनसुलाखून निघाला. वर्तमानातही संघावर असेच अपप्रचाराचे काळे ढग अधूनमधून घोंगावत असतात. अशाच काही संघाविषयीच्या ‘फेक नॅरेटिव्ह’चा पर्दाफाश करणारा हा लेख...**

फ्रान्स आणि इंग्लंडचे निवडणूक निकाल एकप्रकारे ‘फेक नॅरेटिव्ह’ची शक्ती आणि डाव्या-इस्लामी इकोसिस्टीमचे आर्थिक वर्चस्वही दर्शवतात. ही व्यवस्था स्वार्थी आणि अनैतिक हेतूने जगावर राज्य करू पाहते. पंतप्रधान मोदींना पराभूत करण्यासाठी त्यांनी भारतीय निवडणुकांमध्ये हेच डावपेच वापरले. ज्यांना दणदणीत विजयाची अपेक्षा होती, त्यांच्यासाठी ही मोठी निराशा असली, तरी अखेर सरकार स्थापन झाले. आज जेव्हा आपण जागतिक परिस्थिती पाहतो, तेव्हा मोदींनी तिसर्यांदा पंतप्रधान होणे, हा डाव्या-इस्लामी व्यवस्थेला मोठा धक्का आहे. पंतप्रधान मोदींचा २४० जागांवर विजय हिंदू समर्थक आणि विरोधी पक्ष पराभव म्हणून पाहत आहेत. त्यामुळे भाजपचा आकडा का घसरला, याचे विश्लेषण अजूनही सुरू आहे.

विरोधी पक्षांनी मते मिळवण्यासाठी जातीच्या आधारावर हिंदूंमध्ये फूट पाडण्याचा घाणेरडा खेळ यशस्वीपणे खेळला आणि आता निवडणुकीनंतर त्यांनी वेगवेगळ्या हिंदूंच्या विचारप्रक्रियेचे विश्लेषण करून हिंदू एकात्मता आणखीनच कमकुवत करणारी आणखी काही खोटी विधाने, विमर्श मांडले आहेत. कोणत्याही तथ्याधारित तपासाशिवाय तथाकथित हिंदू राष्ट्रवादी काही प्रसारमाध्यमांनी आणि विरोधी गटांनी मांडलेल्या खोट्या कथनांवर विश्वासही ठेवू लागले. सर्वात खेदजनक बाब म्हणजे, ते भाजपच्या खराब कामगिरीसाठी १९२५ सालापासून ‘राष्ट्र प्रथम’ या दृष्टिकोनातून हिंदू एकात्मतेसाठी काम करणाऱ्या संघटनेवर टीका करत आहेत आणि दोष देत आहेत. खाली दिलेले काही खोटे विमर्श समाजात मुद्दाम पेरले जात आहेत. त्याचा समाचार घेणे म्हणूनच गरजेचे.

**फेक नॅरेटिव्ह क्र. १. रा. स्व. संघाचे दोन प्रकार आहेत -** भागवत संघ आणि मोदी संघ. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही एक विचारधारा आहे आणि सर्व स्वयंसेवकांना इथे एक व्यक्ती मानले जाते. लाखोस्वयंसेवक मूलतः वेगवेगळ्या शरीरात, पण एकच मन म्हणून समाजात कार्यरत असतात. मला खात्री आहे की, कोणत्याही संघटनेची एकसंध विचारधारानाही, जी व्यक्तिपरत्वे बदलत नाही. परंतु, संघात संघसंस्थापकापासून ते प्रत्येक स्वयंसेवकापर्यंत सर्वांची विचारसरणी सारखीच आहे. संघ देशासाठी जगतो आणि मरतो. संघामध्ये कोणत्याही व्यक्तीची पूजा केली जात नाही. ही मातृभूमी भारतमाता आहे, ज्याची स्वयंसेवक पूजा करतात. गुरुतत्व हा भगवा ध्वज आहे, देशाच्या सांस्कृतिक वारशाचे प्रतीक आहे आणि म्हणून तो गुरुसारखाच प्रेरणादायी आहे.

स्वार्थी, लोभी आणि हिंदुत्वद्वेष्ट्यांमध्ये एक गोष्ट सामाईक आहे. ते सरसंघचालकजींचे शब्द बदलून त्यांना एखाद्या विशिष्ट समुदायाविरुद्ध, धर्माविरुद्ध किंवा अलीकडे पंतप्रधान मोदींच्या विरोधात दर्शविण्याचे नाहक उद्योग करतात. निवडणूक निकालानंतर हिंदुत्ववादी शक्तींना एकाकी पाडणे, हा द्वेष करणाऱ्यांचा मुख्य उद्देश आहे. तथापि, समस्या अशी आहे की, अनेक हिंदू राष्ट्रवादी जे पंतप्रधान मोदींचे समर्थक आहेत, ते अचूक माहिती मिळविण्याचा प्रयत्न न करता, सरसंघचालक आणि संघाला लक्ष्य करत आहेत. असेच एक उदाहरण डॉ. मोहनजी भागवत यांनी ग्रामीण विकास कार्यक्रमात मानवाच्या आध्यात्मिक प्रगती किंवा विकासाविषयी सांगितले. या भाषणाचा पंतप्रधान मोदींशी काहीही संबंध नव्हता. परंतु, माध्यमांनी या वस्तुस्थितीचा विपर्यास करण्यासाठी मोहनजींच्या भाषणातील दोन-तीन ओळी घेतल्या, ज्यामुळे पंतप्रधान मोदींच्या समर्थकांमध्ये संतापाची भावना निर्माण होईल आणि तसेच घडले.

वस्तुस्थिती जाणून न घेता, अनेक हिंदू राष्ट्रवाद्यांनी विविध ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर सरसंघचालकांचा अपमान करण्यास सुरुवात केली. हिंदुत्व किंवा पंतप्रधान मोदींवरील प्रेम हे वाखाणण्याजोगे आहे, पण काही माध्यमांच्या आणि विरोधकांच्या सापळ्यात अडकून आणि हिंदू शक्तींमध्ये फूट पाडण्यासाठी तयार केलेल्या अशा खोट्या विमर्शांवर घाईघाईने प्रतिक्रिया देण्याऐवजी, आपण जर खरे हिंदू राष्ट्रवादी असू, तर अगोदर सखोल अभ्यास महत्त्वाचा आहे आणि मग त्यानुसार प्रतिक्रिया द्या. लक्षात ठेवा, द्वेष करणाऱ्यांकडे गमावण्यासारखे काही नाही, पण हिंदू हजार वर्षांहून अधिक काळ गमावतच आला आहे. जयप्रकाश नारायण संघाबद्दल म्हणाले होते की, संघ ही क्रांतिकारी संघटना आहे. देशातील इतर संस्था, संघटना याच्या जवळपासही फिरकू शकत नाही. संघातच समाजपरिवर्तनाची, जातीवाददूर करण्याची आणि गरिबांच्या डोळ्यांतील अश्रू पुसण्याची क्षमता आहे.



**फेक नॅरेटिव्ह क्र. २. टीम मोदीच्या खराब कामगिरीला संघ जबाबदार-** लोकसभा निवडणुकीत ग्रामीण आणि गरीब मतदारांना फसवण्यासाठी विरोधी पक्षांनी मोठ्या प्रमाणात बनावट आणि खोट्या लघु चित्रपटांचा वापर केला. संविधान आणि आरक्षणाबाबत असाच एक खोटा व्हिडिओ सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या नावाने मोठ्या प्रमाणात प्रसारित करण्यात आला. हा व्हिडिओ त्यांच्या निदर्शनास आणून दिल्यावर त्यांनी याला आव्हान दिले आणि दावा केला की, तो खोटा आहे आणि आपण कधीही संविधान किंवा आरक्षणाविरोधात असं काहीही बोललो नाही. संघाचे स्वयंसेवक सातत्याने संविधानावर विश्वास ठेवतात आणि त्याचे पालनही करतात. रा. स्व. संघ ही संघटना ‘मूक पालक’ म्हणून नित्य कार्य करत आहे, जी समाजात वावरून समाजासाठी शांतपणे काम करण्यावर विश्वास ठेवते. त्यामुळे मूक व्यक्ती किंवा संघटनेवर चिखलफेक करणे तुलनेने सोपे आहे. परिणामी, काही स्वयंभू हिंदू राष्ट्रवादी आणि प्रसारमाध्यमांनी संघाला दोष देण्यास सुरुवात केली. कारण काँग्रेस, डावे आणि इतर विरोधी पक्ष हे वास्तव स्वीकारण्यास असमर्थ आहेत की देशात अशी संघटना आहे, जी केवळ राष्ट्राचा सकारात्मक विचार करते आणि आपल्या नागरिकांच्या वैयक्तिक आणि राष्ट्रीय चारित्र्याचा विकास करण्यास तसेच राष्ट्रीय एकात्मतेसाठी मदत करते. देशाला जेव्हा गरज असते किंवा नैसर्गिक आपत्तींच्या काळात स्वयंसेवक धावून जातात. संघाचे एकच काम आहे, राष्ट्राच्या हितासाठी विचार करणे आणि कृती करणे. हजारो लोक प्रचारक म्हणून आजही कार्यरत आहेत, जे त्यागाचे जीवन जगतात आणि त्यांच्या जीवनाचे एकमेव ध्येय राष्ट्रसेवा आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ नैसर्गिक आपत्तींवेळी जात, धर्म, रंग किंवा पंथ यांचा कदापि विचार न करता, लोकांना मदत आणि समर्थन करण्यासाठी उपलब्ध असतो. चीन आणि पाकिस्तानविरुद्धची युद्धे, तत्कालीन पंतप्रधान (पान ४ वर)

# संरक्षण विभागासाठी ६.२ लाख कोटींची तरतूद

राष्ट्ररक्षा
ब्रि. हेमंत महाजन
भ्र. ९०९६७०१२५३

केंद्रीय अर्थसंकल्प सादर करताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी संरक्षण क्षेत्रासाठी एकूण अर्थसंकल्पाच्या १२.९ टक्के म्हणजे ६ लाख २१ हजार ९४०.८५ कोटी रुपयांची तरतूद केली. आधुनिकीकरणावर भर एकूण तरतुदींपैकी २७.६६ टक्के भांडवली खर्चासाठी (capital budget), १४.८२ टक्के निर्वाह आणि परिचालन सज्जतेवरील (revenue budget) महसुली खर्चासाठी, ३०.६६ टक्के वेतन आणि भत्त्यांसाठी, २२.७० टक्के संरक्षण निवृत्ती वेतनासाठी आणि ४.१७ टक्के संरक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत नागरी संस्थांसाठी राखून ठेवले आहे.

संरक्षण तंत्रज्ञान आणि उत्पादनातील ‘आत्मनिर्भरता’ला प्रोत्साहन देणे, सशस्त्र दलांना आधुनिक शस्त्रे/प्लॅटफॉर्मनी सुसज्ज करणे आणि तरुणांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे हा या बजेटचा उद्देश आहे. १ लाख ७२ हजार कोटी रुपयांच्या भांडवली खर्चामुळे आधुनिकीकरणाला बळकटी मिळेल. देशांतर्गत भांडवल खरेदीसाठी १ लाख ०५ हजार ५१८.४३ कोटी रुपये राखून ठेवल्याने आत्मनिर्भरतेला आणखी चालना मिळेल. अर्थ मंत्रालयाने एसिंग डेव्हलपमेंट ऑफ इनोव्हेटिव्ह टेक्नॉलॉजीज विथ योजनेच्या माध्यमातून संरक्षण क्षेत्रातील नवकल्पनांसाठी अतिरिक्त ४०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

DITI योजनेचे उद्दिष्ट भारतीय सैन्यासाठी तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी स्टार्टअप्स, MSMEs आणि नवोन्मेषकांशी संवाद साधणे हे आहे. या योजनेंतर्गत सध्याच्या iDEX मार्गदर्शक तत्त्वांनुसार, प्रती अर्जदार २५ कोटी रुपयांच्या वाढीव मर्यादेसह, उत्पादन विकास बजेटच्या ५० टक्क्यांपर्यंत अनुदान दिले जाईल. संरक्षण उद्योगांमधील स्टार्टअप इकोसिस्टिमला चालना देण्यासाठी स्टार्टअप्स, एमएसएमई आणि नवसंशोधकांनी दिलेल्या तांत्रिक उपाययोजनांसाठी निधी पुरवण्यासाठी आयडेक्स योजनेसाठी ५१८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

संरक्षण दलांसाठीची वाढीव तरतुदींमुळे चालू आणि त्यानंतरच्या आर्थिक वर्षांमध्ये अधिग्रहणांद्वारे महत्त्वपूर्ण शस्त्रांची तफावत कमी होईल. यामुळे सैन्याला प्रगत तंत्रज्ञान, लढाऊ विमाने, जहाजे, पाणबुड्या, प्लॅटफॉर्म, मानवरहित हवाई वाहने, ड्रोन, विशेष वाहने करता येतील. भारतीय कंपन्यांसाठी १ लाख ५० हजार कोटी रुपये राखीव चालू आर्थिक वर्षात संरक्षण मंत्रालयाने (एमओडी) आधुनिकीकरणासाठीच्या अंदाजपत्रकातील ७५ टक्के, म्हणजे एकूण १ लाख ०५ हजार ५१८.४३ कोटी रुपये, देशांतर्गत उद्योगांकडून करण्यात येणाऱ्या खरेदीसाठी राखून ठेवले आहेत. या निधीचा जीडीपीवर सकारात्मक परिणाम होईल, रोजगार निर्माण होईल आणि भांडवल निर्मितीमध्ये योगदान मिळेल; ज्यामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. अलिकडील काळात संरक्षण क्षेत्रात काही सकारात्मक गोष्टीही घडत आहेत. आतापर्यंत संरक्षण क्षेत्रातील आयातीवर देशाचा फार मोठ्या प्रमाणात खर्च व्हायचा. मात्र, आता बरीच उपकरणे, शस्त्रास्त्रे देशातच तयार होतात. त्याची किंमतही आंतरराष्ट्रीय स्तरावरील किमतीच्या तुलनेत कमी आहे. भारताची औद्योगिक उत्पादकता वाढत आहे. त्यात संरक्षण क्षेत्राचा मोठा फायदा आहे. आतापर्यंत देशाबाहेर जाणारा पैसा देशातच राहण्यास मदत होईल. त्याचा फायदा वेगवेगळ्या स्तरांवर होईल. रेव्हेन्यू बजेट वाढ रेव्हेन्यू बजेट वाढ ही सशस्त्र दलांचे मनोबल वाढविण्यासाठी निश्चितच उपयुक्त आहे; जेणेकरून ते नेहमीच युद्धासाठी सज्ज राहतील. चालू आर्थिक वर्षात सरकारने ९२ हजार ८८ कोटी रुपयांची तरतूद केली आहे; जी मागील आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा ४८ टक्के जास्त आहे.

विमान आणि जहाजांसह सर्व प्लॅटफॉर्मसाठी उच्च दर्जाच्या देखभाल सुविधा आणि समर्थन प्रणाली प्रदान करणे हा या तरतुदीमागचा उद्देश आहे. दारूगोळा खरेदी, सुरक्षा परिस्थितीच्या आवश्यकतेनुसार साधने आणि सैन्याची हालचाल सैन्याच्या युद्ध सज्जतेला बळकटी देईल. बाह्य शत्रूशी लढताना देशांतर्गत शत्रूही वाढत आहेत. जम्मू-काश्मीर, ईशान्य भारत, छत्तीसगढ अशा काही ठिकाणी नक्षलवाद, दहशतवादाचा मुकाबला करावा लागत आहे. त्यावरही जास्त खर्च होतो.

देशांतर्गत सुरक्षेवर लष्कर त्यात काम करतच असते. भारतीय तटरक्षक दलासाठी वाढीव तरतूद भारतीय तटरक्षक दलाला (ICG) आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी ७ हजार ६५१.८० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ही रक्कम आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या तरतुदीपेक्षा ६.३१ टक्के जास्त आहे. या तरतुदीपैकी ३ हजार ५०० कोटी रुपये भांडवली खर्चासाठी, विशेषतः भारतीय तटरक्षक दलाच्या क्षमता वाढविण्यासाठी वापरले जाणार आहे.

या गुंतवणुकीमुळे गस्त घालणारी वेगवान वाहने/इंटरसेप्टर्स, प्रगत इलेक्ट्रॉनिक पाळत ठेवणारी यंत्रणा आणि शस्त्रे विकत घेणे शक्य होईल. या सुधारणांमुळे सागरी आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि इतर राष्ट्रांना मानवतावादी सहाय्य करण्यासाठी भारतीय तटरक्षक दल अधिक चांगल्या प्रकारे सुसज्ज होईल. संशोधनातून आत्मनिर्भरता डीआरडीओ अर्थसंकल्पीय तरतूद आर्थिक वर्ष २०२३२४ मधील २३ हजार २६३.८९ कोटी रुपयांवरून २०२४२५ मध्ये २३ हजार ८५५ कोटी रुपये करण्यात आली आहे.

या तरतुदींपैकी १३ हजार २०८ कोटी रुपये भांडवली खर्चासाठी राखीव असून मूलभूत संशोधनावर लक्ष केंद्रित करून विकासासह-उत्पादन भागीदारीद्वारे खाजगी संस्थांना पाठिंबा देऊन नवीन तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी डीआरडीओची आर्थिक क्षमता मजबूत करेल. तंत्रज्ञान विकास निधी (TDF) योजनेसाठी स्टार्ट-अप, MSME आणि शैक्षणिक संस्थांना डीआरडीओसोबत विशिष्ट तंत्रज्ञान विकासात सहकार्य करण्यासाठी ६० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. शिवाय, सरकारने iDEX च्या माध्यमातून संरक्षण क्षेत्रातील नवनिर्मितीसाठी असलेली तरतूद आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील ११५ कोटी रुपयांवरून चालू आर्थिक वर्षात ५१८ कोटी रुपयांपर्यंत वाढवली आहे.

या प्रोत्साहनामुळे स्टार्ट-अप्स, एमएसएमई आणि नवसंशोधकांना संरक्षण तंत्रज्ञान (डेफ-टेक) विषयक उपाय विकसित करण्यात मदत करेल आणि तरुण, नावीन्यपूर्ण विचारांना एक व्यासपीठ मिळेल.

भारताच्या आजूबाजूला चीन, पाकिस्तान हे देश आहेत. आजवरचा इतिहास पाहता या दोन्ही राष्ट्रांशी भारताचे मित्रत्वाचे संबंध नाहीत. त्यामुळे दोन्ही देश असलेल्या क्षेत्रात देशाला खूप काम करावे लागते. निवृत्ती वेतनात वाढ संरक्षण क्षेत्रातील निवृत्ती वेतनाचे बजेट १.४१ लाख कोटी रुपये करण्यात आले आहे. ही भरीव तरतूद एकूण १ लाख ४१ हजार २०५ कोटी रुपये असून २०२३-२४ मध्ये केलेल्या तरतुदीच्या तुलनेत २.१७ टक्के जास्त आहे.

सिस्टिम फॉर पेन्शन ॲडमिनिस्ट्रेशन (Raksha) किंवा स्पर्श (SPARSH) आणि इतर पेन्शन वितरण प्राधिकरणांद्वारे तब्बल ३२ लाख पेन्शनधारकांना मासिक पेन्शन देण्यासाठी याचा वापर केला जाईल. तिन्ही दलांचे आधुनिकीकरण आवश्यक लष्कराला मिळणाऱ्या निधीतील मोठा भाग मनुष्यबळाचे वेतन आणि निवृत्ती वेतनावर खर्च होतो. मात्र, आजच्या तंत्रज्ञानाच्या काळात युद्ध पद्धतीमध्ये झपाट्याने बदल होत आहेत. या बदलांचा प्राधान्याने विचार केला पाहिजे. त्या दृष्टीने लष्कराच्या तिन्ही दलांचे आधुनिकीकरण करण्याचीही आवश्यकता आहे. आजवर आलेल्या विविध सरकारांनी संरक्षण क्षेत्राला गरजेनुसार निधी देऊ असे म्हटले. आपली आवश्यकता सांगितली, तरी उपकरण मागवायला दोन वर्षे लागतात.

लष्कराला २४ तास सज्ज राहावे लागते. आताच आपण कारगिल युद्धाची २५ वर्षे पूर्ण केली. पण, कारगिल युद्धावेळीही जेव्हा उपकरणे हवी होती तेव्हा ती मिळाली नाही. कोणतीही आपत्ती आली, तर त्या वेळेला आपण उत्तर देऊ शकू का, युद्ध करू शकू का? त्यामुळे सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३ टक्के तरतूद संरक्षण क्षेत्रासाठी करायला हवी. अर्ध सैनिक दले म्हणजे बीएसएफ, सीआरपीएफ, आयटीबीपी यांच्या बजेटमध्ये १५ ते २० टक्के इतकी लक्षणीय वाढ करण्यात आली आहे. जरूर पडल्यास अर्धसैनिक दले बाह्य सुरक्षित करतासुद्धा वापरली जाऊ शकतात.

(लेखक संरक्षणविषयक तज्ज्ञ आहेत.)




## सीमेवरील पायाभूत सुविधा बळकट करणे

सीमेवरील पायाभूत सुविधा वाढविण्यासाठी २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात, बॉर्डर रोड ऑर्गनायझेशनच्या (बीआरओ) भांडवल खर्चासाठी ६ हजार ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे; जी मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत ३० टक्के अधिक आणि दोन वर्षांपूर्वीच्या तुलनेत १६० टक्के अधिक आहे. या वाढीव आर्थिक तरतुदीमुळे सीमावर्ती भागातील पायाभूत सुविधांच्या विकासाला मदत होईल आणि या प्रदेशातील सामाजिक-आर्थिक विकासाला चालना मिळेल. लडाखमधील न्योमा हवाई क्षेत्राचा विकास, अंदमान आणि निकोबार बेटांवरील भारताच्या दक्षिणेकडील पंचायतीसाठी कायमस्वरूपी पूल, हिमाचल प्रदेशातील चार किमीचा सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा शिंकुला बोगदा, अरुणाचल प्रदेशातील नेचिफु बोगदा आणि इतर उपक्रमांना या तरतुदीमुळे निधी मिळेल; ज्यामुळे प्रगती आणि समृद्धी येईल.

# ‘देश हा देव असे माझा’: राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

संत प्रबोधन
प्रा. डॉ. हरिदास आखरे

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या राष्ट्रालाच देव मानले होते. राष्ट्र समृद्ध करण्यासाठी गाव समृद्ध झाले पाहिजे, असा महान विचार त्यांनी ग्रामगीतेतून मांडला. ‘ग्रामगीता’ म्हणजे ग्रामविकासाची संजीवनीच आहे. गावाची सेवा केली, गावात वैभव नांदले, गाव स्वच्छ झाले आणि गावाला जर संपन्नता आली तरच देश संपन्न होऊ शकतो. हाच ग्राम विकासाचा मूलमंत्र त्यांनी देशभक्तीतून मांडला आहे.

**गावा गावाशी जगवा। भेदभाव हा समूह मिटवा।। उजळा ग्रामोन्नतीचा दिवा। दास तुकड्या म्हणे।।** हा ग्राम सुधारणेचा मूलमंत्र सांगणारे ग्राम चळवळीला खऱ्या अर्थाने अध्यात्म, ग्राम शिक्षण व ग्रामोद्योग या तत्त्वत्रयींद्वारा ग्राम स्वराज्य आणणारे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जगामध्ये भारतवर्षाला सर्वोच्च स्थानावर पोहोचविण्यासाठी ज्या भारतीय नररत्नांनी कर्म, वाणी व निश्चयाने प्रयत्नांची पराकाष्ठा केली, त्यापैकी विदर्भातील एक महत्त्वाचे संत होत. आपल्या मन, कर्म व वचनांद्वारे त्यांनी देश प्रगतिपथावर राहण्यासाठी ग्रामगीतेतून ग्रामविकासाचा अलौकिक संदेश भारतीय समाजमनाला दिला आहे. वंदनीय राष्ट्रसंतांनी ग्रामसुधारणा, ग्रामरक्षण, जीवन रक्षण मूलमंत्र, मूलोद्योगी शिक्षण, राष्ट्रभावना, मानवता, जीवनमूल्य, शोध, देदीप्यमान विचार, तेजस्वी संस्कृती, परंपरा या मूल्यांना ग्राम जीवनामध्ये रुजविण्याचा कसोशीने प्रयत्न केला.

**गाव हा विश्वाचा नकाशा । गावावरून देशाची परीक्षा।। गावची भंगता। येईल अवदशा देशा।।** आपल्या दिव्य भजन रचनांच्या स्फूर्तीने भारतीय युवक व सैनिकांना मौलिक राष्ट्रवादाचा संदेश त्यांनी दिला आहे. भारताला शानदार होण्यासाठी राष्ट्रसंतांनी राष्ट्रवंदनेतून जो विकासात्मक आशावाद व्यक्त केला तो असा, **तन मन धन से सदा सुखी हो। भारत देश हमारा । सभी धर्म अरू पंथ पक्ष को । दिलसे रहे पियारा ।।१।। विजयी हो विजयी हो। भारत देश हमारा।** माणिक बंडोजी ब्रह्मभट्ट ते वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हा त्यांचा जीवनप्रवास सर्व भारतीयांसाठी अतिशय प्रेरणादायी आहे. त्यांनी राष्ट्रप्रेरणा व जागृतीसाठी आपले संपूर्ण जीवन राष्ट्रीय, सामाजिक व धार्मिक कार्यासाठी झोकून दिले. देशकार्याची मशाल पेटवून त्यांनी स्वतःला १९४२ च्या स्वातंत्र्य संग्रामात झोकून दिले. अनेक राष्ट्रीय संस्थांना भेटी देऊन त्यांनी, ‘**जाग उठो बालबिरो तुम। अब तुम्हारी बारी है।**’ हा युवकांना महत्त्वाचा राष्ट्रीय संदेश देऊन त्यांचा प्रशिक्षण वर्ग घेतला.

राष्ट्रधर्माला ग्लानी आल्यामुळे युवक वर्गामध्ये नवचैतन्य निर्माण करण्यासाठी राष्ट्रसंतांनी प्रभावी भाषण व देशभक्तीच्या भजनरचनेद्वारा प्रखर राष्ट्रीयतेचा दिव्य संदेश दिलेला आहे. **झाडझडुले शस्त्र बनेंगे। भक्त बनेंगी सेना। पत्थर सारे बॉम्ब बनेंगे। नाव लगेगी किनारे।।** वंदनीय राष्ट्रसंतांचा प्रखर तेजस्वी राष्ट्रवाद भारतीय जनतेस ब्रिटिश सत्तेविरुद्ध पेटून उठण्याचा संदेश देत आहे. या जुलमी सत्तेविरुद्ध लढा देण्यासाठी त्यांनी प्रत्येक भारतीयाच्या मनात प्रखर राष्ट्रभक्तीची ज्योत प्रज्वलित केली. त्यामुळेच त्यांना इंग्रज सरकारने नागपूर, रायपूर येथील तुरुंगात चार महिने डांबले. तुरुंगातून बाहेर येताच त्यांनी १९४६ मध्ये वरखेड येथे अस्पृश्यांना मंदिर प्रवेशासाठी लढा उभारला. भारतामध्ये जनता दुष्काळी परिस्थितीने होरपळून निघत असताना जनतेमध्ये मानवता जागविण्याचे महत्त्वाचे कार्य केले. निर्वाणीचा इशारा १९४७ मध्ये ब्रिटिशांना निर्वाणीचा इशारा देताना ते म्हणतात, **चेत रहा है भारत दुख से। आग बुझाना मुश्किल है।। उठा तिरंगा बढावे छाती। अब बहलाना मुश्किल है।।** राष्ट्र उभारणीमध्ये युवकांची भूमिका महत्त्वपूर्ण मानून त्यासाठी युवकांनी बलवान, राष्ट्रभक्त व नीतिमान होण्यासाठी चहा, चिवडा व चिरूटाचे दास न होता शिक्षणासोबतच शीलवान होण्याचा महत्त्वाचा संदेश त्यांनी दिला. गावचा पुढारी हा फक्त गावचाच पुढारी नाही तर तो राष्ट्राचे भवितव्य घडवित असतो. म्हणून तरुण मतदारांनी जागरूक राहावे. युवकांनी प्रारब्धवादी न बनता निश्चयी व प्रयत्नवादी बनावे, असा वर ते परमेश्वराला मागतात. **हा जातिभेद विसरूनिया एक हो आम्ही। अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातूनी ।। खळ निंदका मनीही सत्य न्याय वसू दे। दे वरची असा दे ।।** ग्राम सुधारणा मूलमंत्र संपन्न भारताची जडणघडण करण्यासाठी ग्राम सुधारणेचा मूलमंत्र राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी सर्व समाजाला दिला.

राष्ट्रसंतांच्या रोमारोमात राष्ट्रभक्ती भरलेली आहे. त्यांचा राष्ट्राभिमानही किती उच्च पातळीवरचा होता, हे त्यांच्या असंख्य भजनांवरून विदित होते. ग्रामविकासातून राष्ट्र उभारणीची अभिनव संकल्पना त्यांनी मांडली. गाव जगला, गावाचे भरण पोषण योग्य झाले तरच राष्ट्र उभारणी योग्य पद्धतीने होऊ शकते. राष्ट्रसंतांचा हा विचार सर्वसामान्य माणसाला जगविणारा असून खेड्यातील दारिद्र्य, उपासमार, गरिबी संपून सर्वत्र स्वावलंबन, स्वयंपूर्णता आली पाहिजे. गावातील लोकांना रोजगार गावातच मिळावा. गावातील पैसा गावातच राहिला पाहिजे, असा ग्राम स्वयंपूर्णतेचा विचार त्यांचा होता. ग्रामविकासासाठी सर्वांनी एकत्र झटले पाहिजे. मेहनत, परिश्रम करून स्वतःच्या विकासाचा मार्ग स्वतःच शोधावा. त्यामुळे गाव, खेडे विकसित होऊन देश स्वयंपूर्ण बनेल. भारत सर्व जगामध्ये शानदार होऊन आपल्या अलौकिक तेजाने तळपत राहील, अशी ग्रामनिर्माण कला राष्ट्रसंतांनी भारतीय खेड्यांमध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. **कष्ट करुनी महाल बांधशी। झोपडीही नसे नेटकिसी ।। स्वातंत्र्याकरिता उडी घेशील। परी मजा भोगती इतरची।। भूषण तुझे ग्रामनाथा।।** शानदार भारताची स्वप्न पाहणारे राष्ट्रसंत हे एक द्रष्टे राष्ट्र प्रचारक असून त्यांनी धार्मिक शिक्षण व नीतिमत्ता यासोबतच सर्व देशाने सदैव जागृत राहून भारतमातेचे रक्षण करण्यासाठी युवकांच्या भूमिकेचा एका सच्चा सैनिकांच्या भूमिकेत प्रवेश केला आहे. युवकांनी ही जबाबदारी एक सेवक म्हणून पार पाडावी, म्हणजेच सैनिक व सेवक ही भूमिका वठवावी, असेही त्यांनी आपल्या भजनातून सांगितले आहे. **भारत शानदार हो मेरा। भारत शानदार हो मेरा।। मै सेवक बलवान सिपाही। रहू देश को प्यारा।।१।। शुद्ध चरित्र लीनता ममता। यही मेरा निर्धारा।। हिन्दू, इसाई, बुद्ध, पारसी। मुस्लिम जीन गुरुद्वारा।।२।।** राष्ट्रसंतांची विश्वबंधुत्वाची संकल्पना राष्ट्रसंतांनी सर्व जगाला सांगितली. मानवता, विश्वबंधुत्व या मूल्यांद्वारा भारताचे नाव सर्व जगाला उंचावून सांगणारे संत ज्ञानेश्वरांपासून **(पान ६ वर)**



# रहेंगा तेरा नाम जहाँ में...! दास्तान-ए- नौशाद

सिनेजगत
देवेंद्र प्रभुणे

भारतीय चित्रपट संगीत प्रारंभापासून जनमानसास केंद्रित ठेवूनच रचले गेले आहे, ही वस्तुस्थिती. खरे तर चित्रपटात गीतसंगीत हे कथानक, परिवेश, स्थळकाळ व प्रसंगाची मागणी लक्षात घेऊन रचल्या जाणे अपेक्षित असते. परंतु भारतात व विशेषत: हिंदी चित्रपटांमध्ये मात्र स्वतंत्र रचलेल्या संगीतास कथानकात जागा देण्याचे द्राविडी प्राणायाम सदैव चालू असतात. दोन घटका करमणूक करणारी, हलक्या-फुलक्या व सवंग विनोदाने भरलेली पारशी नाटके प्रारंभाच्या हिंदी बोलपटांचा मूलाधार होता.

प्रारंभाच्या काळी, लोकसंगीत व लोककला यांच्यावर आधारित गीतांचा चित्रपटात बोलबाला होता. जसे जसे प्रतिभावान संगीतकार संगीत प्रतलावर उदीतमान होऊ लागले, त्यावेळेस भारतीय शास्त्रीय संगीताचा हिंदी चित्रपट संगीतात प्रवेश झाला. अर्थात, विशुद्ध राग- रागिण्या व बंदीशी यांचे सुगम व सहज गुणगुणता येईल असे रूपांतर करण्यास संगीतकार चुकले नाही. त्याचबरोबर उपशास्त्रीय संगीत म्हणजे दादरा, ठुमरी, होरी, चैती, झुला यांचादेखील प्रचुर मात्रेत उपयोग हिंदी चित्रपटातील संगीतकारांनी १९३० च्या दशकाच्या उत्तरार्धात करण्यास प्रारंभ केला. पाश्चात्त्य संगीताच्या ध्वनिमुद्रिका व इंग्रजी चित्रपटातील पार्श्वसंगीत यांच्यापासून प्रेरित होऊन भारतात ‘वाद्यमेळ’ ही संकल्पना प्रवेशली. त्याचबरोबर पियानो, व्हायोलिन, क्लॅरीनेट, सॅक्सोफोन व ॲकॉर्डियन या वाद्यांचा चित्रपट संगीतात प्रवेश झाला. भारतातील विशिष्ट धर्मीयांचा संगीताप्रती असलेला अनुदार दृष्टिकोन व त्याज्यवृत्ती यांचा ऊहापोह अगोदरच या लेखमालेत केला असल्यामुळे, पुनरुक्ती न करता, एवढेच सांगू इच्छितो की, संगीताविषयी अनिवार द्वेष असलेल्या कुटुंबात जन्म घेतलेल्या एका हिंदी चित्रपट संगीतकाराने स्वत:च्या प्रतिभेने व कष्टाने मिळविलेल्या देदीप्यमान यशाने हिंदी चित्रपट संगीतकारांना ‘न भूतो न भविष्यती’ अशी प्रतिष्ठा, मान-सन्मान व महत्त्व मिळवून दिले, ज्याची कशाचीही तुलना होऊ शकत नाही.

२५ डिसेंबर १९१९ ला लखनौ येथे जन्माला आलेल्या नौशाद वाहिद खाँ यांचा जीवनप्रवास म्हणजे आरोही-अवरोही व वक्र सुरांची एक व्यामिश्र सरगम..! आपल्या मामासोबत बाराबंकी येथील हसरत वारिस अली शाह यांच्या उरुसाला गेले असता आठ वर्षांच्या लहानग्या नौशाद अलींवर संगीतकलेने आपले मायाजाल पसरले. निमित्त झाले, एका अनाम बासरीवादकाचे सुरंगी सूर व उस्ताद नसिरुद्दीन यांनी गायलेली ‘छुटे असीर तो बदला हुआ जमाना’ ही गझल. सूरभारल्या उन्मनी अवस्थेत नौशाद यांनी संगीताचे असिधाराव्रत आयुष्यभरासाठी मनोमन स्वीकारले. अर्थात, घरून या बाबतीत प्रोत्साहन मिळणे तर दूरच; पण वागण्यावर कडक निर्बंध आले. याही परिस्थितीत नौशाद यांनी हताश न होता संगीतअमृतकण वेचून मधुर गुलकंद बनवण्यास प्रारंभ केला. मूकपटात जिवंत वाद्यवृंद असण्याच्या त्या काळी रॉयल सिनेमातील उस्ताद लड्डन खाँ संचालित वाद्यवृंद हा नौशाद यांचा गुरू ठरला. येथे ऐकलेल्या सुरावटी मनातल्या मनात घोळवत व जिथे हार्मोनियम मिळेल तेथे त्याचा रियाज करून नौशाद एकलव्याच्या समर्पणाने व एकाग्रतेने हार्मोनियम वादनात प्रवीण झाले. सदैव वाद्यं हाताळावयास मिळावी म्हणून त्यांनी उस्ताद गुरबत अली यांच्या वाद्य-भांडारात हरकाम्याची चाकरी पत्करली. वाद्य वादनातील नैपुण्याने आनंदित होऊन त्यांनी दिलेला हार्मोनियम वडिलांनी रागाने फोडून टाकला व शेलक्या शिव्यांचा अहेर करून नौशाद यांना बाहेरचा रस्ता दाखवला. इथून त्यांची पावले मोहमयी नगरी मुंबईकडे वळणे क्रमप्राप्त होते.

मुंबईत सुरू झाला हाल-अपेष्टा, कष्ट, मानहानी व निराशेचा एक अविरत संघर्ष..! ब्रॉडवे थिएटर, दादरच्या फूटपाथवर आपले बस्तान मांडून नौशाद संधीच्या शोधात वेगवेगळ्या संगीतकारांच्या ध्वनिमुद्रणांमध्ये जाऊन पडेल ते काम करू लागले. ‘सुनहरी मकडी’ चित्रपटात संगीतकार उस्ताद झंडे खाँ यांना सहाय्य करत असतानाच त्यांना जमत नसलेली एक धून तयार करून त्यांनी निर्मात्याचे लक्ष वेधून घेतले. ‘बागबाँ’ (१९३७) चित्रपटात त्यांनी मुश्ताक हुसैन यांना सहाय्य करत असतानाच वाद्यमेळ- संयोजन व ध्वनिमुद्रण या क्षेत्रातही कौशल्य प्राप्त केले. सरदार चंदुलाल शाह यांनी त्यांना स्वतंत्ररीत्या संगीत दिग्दर्शनासाठी ‘कंगन’ हा चित्रपट गीतकार दीनानाथ मधोक यांच्या आर्जवी शिफारशीनंतर सोपवला. ‘बता दो मोहे कौन गली गयो शाम’च्या गीत ध्वनिमुद्रण प्रसंगी वादकांच्या असहकारामुळे व्यथित होऊन त्यांनी चित्रपट सोडला. पण त्यांनी ध्वनिमुद्रित केलेल्या या गीताने लोकप्रियता मिळविली व नौशाद यांना त्यांच्या कलाजीवनातील संपूर्ण संगीतबद्ध केलेला पहिला चित्रपट, ‘प्रेमनगर’ (१९४०) प्राप्त झाला. वेगळ्या थाटाची व विशुद्ध भारतीय गीत आराखड्यानुसार बनलेली गीते लोकप्रिय झाली आणि त्यांना सातत्याने कामे मिळू लागली. माला, दर्शन, नई दुनिया, स्टेशन मास्तर (१९४२) असे चित्रपट लागोपाठ आले. १९४३ साली तर शारदा नमस्ते, कानून, संजोग असे एकदम चार चित्रपट नौशाद यांनी संगीतबद्ध केले. या सुरुवातीच्या बहुसंख्य चित्रपटांचे गीतकार दीनानाथ मधोक होते, हे विशेष. पण, नौशाद यांना लोकप्रियतेच्या शिखरावर विराजमान करणारा चित्रपट होता ‘रतन’. केवळ ७५ हजार रुपयांत तयार झालेल्या या चित्रपटाने गीतांच्या स्वामित्व धनापोटी तब्बल ३.५ लाख रुपये कमावले. ‘आँखिया मिलाके, जिया भरमाके’, ‘रुमझुम बरसे बादरवा’, ‘ओ जानेवाले बालमवा’ या गीतांनी लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. याचवर्षी त्यांचे जीवन, गीत, पहले आप हे चित्रपट प्रदर्शित झाले. १९४६ साली प्रदर्शित झालेल्या ‘अनमोल घडी’ या मेहबूब प्रॉडक्शनच्या चित्रपटात सुरेंद्र नूरजहाँ व सुरय्या हे गायक-गायिका व अभिनेते होते. ‘जवाँ है मोहब्बत’ व ‘आवाज दे कहां है’ या गीतांनी कालजयी लोकप्रियता प्राप्त केली. त्याचवर्षी आलेल्या शहाजहाँ या कुंदनलाल सहगल यांच्या अंतिम चित्रपटात ‘जब दिल ही टूट गया’ व ‘गम दिये मुस्तकील’ अशी लोकोत्तर गीते होती.



नौशाद हे प्रथम श्रेणीचे संगीतकार झाले. १९४७ साली आलेल्या ‘दर्द’ (यात उमादेवीचे ‘अफसाना लिख रही हूँ’ हे चिरंतन लोकप्रिय गीत होते). १९४८ साली आलेल्या ‘अनोखी अदा’, ‘मेला’ व १९४९ सालच्या ‘दुलारी’ व ‘अंदाज’ या चित्रपटांनी संगीतात खळबळ माजवली. **(पान ६ वर)**

## यशासाठी

डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

# भविष्यासाठी...! सुरक्षेसाठी...!!



शास्ता खान दख्खनमध्ये येऊन वर्ष झाले तरी चाकण सोडला तर एकही गड तो जिंकू शकला नव्हता. त्याने कोकणावर स्वारी करण्यासाठी कहारतलब खानाला बोलावले. सोबत चव्हाण, गाडे, कोकाटे, जाधव हे मराठे सरदार व सावित्रीबाई देशमुख ही औरंगजेबाची अतिशय एकनिष्ठ व पराक्रमी महिला सरदार आपल्या सैन्यासोबत होती. अतिशय शूर योद्धा असल्यामुळे तिला औरंगजेबाने रायबागन ही सन्माननीय पदवी दिली होती. या मोहिमेची खबर शिवाजी महाराजांच्या हेरांनी आणली होती. चौल, कल्याण, भिवंडी, पनवेल, नागोठाणे ही महत्त्वाची ठाणी संकटात होती.

खान लोहगड मार्गाने उंबरखिंडीतून कोकणात उतरणार होता. हेरांकडून ही बातमी कळताच महाराजांनी सहज वाहून नेता येतील अशा तोफा सोबत घेऊन लगेच कूच केले. उंच पर्वत, दोन्ही बाजूला तुटलेले कडे व मधून उंबरखिंडीची चिंचोळी वाट, दोन्ही बाजूला हिरवीगार दाट झाडी अशा ठिकाणी राजाच्या सैन्याने मोक्याच्या अदृश्य जागा गाठल्या. उंच वृक्षावर बसलेल्या टेहळेकरांकडून पक्ष्यांच्या आवाजात गुप्त संदेश मिळून शत्रूच्या सैन्याची हालचाल कळत होती. जिथून सुटका नाही अशा ठिकाणी तोफेचे मोर्चे बसवले होते. नेताजी पालकर यांच्यासोबत पूर्ण पाहणी करून राजे आता कहारतलब खान, रायबागनच्या सैन्याची शांतपणे वाट पाहत होते. सकाळी खानाची फौज घाट उतरू लागली. सगळे रान शांत होते. पुढे पाठवलेले अश्वपथक रस्ता सुरक्षित व मोकळा आहे, हे बघून परत गेले. मग खानाचे घोडदळ, तोफांचे गाडे, सामानांच्या गाड्या, पायदळ हे सगळे जपून पावले टाकीत घाटाची धोकादायक वळणे पार करीत खिंडीकडे निघाले. खान, अमरसिंह, रायबागन व त्यांचे रक्षक पथक खिंडीत उतरले. थोड्याच वेळात शांतता भंग झाली. सगळीकडून नगाऱ्यांच्या व तुतारींच्या कर्कश्श आवाजाने पूर्ण सैन्य भयभीत झाले. पण डोळ्याने कुणीच दिसत नव्हते. थोड्याच वेळात खानाच्या सैन्याची पुढील तुकडी तोफेला बळी पडली. रानाच्या आश्रयाला जीव वाचवण्यासाठी धावणारा मोंगली सैनिक बाणाने अचूक टिपल्या जात होता. खान आणि इतर सरदार यांच्या समोर त्यांच्या सैन्याची दाणादाण उडाली. संतापाने खान ओरडला, 'शत्रूची कत्तल करा.' सर्व पाहणारी रायबागन खानाजवळ आली व तिने सांगितले, 'खिंडीच्या दोन्ही वाटा बंद आहेत. आपण पूर्ण घेरले गेलो आहोत. शत्रू दिसतच नाही तर कत्तल कुणाची करणार?' जंगलात वाट शोधायला गेलेला कुणीच परत आला नाही. शिवाजी थोर राजा आहे. त्याला ताबडतोब सुलह करायला वकील पाठवा. तो दिलदार आहे. शरणागतावर तो वार करत नाही.

रायबागनने लगेच पांढरे कपडे घालून 'तह-तह' असे ओरडत नि:शस्त्र लोक पुढे पाठवले. त्यांना महाराजांकडे नेल्यावर महाराजांनी खंडणी मागितली; ती लगेच मान्य झाली. खजिन्याच्या पेट्या घेऊन माणसांच्या पाठीवर लादून एक देखणा तरुण सोबत निघाला. त्या तरुणाला शिवाजी महाराजांचे संपूर्ण युद्ध-वीरवेशातले दर्शन घडले. सगळी खंडणी मिळाल्यावर युद्ध थांबले. पुन्हा शांतता पसरली. तो तरुण शिवाजी महाराजांच्या समोर आला. त्याने आपल्या कमरेची रत्नजडित मुठीची तलवार म्यानासह काढून राजांच्या समोर धरली. राजे म्हणाले, हे काय? आपला दिलदार स्वभाव पाहून धन्यता वाटली. नाचीजची भेट म्हणून या फिरंगीचा स्वीकार व्हावा. राजे हसले. तलवार धरलेल्या हातांकडे पाहून शिवाजी महाराज म्हणाले, तुमच्यासारख्या थोर सेनापतींची तलवार घेणं आम्ही उचित समजत नाही. तुमचा योग्य सत्कार करण्यालायक उचित वस्त्र आमच्याजवळ या युद्धभूमीत नाहीत. नाहीतर तोही सत्कार आम्ही केला असता. आम्ही तुमच्या धाडसाचे कौतुक करतो. औरंगजेबानं रायबागन किताब सार्थपणे तुम्हाला दिला आहे. रायबागनचे हात थरथरले. ती म्हणाली, महाराज, आपण कसं ओळखलंत? राजे म्हणाले, गोंदवलेलं कपाळ व हात पाहून हे कठीण नव्हतंच. खरे तर तुम्ही जेव्हा आलात तेव्हाच आम्ही ओळखलं होतं. हे धाडस तुमच्याखेरीज कोण करणार? तुम्ही आता परत जाऊन खानाला दिलासा द्या. तुमच्यासारख्या वीरस्त्रीचं दर्शन घडलं आणि पवित्र झालो. तुमच्या धैर्याच्या गोष्टी ऐकल्या की, आम्हाला भवानी आठवते. जेव्हा संधी मिळेल तेव्हा आम्ही आपला यथोचित सत्कार करू. आज ते जमत नसल्यामुळे आम्ही शरमिंदे आहोत. रायबागनला शब्द सुचत नव्हते. महाराजांच्या सन्मानदायक शब्दांनी एक वीरस्त्री असूनही तिच्या डोळ्यात अश्रू आलेत. महाराजांचे जे रूप, जो स्वभाव तिने पाहिला त्याने ती चकित झाली. प्रत्यक्ष शत्रू हातात आला असतानाही स्त्रीचा एवढा सन्मान करणारे व्यक्तिमत्त्व तिने कुठेच पाहिले नव्हते. ती पूर्ण भारली गेली. तिचा घसा अवरुद्ध झाला. एकही शब्द तिला बोलता येईना. शेवटी महाराजांना पूर्ण सन्मानाने वाकून त्रिवार मुजरा करून ती परतली. आपली उरली सुरली फौज गोळा करून खान माघारी परतला. त्याचा सगळा दारूगोळा, तोफा, शस्त्रे त्याला तिथेच सोडवी लागली.

एकही सैनिक न गमावता शिवाजी महाराजांनी खानाचा दारुण पराभव केला. शास्ता खानाने पुन्हा कोणती मोहीम कोकणावर काढू नये म्हणून त्यांनी नेताजी पालकरांना उत्तर कोकणात जागरूकीने राहायला सांगून व शिवाजी राजे स्वतः दाभोळ, शृंगारपूरच्या दिशेस दक्षिण कोकणच्या मोहिमेवर गेले. ही उंबरखिंडची लढाई, शिवाजी राजे व मुघल सरदार कारतलब खान यांच्यात २ फेब्रुवारी १६६१ रोजी झाली. रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यात, खोपोली-पाली रस्त्यावरील शेंबडी गावापासून चार कि.मी अंतरावर चावणी गावाच्या अलिकडे उंबरखिंड आहे. या युद्धात शिवाजी महाराज स्वतः हजर होते, म्हणून हे युद्ध मराठा इतिहासात महत्त्वाचे मानले जाते. या युद्धाचा विजयोत्सव दरवर्षी २ फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो. लोणावळा येथील 'शिवदुर्ग मित्र लोणावळा' या संस्थेने २००१ साली उंबरखिंडीत अंबा नदीच्या पात्राशेजारी ध्वजस्तंभ उभारून हा विजयोत्सव सुरू केला. या गोष्टीतून काय शिकायचे?

१. खान मोठ्या फौजेसोबत चाल करून येतोय. तेवढ्या मोठ्या सैन्याशी लढायला पुरेसे सैनिक, फौजा व दारूगोळा नसताना, प्रतिकूल परिस्थिती असतानाही न घाबरता शिवाजी महाराजांनी आपले धैर्य कायम ठेवले व बुद्धी आणि एकनिष्ठ सैनिकांच्या बळावर त्यांच्यावर मात केली. आज हिंदू समाजाची स्थितीसुद्धा नाजूकच आहे.

शिवकाळातील रायबागन म्हणजेच सावित्रीबाई देशमुख व मिर्झाराजे जयसिंघसारखेच अनेक स्वार्थी हिंदू, आज शत्रूच्या सोबत आहेत. देशातून व परदेशातून शत्रूला पैसा व परदेशी घुसखोरांची मदत आहे. बांगलादेशातील नागरिकांचे स्वागत आहे, असे उघड-उघड पश्चिम बंगालमधील भाषणातून जाहीर आमंत्रण देत आहेत. अशा मदतीनेच आजपर्यंत भ्रष्ट नेत्यांनी आपले स्थान मजबूत केले आहे; पण अजूनही वेळ गेलेली नाही.


२. वरील गोष्टीत स्पष्ट केल्याप्रमाणे शत्रूच्या उणिवा शोधून व आपल्या शक्तींचा योग्य वापर करून शत्रूवर मात करता येते. आपल्या उणिवा काय आहेत? आपल्यात एकी नाही! आपल्या लोकांना स्वत:च्या धर्माची व संस्कृतीची पूर्ण माहितीच नाही. ती माहिती जाणून घेण्याची इच्छापण नाही. कारण त्यांच्या दृष्टीने त्यांचे जीवन सुखाचे व सुरक्षित आहे असे त्यांना वाटते. त्यामुळे त्यांच्या दैनंदिन जीवनात काही बदल करण्याची आवश्यकताच त्यांना वाटत नाही. अजगर जसा अगदी आवाज न करता भोवतालच्या रंगांशी बेमालूमपणे मिसळून आपल्या सावजाला सापळ्यात पकडतो. सावजाला समजतपर्यंत खूप उशीर झालेला असतो. अगदी हीच झोपलेल्या सावजासारखी परिस्थिती पूर्ण भारतातील हिंदूंची आहे. सुरक्षित भविष्यासाठी, यशासाठी नेमके काय करावे? आपल्याला सांस्कृतिक, वैचारिक, शारीरिक व आर्थिक सुरक्षेची गरज आहे.

**१. सांस्कृतिक व वैचारिक सुरक्षा:** यासाठी घरातील वातावरणात आध्यात्मिक शिस्त हवी. वेळेवर झोपणे, उठणे, स्नान-संध्या, भजन, कीर्तन, आध्यात्मिक वाचन, मंदिरात नियमित जाणे आवश्यक आहे. २२ जानेवारीला अयोध्येच्या श्रीराम प्रतिष्ठापनेसाठी जसे पूर्ण भारतातील वातावरण भारल्या गेले होते तसेच विविध आध्यात्मिक उत्सवांचे आयोजन नियमित व्हायला हवे. सांस्कृतिक ज्ञानाच्या, गीता-पाठांतर, मनाचे श्लोक, दासबोध, भागवत, हनुमान चालीसा, रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी व इतर धार्मिक, संतसाहित्यावर आधारित विविध स्पर्धा व्हायला हव्यात. उदा. फक्त गीतेतील श्लोकांची अंताक्षरी, ज्ञानावर आधारित निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा किंवा प्रदर्शने भरवायला हवीत. आपल्या धर्माची, सणांची थट्टा करणाऱ्यांना धाक बसेल असा कडाडून विरोध करायला हवा.

**२. शारीरिक, सामाजिक सुरक्षा :** भारतात गेल्या ७५ वर्षांत अनेकदा जातीय दंगे झालेत व होत आहेत. अशा वेळी पोलिस सर्व ठिकाणी पोहोचू शकत नाहीत. तेव्हा मंदिरात व वस्तीत नियमितपणे स्वतःचे रक्षण करता यावे म्हणून शारीरिक सक्षमता व योग्य तज्ज्ञाकडून प्रशिक्षण आवश्यक आहे. त्यासाठी संतुलित आहार, योग्य वेळी झोपणे व नियमित व्यायाम व योग करणे आवश्यक आहे तसेच नवीन घरे व फ्लॅट्स बांधताना सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक त्या तरतुदी करणे आवश्यक आहे. तसेच घरी तिखटाचा पुरेसा साठा असणे आवश्यक आहे. ज्यांना शक्य असेल त्यांनी इलेक्ट्रॉनिक्समध्ये संशोधन करून स्वरक्षणासाठी नवीन स्वयंचलित तंत्रे व यंत्रे विकसित करायला हवीत. संकट प्रसंगी अगदी लहान मुलांनासुद्धा स्वतःचे रक्षण करता आले पाहिजे, अशी व्यवस्था हवी. प्रत्येक वस्तीत वेळोवेळी भेटण्यासाठी एक स्थान निश्चित करावे. सर्वांनी एकमेकांच्या संपर्कात नियमित राहता येईल, अशी व्यवस्था विकसित करायला हवी. संकटकाळी किंवा गरज पडल्यास सगळ्यांना सूचित करता येईल असा भोंगा किंवा सूचना प्रणाली हवी. कुणालाही, केव्हाही वस्तीतील कुठलाही भाग किंवा रस्ता घरच्या टीव्ही स्क्रीनवर पाहता येईल, असे कॅमेऱ्यांचे जाळे हवे. त्यासाठी वेगळे कॅमेरे घेण्याची गरज नाही. प्रत्येक बिल्डिंगच्या कॅमेऱ्यांची रचना व आपसातील नेटवर्कने हे शक्य आहे.

**३. आर्थिक सुरक्षा :** शत्रूची शक्ती कमी करण्यासाठी व आपली शक्ती व सुरक्षा वाढविण्यासाठी आर्थिक व्यवस्थापन खूपच महत्त्वाचे आहे. मागच्या लेखात वर्णिल्याप्रमाणे वस्तीतील प्रत्येक घरातील व्यक्तीची पूर्ण माहिती घेतानाच त्यांच्या कुटुंबाची भाजी, फळे, धान्य, किराणा, साबण वगैरे वस्तूंची मासिक गरज व प्राथमिकता नोंदवावी. अशा दैनंदिन गरजा घरपोच किंवा विक्री केंद्रातून पुरवण्यासाठी ॲपची निर्मिती करता येईल. याद्वारे हिंदू उत्पादक व उपभोक्ता यांचा समन्वय साधता येईल तसेच कुणाला नोकरी किंवा धंद्यासाठी कोणती मदत हवी आहे ते नोंदवावे. मग ज्यांना नोकरी करायचीच नाही, व्यवसायच करायचा आहे, अशा व्यक्तीची त्यांच्या पसंतीनुसार व्यवसाय प्रकार नोंदवून मग त्यांच्या गरजेनुसार त्यांना वाहन, जागा इत्यादीसाठी सहकार तत्त्वावर मदत करता येऊ शकते.

प्रत्येक मंदिराशी विशिष्ट भौगोलिक अंतर व विभागानुसार वस्तीनिहाय कुटुंबे जोडून एक उत्तम संतुलित सुरक्षित नेटवर्क तयार करता येऊ शकते. (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत.)



## होईल उध्दार होईल । हरिनामे ।।

मनी भाव ज्याच्या । निस्सिम जडला ।।
तोचि आवडला । विठ्ठलाशी ।।१।।

अंतर्बाह्य स्वच्छ । शुभ्रपट झाला ।।
त्याने जाळीयेला । अहंकार ।।२।।

विकार तापाची । सुटता रे आस ।।
होती त्याचे दास । रात्रंदिन ।।३।।

स्थितप्रज्ञ अंगी । जडता सद्गुण ।।
नांदतो निर्गुण । त्याचे ठायी ।।४।।

माझ्या मना जाण । व्यर्थ हा संसार ।।
होईल उध्दार । हरिनामे ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## श्रावण आला गं

आषाढ सरला ,भादवा पुढला
श्रावण आला गं सखी श्रावण आला गं.....।।

रुणझुण वाजे घुंगुरवाळे मोरपीस शोभे रूप सावळे
शामसुंदर कुंतल कुरळे श्रावण आला गं.....।।

झाडाला बांधा गं उंच हिंदोले आकाश धरती संगती डोले
नभात शोभती रंग वेगळे श्रावण आला गं.....।।

आली पंचमी नाग पुजूया झिम्मा फुगडी फेर धरूया
दूध लाह्या दुर्वा वाहूया चला श्रावण आला गं.....।।

मंगळागौरीची आरास मोठी पंचपक्वान्ने भरूया ताटी
सुवासिनींची भरूया ओटी श्रावण आला गं.....।।

जिवती देवीला औक्ष मागूया डाळं फुटाणे दूध देऊया
मुलाबाळांचा सांभाळ करी श्रावण आला गं....।।

आली पोर्णिमा आनंदा भरती सोन्याचा नारळ सागरा देती
बहीण भावास बांधते राखी श्रावण आला गं.....।।


आनंदी आनंद गोविंदा आला कृष्ण जन्माचा सोहळा झाला
दही-हंडीचा उत्साह मोठा श्रावण आला गं....।।

श्रावण आवस वृषभ पोळा बैलांच्या गळ्यात घुंगुरमाळा
पुरण पोळीचा नैवेद्य त्याला श्रावण आला गं.....।।

अनघा पतके
मो. ९७६४८६०२९६.



# ऑनलाइन विश्व बहरले; सोने घसरले



**अर्थजगतामध्ये सरत्या आठवड्यामध्ये चार तऱ्हेच्या चार बातम्या ऐकायला मिळाल्या. भारतात ऑनलाईन पेमेंटमध्ये वाढ झाल्यासंदर्भातली आकडेवारी पुढे येत असतानाच सोन्याचे दर घसरल्याने महिला वर्गाला ११ लाख कोटी रुपयांचा फटका बसल्याची माहिती सार्वजनिक झाली. दरम्यान, अर्थसंकल्पानंतर सुका मेवा महागल्याचे स्पष्ट झाले असून केशरी रंगाच्या वंदे भारत धावणार असल्याची चर्चा लक्ष वेधून गेली आहे.**

## अर्थोद्योग

महेश देशपांडे

अर्थजगतामध्ये सरत्या आठवड्यामध्ये नानाविध आर्थिक बातम्यांची रेलचेल पाहायला मिळाली. भारतात ऑनलाईन पेमेंटमध्ये वाढ झाल्यासंदर्भातली आकडेवारी पुढे येत असतानाच सोन्याचे दर घसरल्याने महिला वर्गाला ११ लाख कोटी रुपयांचा फटका बसल्याची माहिती सार्वजनिक झाली. दरम्यान, अर्थसंकल्पानंतर सुका मेवा चांगलाच महागल्याचे स्पष्ट झाले असून केशरी रंगाच्या वंदे भारत धावणार असल्याची चर्चा लक्ष वेधून गेली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'डिजिटल इंडिया मिशन'चा झेंडा जगभर फडकत आहे.

आजच्या काळात केवळ भारतातील लोकच यूपीआय पेमेंट करत नाहीत, तर परदेशातही वापरले जात आहे. वाढत्या लोकप्रियतेमुळे ऑनलाईन पेमेंटमध्ये विक्रमी वाढ झाली आहे. रिझर्व्ह बँकेने आपल्या ताज्या अहवालात म्हटले आहे की, ३१ मार्च २०२४ पर्यंत देशभरात डिजिटल पेमेंटमध्ये वार्षिक १२.६ टक्के वाढ नोंदविली गेली आहे. रिझर्व्ह बँकेच्या निर्देशांकानुसार ऑनलाईन व्यवहारांचा अवलंब करून मार्च २०२४ च्या अखेरीस ते ४४५.५ दशलक्ष होते. सप्टेंबर २०२३ मध्ये ते ४१८.७७ दशलक्ष तर मार्च २०२३ मध्ये ३९५.५७ दशलक्ष होते. या निर्देशांकाच्या आधारे अहवाल तयार केला आहे. रिझर्व्ह बँकेने एका निवेदनात म्हटले आहे की, आरबीआय-डीपीआय निर्देशांक सर्व मानकांवर वाढला आहे. कारण देशभरात 'पेमेंट परफॉर्मन्स' आणि 'पेमेंट इन्फ्रास्ट्रक्चर'मध्ये प्रचंड वाढ दिसून आली आहे. रिझर्व्ह बँकेने देशभरात डिजिटल पेमेंटची व्याप्ती निश्चित करण्यासाठी रिझर्व्ह बँक, 'डिजिटल पेमेंट्स इंडेक्स'तयार करण्याची घोषणा केली होती. त्यासाठीचा आधार मार्च २०१८ मध्ये तयार केला. अनेक तज्ज्ञांचा अंदाज आहे की, २०२५ पर्यंत भारत जगभरातील डिजिटल व्यवहारांमध्ये आपला वाटा ७१.७ टक्क्यांपर्यंत वाढवेल. आतापर्यंत झालेले बहुतांश डिजिटल व्यवहार यूपीआयद्वारे झाले आहेत. त्याची सुरुवात मोदी सरकारने २०१६ मध्ये केली होती. डिजिटल पेमेंट्स वेगाने वाढत असल्यामुळे भारतातील किरकोळ डिजिटल पेमेंट सध्याच्या पातळीपेक्षा दुप्पट होऊन २०३० पर्यंत सात ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. 'केर्नी आणि ॲमेझॉन पे' यांनी एका अभ्यासात म्हटले आहे की, ऑनलाईन खरेदीमध्ये डिजिटल पेमेंटचा जोरदार अवलंब केल्याने ग्राहकांच्या वर्तनात कायमस्वरूपी बदल होण्याची शक्यता आहे. सर्वेक्षणात ९० टक्के लोकांनी ऑनलाईन खरेदी करताना डिजिटल पेमेंटला प्राधान्य दिले. श्रीमंत ग्राहक डिजिटल पेमेंट वापरात सर्वाधिक पुढे होते. असे ग्राहक त्यांच्या ८० टक्के व्यवहारांसाठी डिजिटल पेमेंटच्या विविध पद्धती वापरतात.

भारताला 'सोनेरी पक्षी' म्हणूनही ओळखले जाते. याचे कारण भारतीयांच्या जीवनशैलीमध्ये आणि गुंतवणुकीच्या योजनांमध्ये सोने महत्त्वाची भूमिका बजावते. या देशातील कोट्यवधी माता-भगिनींच्या संपूर्ण आयुष्याची हमी हे सोने आहे, म्हणजेच त्यांचे स्त्रीधनही सोनेच आहे; मात्र यंदाच्या अर्थसंकल्पात सरकारने सोन्यावरील सीमा शुल्कात कपात केली आणि एका झटक्यात सोन्याचे भाव कोसळले. त्यामुळे देशातील सर्वसामान्यांच्या बचतीचे मूल्य ११ लाख कोटी रुपयांनी घसरले. भारत अजूनही सोन्याच्या जगातील सर्वात मोठ्या ग्राहकांपैकी एक आहे. भारतात सोन्याचे उत्पादन होत नाही आणि त्याचा जवळपास संपूर्ण व्यापार आयातीवर अवलंबून असतो. अर्थसंकल्पात सरकारने या आयातीवरील कर अर्थात सीमा शुल्क १५ टक्क्यांवरून सहा टक्के केले. त्यानंतर सोन्याच्या दरात झपाट्याने घट झाली. एकाच दिवसात सोन्याच्या किमतीत झालेल्या घसरणीमुळे गुंतवणूकदारांचे ११ लाख कोटी रुपयांहून अधिक नुकसान झाले. सोन्याच्या किमतीत झालेल्या घसरणीचे मूल्यमापन माता-भगिनींच्या नुकसानीवरून केले जाते. भारतात लोक, विशेषतः मध्यमवर्गीय कुटुंबे शेअर बाजारापेक्षा सोन्यात जास्त गुंतवणूक करतात. देशातील माताभगिनींकडे घरगुती बचतीच्या नावाखाली सोन्याचा जास्त साठा आहे. एवढेच नाही, तर हा सोन्याचा साठा जगातील सर्वात मोठ्या सोन्याच्या साठ्यापैकी एक आहे.

एका अहवालानुसार जगातील एकूण सोन्यापैकी सुमारे ११ टक्के सोने भारतातील माता, भगिनी आणि कुटुंबांकडे बचतीच्या स्वरूपात आहे. अमेरिका, जर्मनी, स्वित्झर्लंड आणि जागतिक नाणेनिधी यांच्याकडे असलेल्या एकूण सोन्यापेक्षा हे प्रमाण जास्त आहे. भारतातील माताभगिनींकडे असलेला एकूण सोन्याचा साठा ३० हजार टन आहे असे गृहीत धरले तर २२ जुलै रोजी या सोन्याची एकूण किंमत २१८ लाख कोटी रुपये होते. २३ जुलै रोजी किंमत घसरल्यानंतर या सोन्याची किंमत २०७ लाख कोटी रुपये राहिली. ही आकडेवारी सोन्याच्या मूल्यात ११ लाख कोटी रुपयांचे नुकसान दर्शवते. दुसरीकडे विदेशी गुंतवणूकदारही बाजारातून पैसे काढून घेत आहेत. त्यामुळे आंतरबँक परकीय चलन बाजारात रुपया सार्वकालिक निचांकी पातळीवर गेला आहे. डॉलर महागल्याने अनेक वस्तूंचे भावही वाढू लागले आहेत. त्यात सुका मेव्याच्या दरांचाही समावेश आहे. सध्या डॉलरच्या तुलनेत रुपया विक्रमी निचांकी पातळीवर आहे. व्यापाऱ्यांच्या मते रुपयाच्या तुलनेत परकीय चलन महाग झाले आहे. दिल्लीच्या सुका मेव्याच्या घाऊक बाजारपेठेतील खारी बाओलीमध्ये अमेरिका, ऑस्ट्रेलिया, इराण, दक्षिण आफ्रिकेसह अनेक देशांमधून सुका मेव्याच्या फळांचा पुरवठा केला जातो. अशा स्थितीत, पुरवठ्यावर परिणाम झाला असताना दरात वाढ होताना दिसत आहे. व्यापाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या २० दिवसांमध्ये काजूसह बदामाची मागणी वाढली आहे. लवकरच रक्षाबंधनाचा सण पार पडत आहे. सुका मेव्याचे भाव वाढल्याने सणासुदीच्या काळात लोकांचे खिसे हलके होऊ शकतात. आता एक



लक्षवेधी बातमी भारतीय रेल्वेकडून. लवकरच पाच नवीन 'वंदे भारत' ट्रेन रुळांवर उतरणार आहेत. 'इंटिग्रेटेड कोच फॅक्टरी' मधून पाच नवीन गाड्या उपलब्ध होणार आहेत. 'आयसीएफ' अधिकाऱ्याच्या म्हणण्यानुसार पाच केशरी 'वंदे भारत ट्रेन' लवकरच रुळांवर धावतील. सर्व गाड्या केशरी रंगाच्या आहेत. या गाड्यांमध्ये १६ डबे आहेत. सर्व आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत; मात्र या गाड्या कोणत्या मार्गावर चालवल्या जातील, याचा निर्णय रेल्वे बोर्ड घेणार आहे. आयसीएफ चेन्नई येथे निर्मित या गाड्या लोकांचा प्रवास सुलभ आणि आरामदायी करण्यासाठी तयार करण्यात आल्या आहेत. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नुकतीच लोकसभेत वंदे भारत गाड्यांबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितले की, १०२ पैकी १६ गाड्या महाराष्ट्रात धावत आहेत. १९ जुलै २०२४ पर्यंत देशात एकूण १०२ वंदे भारत एक्स्प्रेस गाड्या धावत आहेत. 'भारत गौरव ट्रेन्स'च्या माध्यमातून भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा आणि ऐतिहासिक स्थळे जोडणे हा उद्देश आहे. 'वंदे भारत एक्स्प्रेस ट्रेन'च्या यशानंतर रेल्वेने 'वंदे भारत स्लीपर ट्रेन' सुरू केल्या. ५० नवीन अमृत भारत गाड्यादेखील विभागल्या गेल्या आहेत. 'स्लीपर वंदे भारत' आणि 'वंदे मेट्रो'च्या चाचणीचा टप्पा सुरू झाला आहे. 'वंदे भारत स्लीपर ट्रेन' १५ ऑगस्टपर्यंत सुरू होऊ शकतात. या 'स्लीपर वंदे भारत ट्रेन'मध्ये १६ डबे असून ८२३ प्रवासी प्रवास करण्याची क्षमता आहे. (लेखक आर्थिक घडामोडींचे अभ्यासक आहेत.)



चित्रपट विषयक लिखाणासाठी ओळखल्या जाणारे अरुण वसंत खोपकर यांचा जन्म मुंबई येथे ५ नोव्हेंबर १९४५ रोजी झाला. हे एक मराठी लेखक, लघुचित्रपट निर्माते व चित्रपट दिग्दर्शक आहेत. चलत् चित्रव्यूह या त्यांच्या नोव्हेंबर २०१२ मध्ये प्रकाशित झालेल्या कला समीक्षा आणि कलावंत तथा कला तत्वज्ञानावर आधारित स्फुटलेखनाला २०१५ चा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झालेला आहे. अरुण खोपकर यांनी चित्रकार, साहित्य, अभिनेते अशा विविध कलावंतांच्या सोबत वावरताना जे अनुभव घेतले, त्यांच्याकडून जे शिकले त्या सर्वांचं त्यांच्या विशिष्ट शैलीमध्ये वर्णन केलेले दिसून येते.

# ‘चलत् चित्रव्यूह’मधील कला शिक्षणाचे संदर्भ

साहित्य शिक्षण

किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

चलत् चित्रव्यूह या ग्रंथामध्ये शैक्षणिक संदर्भ कोठे सापडतील? असा प्रश्न उभा राहतोच. मात्र फार बारकाईने वाचले तर जीवन शिक्षणाचे काही संदर्भ कधी औपचारिक स्वरूपात तर अनौपचारिक स्वरूपात आपल्याला भेटतात. तसेच यातील अनेक व्यक्तिमत्त्वांनी घेतलेले शिक्षण किंवा शिक्षणासाठी केलेले कार्य यांचे उल्लेख ही अधून मधून भेटत राहतात. माझ्या बोलक्या मित्राकडून जितके शिकलो, तितकेच अबोल किंवा मितभाषी कलावंताकडून शिकलो. असे लेखक आवर्जून म्हणतात तेव्हा आपल्या संपर्कात येणाऱ्या व्यक्तींकडून जीवन विषयक नोंदी शिकणे हाही शिक्षणाचा एक भाग आहे हे लक्षात घ्यावे लागते. अभावाचे रंग हा जहांगीर सबावाला यांच्या आठवणीचा धांडोळा घेणाऱ्या लेख अरुण खोपकर यांनी प्रचंड संवेदनशील मनाने व्यक्त होत लिहिला आहे. या लेखांमध्ये नॅशनल गॅलरीची इमारत अगोदर कावसजी जहांगीर हॉल म्हणून ओळखली जात असेल तेथे विविध सांस्कृतिक कार्यक्रम होत ही इमारत स्वभावालांच्या कुटुंबाने दिलेल्या देणगीतून बांधली गेली होती. एके ठिकाणी सबावालांच्या कला संग्रहात आर्ट स्कूलमधल्या विद्यार्थी दशेतल्या वस्तूंचे जतन किती व्यवस्थितपणे करून ठेवलेले होते त्याचा उल्लेख सुद्धा लेखकाने केलेला दिसून येतो. यावरून कलावंत विद्यार्थी दशेत जितका टापटीप आणि प्रभावी असेल तितकाच मोठा तो त्याच्या जीवनात होतो असे दिसून येते.

जहांगीरने क्लासिक अकॅडमी, इम्प्रेशनिस्ट आणि क्यूबिस्ट या शैलीमध्ये शिक्षण घेतले होते. या उल्लेखाने कलेचे शिक्षण किती महत्त्वाचे आहे आणि त्यातही किती वैविध्य आहे हे अरुण खोपकरांनी दाखवून दिले आहे. भूपेन खक्कर यांच्यावरील संत भूपेन या लेखातही भूपेनला अनेक कलात रस होता. गुजराती आणि इंग्रजीत त्याच्या लेखनाचा संग्रह प्रसिद्ध होता यावरून भूपेनसारखे कलावंत भाषेचेही चांगले अभ्यास असतात हे लक्षात घ्यावे लागते. चमचमीत काही लिहावे या रघुनाथ जोशी यांच्यावरील लिखाणामध्ये पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये स्वतः अरुण खोपकर विद्यार्थी तसेच असताना त्यांना भेट दिली. रघुनाथराव जोशी यांच्याबद्दल आत्मीयतेने लिहिताना दिसतात. या लेखामध्ये रामदास स्वामी यांचे वाटोळे सरळ मोकळे या रचनेमधील- **पान शिष्याने रेखाटावे। त्यावरी नेमकेची ल्याहावे, दूरी जवळ न व्हावे। अंतर ओळीचे।** या ओळीमधून गुरुंनी लिहिलेले शिष्याने कसे गिरवले पाहिजे ते सांगितले आहे. याच लेखात सिद्धम लिपीचा वापर बौद्ध धर्मातल्या तांत्रिक ग्रंथाच्या प्रतिलिपी करण्यासाठी झाला ही महत्त्वाची माहिती वाचायला मिळते. त्याशिवाय प्राचीन चीनमध्ये गर्भवतीच्या आजूबाजूला कुणी बेसूर किंवा बेताल गायल्यास त्याला चाबकाचे ५० फटके दिले जात असत कारण तो पुढच्या पिढीला बिघडवण्याचा गुन्हा करत असे असे महत्त्वाचे अधोरेखन ही लेखकाने या लेखात दिले आहे. यावरून भावी पिढीला कला शिक्षण देणे किती महत्त्वाचे आहे? हे लक्षात घ्यावे लागते. लेखक मॉस्कोत असताना त्यांनी एका विदूषकाच्या मोठ्या शाळेला भेट दिली होती. रशियन विदूषक यांच्यासाठी त्यांच्या सरकारने अद्यावत साधनांनी परिपूर्ण अशी शिक्षण संस्था चालवली होती. आपल्याकडे सोंगाड्याचे शिक्षण हे सुद्धा वेगळ्या पद्धतीने होत असते ती पद्धत म्हणजे पारंपारिक, अनौपचारिक आणि अनुप्रयोग आतून शिकणे. हे असे उल्लेख विदूषक किंवा सोंगाड्या यांना आपली कला दाखवण्यासाठी प्रशिक्षण घ्यावे




लागते हे लक्षात घ्यावे लागेल. त्याच पद्धतीने पाश्चात्य देशाप्रमाणे आपल्याकडे कलेबाबत शिक्षण देणार्या संस्था अस्तित्वात नाहीत हे सुद्धा लक्षात घेणे गरजेचे असते. विद्यार्थ्याला आपल्या देशात कसा त्रास होतो याचे उदाहरण देण्यासाठी खोपकरांनी फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये दिग्दर्शनाच्या कोर्सला विद्यार्थी म्हणून तिसऱ्या वर्षाचा त्यांना पंधरा मिनिटाचे डॉक्युमेंटरी करायची होती की, दादू इंदुरीकर वर करावी अशी त्यांची होती. मात्र दादू इंदुरीकर यांनी त्यांना अव्वाच्या सव्वा मानधन मागितले. खरे तर स्कॉलरशिपमधून जेमतेम दोन वेळचे जेवण मिळवणारा विद्यार्थी आपल्याला मानधन देऊ शकत नाही याची जाणीव कलावंत म्हणून दादूने ठेवायला हवी होती. मात्र, तसे झाले नाही. अर्थात नामदेव ढसाळ यांच्या मध्यस्थीमुळे दादूंना आपली चूक लक्षात आल्याचा उल्लेख लेखकाने केला आहे.

ज्येष्ठ साहित्यिक नारायण सुर्वे यांच्यावरील अरुण खोपकर यांचा लेख नारायण सुर्वे यांची वेगळी ओळख करून देणार आहे यात शंका नाही. या लेखामध्ये समाजाच्या शैक्षणिक आणि साहित्यिक अनुषंगाने लेखक म्हणतात, होमर, शेक्सपियर हे कितीही महान कवी असले तरी आज आपल्या भारतात निरक्षरांच्याही हृदयात व्यासांना किंवा वाल्मीकांना जे पूजनीय स्थान आहे ते होमर व शेक्सपियरला आपापल्या देशात नाही म्हणून इथे कवी शतकांनुशतके लोकमानसात जिवंत राहतो. या बाबीचा विचार करता निरक्षर लोक जर एखादा सिद्धांत किंवा विचार किंवा एखादी कला जीवन कला म्हणून, जीवन सिद्धांत म्हणून स्वीकारत असतील तर ती इतिहासात कायम उरते. याबाबत निरक्षर स्त्रियांनी रचलेली आणि म्हटलेले भोंडल्याची गाणी हे एक उदाहरण वाचकांना विचारात घ्यावे लागेल.

खंड क्रमांक शून्य चार्ल्स कोरिया या कलावंताच्या जीवनावरील लेख स्थापत्यकलेचे जीवनातील महत्त्व अधोरेखित करणारा आहे. यामध्ये जयपूर शहराचे वैशिष्ट्य सांगत असताना १७२७ ते १७३२ या काळात जयपुरचा दुसरा महाराजा सवयी जयसिंग यांनी ते पुढची निर्मिती केली. त्यांना नवग्रह मंडलाची संकल्पना माहिती होती. ह्याच जयसिंगाने खगोलशास्त्राच्या, ज्योर्तिविज्ञानाच्या सूक्ष्म आणि अचूक संशोधना करता अनेक वेधशाळा वेगवेगळ्यास्थानी बांधल्या त्यातील सर्वात परिपूर्ण वेधशाळा जयपुर येथे आहे. हे सांगून पुराणांना मानणारा जयसिंग वेधशाळा बांधतो. या बाबीचा उल्लेख पंडित नेहरू यांनी जयसिंगाचा काळ म्हणजे अध्यात्म आणि विज्ञान यांच्या सीमेवरचा काळ होय असे वर्णन केले आहे. यावरून आपल्या देशात अध्यात्म आणि विज्ञान ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, असे म्हणावे लागेल. रुपेरी पडदा पांढरा खडू आणि काळा फळा या सतीश बहादुर या कलावंताबद्दल बोलताना सुरुवातीला लेखक म्हणतात, ज्या इन्स्टिट्यूटमध्ये सतीश बहादूरसारखा प्राध्यापक असेल तिथे शिक्षण घ्यायला हरकत नाही. यावरून आपण त्यांच्याकडून शिक्षण घेतले त्या शिक्षकांबद्दल खोपकर मुक्तपणे व्यक्त झाले आहेत हे लक्षात येते. त्याचवेळी फिल्म इन्स्टिट्यूटला १९७० ला येणाऱ्या विद्यार्थ्यांची मनस्थिती आजचे विद्यार्थ्यांपेक्षा वेगळी असायची, एक किफायतशीर व्यवसाय या दृष्टीने फिल्म शिक्षण संस्थेकडे त्यावेळेस लोक पाहत नव्हते. त्यामुळे तेथे प्रवीण घेणारे विद्यार्थी कला भोक्ते आणि अविष्काराचं श्रेष्ठ आणि प्रभावी माध्यम म्हणून तेथे येत. आज शिक्षणाच्या सर्व क्षेत्रांमध्ये शिक्षण बाजूला राहून जीवन जगण्याचे एक साधन म्हणून त्याकडे पाहिले जाते. बहादूर साहेबांनी सिनेमाच्या शिक्षणासोबतच साहित्य काव्य चित्रकला याबाबतही अभ्यास केला होता. या वाक्यासोबतच ते हाडाचे शिक्षक होते आणि शिकवण ह्या कलेत शिक्षकाच्या अंगी अनेक गुण असावे लागतात असे लेखक म्हणतात.

भास्कर चंदावरकर यांचं इंग्रजी हिंदी मराठी कोणत्याही भाषेत व्याख्यान ऐकलं की, ते एक प्रतिभावंत गुरु आहेत यात शंका राहत नसे. त्यांना आपल्या संगीत या विषयाचे प्रगाढ ज्ञान होतं आणि ते संगीताचे नाते गंधशास्त्राशी तर कधी मानसशास्त्राशी जोडायचे यातून त्यांचा संगीता विषयाचा विलक्षण अभ्यास लक्षात येतो. त्याच पद्धतीने मी काहीही शिकवत नाही पण तुम्हाला हवे असेल तर तुम्ही माझ्याकडून शकू शकाल अशी भूमिका घेऊन विद्यार्थ्यांना कलाशिक्षण देणारे भास्कर चंदावरकरसारखे प्राध्यापक आज मिळेनासे झाले आहेत. के. के. आणि मंतरलेली घडी या लेखात के. के. महाजन यांनी कॅमेरामन म्हणून केलेल्या चित्रपटातून पुढील पिढीने काय शिकावे? तर आपल्या देशातल्या बदलत्या ऋतूकडे, पानाफुलाकडे, वृक्षवेलीकडे पाहून त्यांचा योग्य वापर करून काळाच्या ओघात टिकू शकणाऱ्या प्रतिमा रुपांतर करणाऱ्या संशोधक प्रवृत्तीच्या प्रेरणा कायम ठेवणे. ही वृत्ती शिकणे गरजेचे आहे. तसे मनी कौल यांच्यावरील लेखामध्ये अरुण खोपकर म्हणतात, तू काय शिकवलंस? तू नेहमी आरी मातीसचा आधार दिलास, जे शिकवता येतं ते शिकण्याच्या लायकीचं नसतं. कलेच्या क्षेत्रामध्ये शिकण्यापेक्षा कलासक्त जीवन जगणे आणि सृजन या दोन गोष्टी महत्त्वाच्या असतात असेच मला वाटते. ऋत्विक घटक यांचे दोन प्रतिभावान शिष्य म्हणजे कुमार शहानी आणि दुसरे मनी कौल.

(पान ६ वर)

## श्रावण सरी

### बावरे मन....

मन माझेच बावरे हे
आज भिजुनी चिंब आहे
कशी सांगू मी चंद्राला,
सजणा अजुनी दूर आहे
संध्येचा केशरशेला
लेवून सांज आली
नव साज तारुण्याचा
रात शृंगारून नटली...
नको विझवूस राजा
असे मनाचे किनारे
चांदण्यांचा गार वारा
अन् लाख चंद्र-तारे...
चांदण्या रुसून बसल्या
रात राणी सम कधी मी
उमलून फुलून मोहरेल
मखमली तुझ्याच उरी...
अबोल अधीर अधरे
न सांगता ते उमलले
प्रेमाचा मोहरणारा मग
सडा शिंपुनी गेले...
डोळ्यात साचलेले
ऊतरू दे गालावरती
पाझरू दे प्रेमसरिता
तृप्त तृप्त तृष्णा हृदयी..

सुचित्रा बाकरे

### पाऊस

हिरवे हिरवे रान चहुकडे
निसर्गाचे रंग खुलले
पावसाच्या आगमनाला
स्वागतास सारे सज्ज जाहले..
ग्रीष्मात सुखावणारी सर
सृष्टीत पसरे गारवा
पानाफुलात बहरला फुलोर
मनी दाटतो हर्ष नवा..
सुखाची फुलली हिरवळ
गंध पसरे ओल्या मातीचा
अंकुर नवा फुलला हिरवा



थेंब ओघळता पावसाचा..
वाटेत हिरवीचिंब पायवाट
स्पर्शिती थंडगार दिलासा
वारा गाई आनंदाचे गाणे
झरझर सरीत बरस पावसा..
धरणीवर पडता थेंब टपोरे
सृष्टीचे सौंदर्य निखळे
नभात गरजे सूर नवे
हिरव्या ऋतूंचे सोहळे..

स्मिता भट



### रेशीमधारा

वनांचा वैशाख वणवा
श्रावण सरी करी शांत
सृष्टीत येईल मृदगंध
ती नवोन्मेषाने होई धुंद

जिकडे तिकडे हिरवी राने
तेथे कविला सूचती गाणी
निळाईतुनी पाखरे गोजिरी
किलबिलती मंजुळ गाणी

सरीवर सरी सुरू झाल्या
ऊन्ह सावलीचा मांडला
आकाशी उमटे सप्तरंगी इंद्रधनु
क्षणभर राहून हळूच मिटला

टपोऱ्या पावसाच्या थेंबाने
वनराणी गेली भारावून
श्रावण जादूगाराची किमया
दिसे फुलांच्या रंगपंचमीतून
चंपक फुलतो श्रावणमासी
परिमल येईल केवड्याचा
फुललेला प्राजक्त बघुनि
राग जाई त्या भामेचा

गिरिशिखरावर नद्या वाहती
खळखळ त्या येती धाऊनी
श्री देवदर्शना जणू चालल्या
श्रद्धाळू, भाविक सुवासिनी

साधना शेंडे

पान १ वरून

## संघाविषयी ‘फेक नॅरेटिव्ह’तून अपप्रचार....

इंदिरा गांधी यांनी लादलेल्या असंविधानिक आणीबाणीविरुद्धचा लढा, पंजाबमधील अशांततेच्या काळात शांतता प्रक्रिया आणि सामाजिक एकात्मता पुनर्संचयित करण्यासाठी केलेले प्रचंड काम... ही काही उदाहरणे आहेत.

**फेक नॅरेटिव्ह क्र. ३. संघ विरोधी नेत्यांना पडद्याआडून मदत करतो-** एखाद्या समीक्षकाच्या अज्ञानामुळे किंवा काही बालिश संज्ञानात्मक प्रक्रियेमुळे काही मंडळी असा विचित्र विचार करायलाही प्रवृत्त झाल्याची शक्यता जास्त असते. संघाने राष्ट्रीय अस्मिता, हिंदू प्रबोधन आणि एकात्मतेचा विचार कधीही सोडला नाही. हे संघाच्या गेल्या ९९ वर्षांनी स्पष्टपणे दाखवून दिले आहे की, लाखो स्वयंसेवकांनी राष्ट्रासाठी आपल्या वैयक्तिक जीवनाचे बलिदान दिले. भारताची संस्कृती, कला आणि वारसा नष्ट करू पाहणार्यांना संघ नेहमीच विरोध करेल. भारताचे प्रतिनिधित्व बहुसंख्य हिंदू करतात. जर कोणी हिंदू किंवा भारतीयांमध्ये फूट पाडण्याचा किंवा विघटन करण्याचा प्रयत्न केला, तर विरोधक कितीही शक्तिशाली असला, तरीही संघ विरोधात उभा राहील. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नकारात्मक चित्रण करून सर्व भारतीयांच्या मनात भीती निर्माण करण्याचा त्यांचा जुना दृष्टिकोन कायम ठेवून द्वेष करणारे हिंदूंमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न करत आहेत. भाजपच्या बहुतांश नेत्यांची पार्श्वभूमी रा. स्व. संघाची असल्याने हा दृष्टिकोन अप्रत्यक्षपणे भाजपच्या मतदारांच्या मनात भीती निर्माण करेल आणि अल्पसंख्याक भाजपविरोधात एकजुटीने राहतील याचीही खात्री होते.

**फेक नॅरेटिव्ह क्र. ४. संघ सत्तेसाठी भुकेला असून सरकारला वेठीस धरायचे आहे-** जर संघ सत्तेसाठी भुकेला असता, तर संघाचे द्वितीय सरसंघचालक प. पू. श्री गोळवलकर गुरुजी यांनी तत्कालीन गृहमंत्री सरदार पटेल आणि तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची संघाला काँग्रेसमध्ये विलीन करण्याची विनंती आनंदाने मान्य केली असती. जर संघ राजकीय सत्तेसाठी हपापलेला असता, तर संघाला, त्याच्या संलग्न संस्था, संघटना आणि मजबूत सामाजिक बांधिलकीचा उपयोग करून सत्ता मिळविण्यासाठी राजकीय अजेंड्यावर लक्ष केंद्रित करणे सोपे होते. परंतु, संघाची प्रारंभीपासूनच हिंदूंना एकत्र करून केवळ वैयक्तिक आणि राष्ट्रीय चारित्र्य विकासाची दृष्टी आहे. भाजप किंवा जनसंघापूर्वी रा. स्व. संघ अस्तित्वात होता. खरे तर रा. स्व. संघ ही विविध क्षेत्रांत कार्यरत अनेक संघटनांची पालकसंस्था आहे, ज्याला ‘संघ परिवार’ म्हणून ओळखले जाते. संघ या संघटनांसाठी संरक्षक आणि मार्गदर्शक म्हणून काम करतो आणि संघाच्या सर्वोच्च कार्यकारिणीसोबत नियमितपणे त्यांच्या कार्याबद्दलच्या अद्यतनांवर चर्चा करण्यासाठी किंवा विविध मुद्द्यांवर मार्गदर्शन घेण्यासाठी बैठका घेतात. संघ १९२५ सालापासून देशाची सेवा करत आहे. त्याबदल्यात कशाचीही अपेक्षा नाही. लोक स्वयंसेवक बनून संघ परिवाराचा हिस्सा बनतात. प्रचारक त्यांचे घर आणि कुटुंब सोडतात आणि नोकरीच्या आकांक्षा आणि वैवाहिक जीवनाचा त्याग करतात. संघ हा काळोख्या रात्रीचा चमकणारा तारा आहे. म्हणूनच प्रश्न असा आहे की, १९२५ सालापासून निःस्वार्थपणे देशसेवा करणाऱ्या संघटनेवर विश्वास ठेवायचा की, दहशतवादी, नक्षलवादी, हिंदुत्वविरोधी गटांना समर्थन देणार्या आणि सामान्यतः मानवतेच्या विरोधात काम करणार्या पक्षांवर किंवा व्यक्तींवर विश्वास ठेवायचा? संघाचा द्वेष करणार्यांना मी एवढेच सांगेन की, तुम्ही संघात सामील व्हा आणि स्वतः अनुभव घ्या. अर्धसत्य आणि रचलेल्या खोट्या कथा समाज आणि राष्ट्रासाठी नेहमीच हानीकारक असतात. चला अनुभव घेऊया आणि मग ‘राष्ट्र प्रथम, बाकी सर्व दुय्यम’ या ब्रीदवाक्याखाली स्वतःला योग्यरित्या व्यक्त करूया...

## घर आणि घरघर




प्रभाकरराव हे सन्मित्र आणि शेजारी! आताशा बऱ्यापैकी पिकलं पान झालेले. पण अजूनही त्यांचे उमेदीचे ते जुने दिवस लख्ख आठवतात. त्यांचं ते जुन्या मोहल्ल्यातील भाड्याचं बिऱ्हाड. बिऱ्हाड कसलं दोन घरांच्या मधल्या जागेतली अंधारी खोली. त्यात घाम घ्यूम व्हायला झालं की जरा वेळ पायऱ्याजवळ पाय पसरून बसायचं. दोन्ही बाजूंनी वाहणारं सांडपाणी आणि कोंबड्यांची कुकूचं कु! जुन्या लाकडी फळ्या, धुरकट भिंती आणि कोनाडे. तिथंच अख्खं बालपण सरलं. कुणाचं प्रशस्त हवेशीर आणि नीटनेटकं घर बघून प्रभाकरला हेवा वाटायचा; पण ओढगस्त परिस्थितीमुळे नाईलाज होता.

पुढे प्रभाकर एका कचेरीत चिकटले आणि गावकुसातल्या शांतासोबत घरगुती पद्धतीने लग्नाचा बार उडाला. आता किमान नव्या किरायाच्या जागेत तरी जावं, असं तीव्रतेने वाटू लागलं. पण भाडे गगनाला भिडलेले. छोटासा प्लॉट घ्यावा तर ऋणसुविधा नसल्याने मनातले मांडे मनातच राहून जायचे. पुन्हा वर्षानुवर्षे तेच ते निरंतर वातावरण. त्या दिवशी कचेरीतल्या बाबूलालचा साळा त्याला भेटायला आला होता. त्याच्या हातात कसलेसे कागद आणि एक भेंडोळी होती. तो प्लॉट दाखवू लागला, तसे त्याच्या भोवती सारे कोंडाळे करून उभे राहिले. कधी ना कधी तर घराचं स्वप्न पूर्ण होणार म्हणून प्रभाकरचे डोळे लुकलुकले आणि ठरले. दुसऱ्या दिवशी तीन हजार रुपये कर्जाऊ जमवून प्रभाकरने कागद हस्तगत केले. पुन्हा तेच ‘ये रे माझ्या मागल्या.’ किरायाच्या घरातल्या आल्या दिवसांना धक्के मारत जगणे सुरू होते. प्रकाश आता मोठा दिसू लागला. त्याला मिसरूड फुटली होती. एक दिवस घराची साफसफाई उत्साहाने सुरू होती. प्रभाकरराव पलंगाखालील लोखंडी पेटी ओढून तिची साफसफाई करू लागले. तेव्हा अचानक पेटीच्या तळाशी कोणे एकेकाळी ठेवलेले काही कागद हाताला लागले. त्यांनी घाईने ते उघडून बघितले. ते त्या प्लॉटचे खरेदीखत होते. त्या प्लॉटची स्थिती काय असावी? त्या बाबूलालची कधीची बदली झाली आणि त्याच्या साळ्याचाही काही थांगपत्ता लागत नव्हता. इतक्या वर्षात एकदाही आपण तिकडे का फिरकलो नाही, याचे प्रभाकररावांना आश्चर्य वाटत होते. रविवार. सुट्टीचा दिवस. आज प्रभाकरराव सकाळीच शांताला स्कूटरवर बसवून प्लॉटच्या दिशेने निघाले. तिथे घरांच्या रांगाच्या रांगा, पथदिवे, ड्रेनेज लाईन झाल्याचे दिसत होते. सगळे लोक राहायला आले आहेत, हे बाहेर वाळत घातलेल्या कपड्यांवरून स्पष्ट होत होते. प्रत्येक घरावर क्रमवार प्लॉट नंबर होते. रस्त्याच्या दोन्ही बाजूला न्याहाळत दोघेही हळूहळू जात होते. ‘‘बाप रे बाप इकडे तर चांगला विकास झालेला दिसतोय!’’ शांता चकित होऊन म्हणाली. ‘‘आपला एकशेसोळा नंबरचा प्लॉट इतक्यातच कुठेतरी असावा.’’ प्रभाकरराव क्रमाने बघत त्या दिशेने जाऊ लागले. कोपऱ्यात ले-आऊटचा नकाशाही होता आणि काय आश्चर्य, संपूर्ण ले-आऊट आता अधिकृत झाल्याची नोंद होती. आजूबाजूला छान टुमदार घरे असून मधला एकशेसोळा नंबरचा प्लॉट रिकामा होता. दोघांनाही जणू आभाळ ठेंगणे झाले. झालं, आता बऱ्यापैकी पैसे गाठीशी होते. लवकरच तेथे एक प्रशस्त आणि हवेशीर घर आकारू लागले. प्रभाकरराव आपल्या हक्काच्या घरात राहायला आले. इतक्या दिवसांचे स्वप्न साकार झाले म्हणून त्यांनी घराचे नाव ठेवले ‘स्वप्न-साफल्य.’ बारावीनंतर प्रकाश आता पुढील तांत्रिक शिक्षणासाठी पुण्याला गेला. भावुक होऊन एकदा प्रभाकरराव बायकोला म्हणाले, ‘‘शांता, हे घर माझं जीवनधन आहे. एकमेव लौकिक संपत्ती माझ्यासाठी मोठी बाब आहे. मी हे घर माझ्या हयातीत कधीच विकायला काढणार नाही.’’त्यानंतर माझी पण बंगळुरू येथे बदली झाल्याने नागपूरशी संबंध जणू तुटला. प्रकाश माझा मित्र, पण दोघांचे मार्ग भिन्न झाले. प्रकाशला खाजगी नोकरी लागली तसं त्याचं लग्न झालं. सुषमाचा स्वभाव व्यवहारी होता. तिचा भाऊ मंदार गुप्ते हा बिल्डर होता. त्या दिवशी सकाळी प्रभाकरराव वृत्तपत्र वाचत बसले होते. तेवढ्यात आतून प्रकाश आला. ‘‘बाबा, मला तुमच्याशी काही बोलायचं आहे. मी तुमचा एकुलता पुत्र असल्याने पुढे हे घर माझंच तर होणार म्हणून एक विचार मनात आलाय. ‘‘बाबा, आपण आपल्या या घराच्या जागी बिल्डर मंदारकडून स्कीम बनवू या. तेथे खाली दुकाने, मागे पार्किंग आणि वरती काही गाळे काढू. त्यामुळे मला तुटपुंज्या वेतनाची नोकरी सोडून तेथे स्वतःच्या जागेत दुकान थाटता येईल. वर आपली राहण्याची सोय...’’ ‘‘थांब थांब. पुढे एक शब्द बोलू नकोस! प्रकाश मला कळतोय तुझा मनसुबा. पण एक सांगू? हे घर माझं जीवनधन आहे. मी अगदी स्पष्टच सांगतोय. काहीही होवो, या घरची विक्री करण्याची अजिबात इच्छा नाही. ’’ ‘‘बाबा, काय हरकत आहे. हे घर आता जुनं झालंय.’’ ‘‘बेटा प्रकाश, इथल्या गैरसोयींशी आमचं नातं जुळलंय रे! इथल्या गिलावा पडलेल्या या जुन्या- पुराण्या भिंती आम्हाला साद घालतात. इथल्या एकेक प्रेमळ आठवणी अजूनही मूक संवाद साधतात. हे जुनेपण आमचं वैभव आहे. शांताई भावुक होऊन बोलत होती. आता पडद्याआडून संभाषण ऐकणारी सुषमा पुढे येऊन बोलू लागली. ‘‘बाबा, हे सगळं भावनिक आहे. आम्हाला आता बदल हवाय. नाहीतर आम्ही घरातून निघून जाऊ कायमचे!’’ ‘‘तुम्ही काय जाता त्या आधी आम्हीच निघून जाऊ!’’ आणि प्रभाकरराव उठून तरातरा बाहेर निघून गेले. अशातच आठ दिवस गेल्यावर एक दिवस सकाळी ते म्हणाले, ‘‘अरे प्रकाश, आम्ही किती दिवसांचे सोबती. मला काय करायचंय. तू थोडा धीर धर म्हणजे मलाही बरे वाटेल आणि तुझेही काम होऊ शकेल. तू तुझ्या आईला मात्र कधी अंतर देऊ नको. तिची काळजी घे म्हणजे झालं!’’ ‘‘बाबा, खूप चांगला सौदा होतोय. ग्राहक पण तयार आहेत. प्रभाकरराव यावर काही बोलले नाही. पण त्यांना खोकल्याची विलक्षण ढास लागली. तब्येत अस्वस्थ वाटू लागल्याने पडून राहिले. शांताबाई उशाशी बसून रडत होत्या. दुसऱ्या दिवशी मंदार आणि काही मंडळी प्रकाशसोबत चर्चा करीत होते. समोरच्या खोलीत घराची चर्चा सुरू होती आणि आतल्या खोलीत प्रभाकररावांना घरघर लागली होती. तब्बल १० वर्षांनी मी नागपुरात आलो. सहज आठवण आली म्हणून वाटलं प्रभाकररावांना भेटावं. मी दुपारच्या वेळेस ‘स्वप्न साफल्य’ घराच्या दिशेने निघालो; पण काय आश्चर्य तेथे आता ‘स्वप्न-साफल्य’ऐवजी ‘ड्रिम रेसिडन्सी’ असे नाव असलेली बहुमजली इमारत उभी होती. प्रकाशचे नाव बघून बेल दाबली. सुषमाने दरवाजा उघडला. पाठोपाठ प्रकाश आला. ‘‘ये ये...’’ प्रकाशने मला बसायला खूण केली. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. ‘‘छान सजवलंय रे घर. मी इकडे तिकडे बघत नजर टाकत बोललो.’’ ‘‘होय, बघ आता घर...’’ असं म्हणून प्रकाश घर दाखवू लागला. अरे प्रकाश, तू सगळं छान दाखवलं. मी बघितलं, पण बाबा कुठे आहेत तुझे? त्यांना जरा भेटून, मग मी निघतो. फ्लाईटची वेळ झालीय बघ!’’ प्रकाश क्षणभर थबकला. मग आतल्या खोलीत घेऊन गेला. ‘‘अरे प्रभाकारकाका- शांताकाकू कुठे आहेत?’’ यावर प्रकाशने अंगुलिनिर्देश केला. भिंतीवर दोन्ही बाजूला उदबत्त्या असलेले फोटो लागले होते आणि चंदनाचा हार घालून प्रभाकरराव आणि शांताकाकू जोडीने स्मित करत होते.

मो. बा. देशपांडे

प्रभु रामचंद्रांचे सद्गुरू म्हणून नाम, वर्णन, भक्ती, उपासना आणि चरित्र या गोष्टींचे समर्थ रामदासस्वामी अनेक प्रकारे, अनेक ठिकाणी स्तवन करतात. त्यांनी अनेक नाममुद्रा घेऊन भक्तीरचना केलेल्या आहेत. त्यांचे साहित्यामध्ये रामदर्शनाचे विलाभनीय इंद्रधनुष्य आहे. त्यांनी वाल्मिकी रामायणातील रामापेक्षा वेगळा, 'देवबंधमुक्ती' करणार्या योद्ध्या रामाचा, संत एकनाथांच्या भावार्थ रामायणातून स्वीकार केला. 'धर्म जागो राघवाचा।' म्हणत समर्थांनी समाजात स्वत्वाचे, सामर्थ्याचे जनजागरण केले.

लेखांक ३२

# संत रामदासस्वामींचा रघुवीर समर्थ

## (भाग तिसरा)

...रघुनंदन
विद्याधर ताठे
भ्र.९८८१९०९७७५



श्री समर्थांनी आपले सद्गुरू, आपले स्वामी प्रभू रामचंद्रांचे अनेक प्रकारे, अनेक ठिकाणी स्तवन केलेले आहे. वेगवेगळ्या ग्रंथरचनेत, स्फुट रचनेत त्यांनी रामचंद्रांचा महिमा गायलेला आहे. रामभक्तीभावाचे हे समर्थकृत विविधरंगी इंद्रधनू मोठे विलक्षण आहे. या सर्व रामस्तुतीपर रचना मुळातूनच वाचणे एक आनंददायक गोष्ट आहे.

१) समर्थकृत ओवी शतकांतील एक शतक रामचरित्रपर आहे.
२) एकवीस समासीत रघुनाथध्यान (समास क्र.२) आणि रघुनाथचरित्र (समास क्र. १५) असे दोन समास आहेत. ३) सगुणध्यान व निर्गुणध्यान अशी दोन प्रकरणे
४) रामायणपर १४६२ ओव्यांची दोन कांडं, सुंदर कांड व युद्धकांड.

असे त्याचे बहुतांश साहित्य राम रंगी रंगलेले रामरूप आहे. श्रीरामचंद्रांचे नाम, वर्णन, भक्ती, उपासना, चरित्र या गोष्टी समर्थांनी विशद करतानाच अनेक ठिकाणी रामकृपेचे वर्णन केलेले आहे. आपल्या सर्व साहित्यकृतीचे, रचनांचे श्रेय प्रभू रामचंद्रांच्याच चरणी अर्पण केलेले आहे. '**कास या रघुनाथाची। धरिता सुख पावलो।**' या नाशिक पंचवटीत रचलेल्या एका पदात समर्थ म्हणतात-

**१) हे ज्ञान रामकृपेने। धन्य राम उपासना।**
**रामदास्य घडे ज्याला। ते सर्वत्र रामदास हो।।**
**२) रामराजा दयासिंधु। वोळला सेवकावरी।**
**रामदासी ब्रह्मज्ञान। सारासार विचारणा।।**

समर्थांनी ज्या विविध प्रकारच्या विपुल रचना केल्या त्या वेगवेगळ्या नाममुद्रेने केलेल्या आहेत. 'रामदास म्हणे','दास म्हणे' प्रमाणेच आपणास रामी रामदास, देवदास, राघव, निजदास, कवि अशाही नाममुद्रा आढळतात. दासविश्रामधामामध्ये समर्थांच्या ३६ नाममुद्रांची नावेच दिलेली आहेत. त्यात वरील नाममुद्रांशिवाय बंदे, जिंदे, फकीर, रसिक, भक्त, गण अशा नाममुद्राचा उल्लेख आहे.

### राघवाचा धर्म जागो:-

संत रामदासांनी प्रभू रामचंद्रांचा वेगवेगळ्या विशेषणांनी स्तुती, गौरव केलेला आहे. त्यातील समर्थांचे आवडते-लाडके विशेषण म्हणजे 'सूर्यवंशाचे मंडण' पुढील दोन अभंग चरण पहा-

**सूर्यवंशाचे मंडण। रामदासाचे जीवन।।** अभंग गाथा (९/३) **सूर्यवंशाचे मंडण। रामदासाचे भूषण ।।** (गाथा ११/४) संत ज्ञानदेवांनी एका अभंगात 'धर्म जागो निवृत्तीचा' असे म्हटले आहे. या चरणातील निवृत्ती शब्द गुरू निवृत्तीनाथ वाचक आहे. संत ज्ञानदेवांप्रमाणेच समर्थ रामदास 'धर्म जागो राघवाचा।' अशी साद घालतात. या वेगवेगळ्या शब्दावलीत वरवर भेद दिसत असला तरी त्यांचा भाव एकच आहे आणि तो काहीसा कालसापेक्ष आहे.

निवृत्तीनाथांचा आणि राघवांचा धर्म हा मूलतः भागवत धर्मच आहे. या भागवत धर्मालाच समर्थांनी 'महाराष्ट्र धर्म' म्हटले अहो. संत ज्ञानदेवांचे '**जे जे भेटे भूत। ते ते मानिजे भगवंत।**' या ओवीतील विश्वात्मक भाव आणि समर्थांच्या 'नारायण असे विश्वी। त्याची पूजा करीत जावी।' या ओवीतील वैश्विकभाव एकच आहे.

'हे महाराष्ट्राचे खरे नाथ होय।' अशा शब्दात न्या. रानडे यांनी ज्यांचा गौरव केला ते संत एकनाथ आणि समर्थ रामदास यांच्या कार्यातील एक समानसूत्र म्हणजे प्रभू रामचंद्र! संत एकनाथ हे संत रामदासांच्या मावशीचे पती होते असा त्यांचा नातेसंबंध सांगतात. समर्थांचे मामा, किर्तनकार भानजी गोसावी हे संत एकनाथांचे अनुग्रहित होते. (संदर्भः सुनील चिंचोळकरः चिंता करिता विश्वाची). 'हनुमंतस्वामींची बखर' मध्ये सूर्याजीपंत आपल्या दोन्ही मुलांना (श्रेष्ठ व समर्थ) घेऊन पैठणला संत एकनाथांच्या समाधी दर्शनास गेल्याचे बखरकार म्हणतात.

समर्थ व संत एकनाथ यांच्यातील साम्याचा आणखी एक वाड्मयीन दुजोरा म्हणजे- संत एकनाथांनी भावार्थ रामायणात 'देवबंध मुक्ती करणारा योद्धा राम' शब्दांकीत केलेला आहे आणि तो वाल्मिकी रामायणातील रामापेक्षा वेगळा आहे. समर्थांनीही आपल्या रामायणात सीतामुक्ती ऐवजी रावणाच्या कैदेतील देवांची बंधमुक्ती करणारा रामच साकारलेला आहे.

फेडावया देवाची साकडी। स्वधर्म वाढवावया वाढी।
**नामे मोक्षाची उभवावया गुढी।**
**सूर्यवंशा गाढी दशा आली।।**
**तोडी नवग्रहाची बेडी। सोडवी देवांची बांधवडी।**
**उभवी रामराज्याची गुढी। आज्ञा धडपुडी तिही लोकी।**

देवबंधमुक्ती ही संकल्पना संत एकनाथांची, ती समर्थांनी अधिक ठळकपणे पुरस्कारली.

या संदर्भात काही संशोधक अभ्यासकांची मते पहा- डॉ. रा.चिं ढेरे म्हणतात,संत एकनाथांची भावार्थ रामायणातील राम-चरित्रामागची भूमिका, समर्थांनी पुरस्कारलेली होती. देवांच्या बेड्या तोडणारा आणि रामराज्याची गुढी उभारणारा संत एकनाथांचा 'राम'च समर्थांच्या हृदयात ठाण मांडून राहिला होता. (संदर्भः विविधा).

आणखी एक थोर चिंतक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, समर्थांच्या आई राणूबाई यांच्या माहेरी संत एकनाथांचा भक्तीसंप्रदाय होता. त्याचा प्रभाव लहान नारायणावर पडून घरचा रामोपासनेचा ठसा अधिक दृढ बनला. त्यामुळे पुढे रामदास हे एकनाथांचेच अवतार होत असे संप्रदायात म्हणू लागले. (संदर्भ : महाराष्ट्रधर्माचे प्रणेते).

डॉ. वसंत स. जोशी यांनीही 'समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड सुवर्णमहोत्सव विशेषांकातील लेखात (पान क्र.२१०)अशाच आशयाचा विचार मांडलेला आहे. वि.ल.भावे, महाराष्ट्र सारस्वत (पान २०६) म्हणतात, तुलसीदास, कबीर इत्यादी साधु रामाचेच भक्त होते. पण त्यांच्या रामाचा स्वीकार रामदासांनी केला नाही. त्यांना काही कारणास्तव रामाच्या विशिष्ट स्वरूपाचा अवलंब करावासा वाटला म्हणून रामभक्तीचे इतर पंथ विद्यमान असताही त्यांनी आपला नवीन रामदासी संप्रदाय स्थापन केला. पण या विधानाला समर्थ रामदासांचीच एक रचना पूर्ण छेद देणारी आहे. म्हणोनि आम्ही रामदास। 'सगुणध्यान' रचना सर्वत्र प्रसिद्ध आहे. त्यामध्ये 'स्वरूप संप्रदाय अयोध्यामठ।' असा स्वरूप संप्रदायाचा सुस्पष्ट उल्लेख आहे. 'रामदासांचा रामभक्ती पंथ प्रकाश, आनंद, स्वरूप आणि चैतन्य ह्या संप्रदायांपेक्षा निराळा आहे.' असे श्री वि.का.राजवाडे- भावे म्हणतात ते एकांगी आहे.

!! जय श्रीराम !!

# 'सदा शहाणे' सेवाभावे बनावे

अमृतकुंभ
प्रा. वसंत गिरी
भ्र. ९०११२२९२३२



गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी एका आलिशान कारमध्ये बसलेल्या तीन प्रवाशांना पकडून ओलिस ठेवले. आमच्या विद्रोही चळवळीला हे गर्भश्रीमंत नेहमीच विरोध करतात. आमच्या चळवळीची माहिती पोलिसांकडे पोहोचवतात. शासनदरबारी आमच्या विविध तक्रारी करुन चळवळ खिळखिळी करणाऱ्या या नराधमांना त्वरित यमसदनी पाठविले पाहिजे. हा विचार त्यांच्या डोक्यात थैमान घालू लागला. त्या अवस्थेत एक मानवधर्म मात्र त्यांना महत्वाचा वाटला. त्यामुळे त्यातला एक म्हणाला, बोला तुमची अंतिम इच्छा काय आहे? त्यातले दोघे अतिशय घाबरले होते. अक्षरश: लटलट कापने कशाला म्हणतात? ते त्यांच्याकडे पाहूनच कळत होते.

त्यातला एक म्हणाला, मला माझ्या कुटुंबाला भेटायचे आहे. फक्त एकदाच नक्षलवादी ही अट मान्य करणे शक्यच नव्हते. याउलट दमबाजी करुन त्याच्या कानाखाली एक ओढली. पुढे त्याला काहीच सूचत नव्हते. अर्धमेला होऊन तो जागीच बेशुद्ध पडला. त्यांनी दुसऱ्याला विचारले, काय आहे तुझी अंतिम इच्छा? चल बोलं लवकर? तो म्हणाला, मला माझ्या धर्मग्रंथाचे पठन करायचे आहे. त्यावर नक्षलवादी आणखी चिडले, कोण आणून देणारं तुला तुझा धर्मग्रंथ, या घनदाट जंगलात? असली कामं करायला आम्ही काय तुझ्या बापाचे नौकर आहोत का? हरामखोर साला. असे म्हणून त्याच्याही एक मुस्काटात ठेऊन दिली. तोही अर्धमेला होऊन निपचित पडला. तिसरा मात्र अगदी निश्चिंत होता. स्थितप्रज्ञ अवस्था म्हणतात ती हीच का? असे पहाणाऱ्यास वाटावे अगदी तीच अवस्था. क्षणभर त्यांच्या मनात धडकी भरली. हा कुणीतरी दीव्य पुरुष असला पाहिजे किंवा भूतकेत तरी? त्याला थोडे घाबरत त्यांनी विचारले. बोला काय अंतिम इच्छा आहे आपली? त्यावर हा सद्गृहस्थ म्हणाला, सर्वात अगोदर मी तुम्हाला वाल्याचा वाल्मीकी कसा झाला? हे पटवून देणार, त्यानंतर भगवत गीतेचे सारं सांगणार, त्यानंतर तुकारामांच्या अभंगाचा अर्थ सांगणार. मला खात्री आहे तुमच्यात सज्जन माणसांचा अंश आहे. तुम्ही सध्या जे वाईट काम करत आहात, त्याचा तुम्हाला नक्की एकदिवस पश्चात्ताप होईल. हे त्या सद्गृहस्थाचे विचार ऐकताक्षणी बेशुद्ध पडलेली ती दोघे ताडकन उठली आणि एका सूरात म्हणाली, ते सर्व ऐकण्यापूर्वी आम्हाला गोळ्या घाला. हा प्रसंग ऐकुन विनोदाचा आस्वाद घेणारे उपस्थितजन जाम खूष झाले. हा विनोद मनुष्य वर्तनातील पहिला दोष असा दाखवतो. विधायक विचार स्विकारण्याऐवजी मरण परवडले, अशा नकारात्मक विचारसरणीचे लोक समाजात आहेत.

दुसरा विचार असा की ज्यांना ज्ञानाची आवश्यक्ता आहे, त्यांना ते देण्याचा प्रयत्न झाल्यावर स्वार्थी, लबाड व चतुर माणसं अशीच खडबडून जागी होतात. वंचित, पिडीत, शोषित समाजाच्या चुकांचे भांडवल करणारा महाज्ञानी समाज त्यांना सर्वमान्य प्रवाहात सामिल करुन घेण्यास कधी धजावला नाही किंवा परिवर्तन करु पहाणार्या अग्रदूतास विरोध करण्याचे काम मानवी जीवनाचे अवतारकार्य समजून करीत राहिला. अगदी आपल्या चेहर्यावरील सभ्यतेचा बुरखा कायम ठेवुन. नेहमीसाठी वास्तवता लपवून आभास निर्माण करणार्या लोकांची अवस्था कशी होते. हे एका विनोदाच्या सहाय्याने आपल्याला समजून घेता येईल. डॉ.सदाशिव दामोदर शहाणे यांचे एम.डी. पूर्ण झाले. त्याची पूर्ण शैक्षणिक पात्रता विशेष प्राविण्याने परिपूर्ण होती. त्यामुळे त्याचे पाय जमिनीवर नव्हतेच.'घे भरारी' हाच एक ध्यास त्याच्या जीवनाचा श्वास झाला होता. अर्थात यात चूक असे काय होते? त्यांनी कर्ज काढून सर्व सुविधांनी युक्त असे रुग्णालय उभे केले. माझ्या ज्ञानामुळे माझ्या रुग्णालयातील रुग्ण कधीच कमी होणार नाहीत. हा त्याचा अहंकार मात्र काही केल्या कमी होत नव्हता. रुग्णालयाचे शाही उद्घाटन झाले. पण काही केल्या रुग्णालयात रुग्ण मात्र येत नव्हते.डॉक्टरची अस्वस्थता त्यामुळे वाढत चालली.काही दिवसांनंतर एक दिवस सकाळी एक गृहस्थ त्याच्याकडे आले.त्याने बाहेर जाऊन खात्री करुन घेतली. आज सूर्य पश्चिमेला तर उगवला नाही? तो आत आल्यावर त्याने फोन उचलला. त्याचे स्वगत सुरु झाले. हॅलो...कोण बोलताय, नाही नाही.. आज माझ्याकडे खूप पेशंट आहेत. आज होम व्हिजिट. शक्यच नाही. संध्याकाळी मला फोन करुन या. काय, फोनवरुन औषधी? मुळीच नाही. इथे येवून माझी रितसर फी भरा महाशय! त्यानंतर काही चाचण्या कराव्या लागतील. योग्य निदान झाल्यावरच औषधीचे पुढे पाहू...त्यांनी लगेच रागारागाने फोन ठेवला आणि दहा मिनिटांपासून बसवून ठेवलेल्या त्या गृहस्थाला ते म्हणाले, बोला काय त्रास आहे तुम्हाला? त्यावर तो गृहस्थ म्हणाला, मी प्लंबर आहे, डॉक्टरसाहेब. तुमची पाईपलाईन खराब आहे असं फोन करुन डॉक्टरीनबाईंनी मला सांगितलं, पण काम सुरु करायच्या आगुदर हजार रुपये अॅडव्हांस घ्या, असं माझ्या घरवालीनं सांगितलं. तुमचा दवाखाना काही चालत नाही. पण मी उधारीवर काम करुन हात हालवत घराकडं गेलो तर घरवाली मला भाकर देणार नाही बघा. त्याच्या दीर्घ संवादाने स. दा. शहाणेची कुंडलीच बाहेर आली. त्या संवादाने त्याला भोवळ आली आणि तो पटकन खुर्चीत बसला. एक लांब सुस्कारा सोडत तो मनाशीच म्हणाला, माझ्यासारखा स. दा. महामूर्खे मीच.

डॉ. स. दा. शहाणे यांचा दवाखाना ओस पडण्याचे कारण त्याच गावात डॉ. सेवालाल वासुदेव भावे हे रुग्णसेवा देण्यात खूप तत्पर होते. नावाप्रमाणेच हे डॉ. से.वा.भावे, दिवस असो की रात्र चोविस तास निरंतर सेवा देण्यात सदैव पुढेच. बरे जो मिळेल तो मोबदला स्विकारुन नेहमी प्रसन्न राहणार. गरीब पेशंटकडून काहीच अपेक्षा नाही. आपला दवाखाना, आपले घर, राहणीमान याविषयी कधीही खेद, खंत, चिंता केव्हाच नाही. एकदा मध्यरात्री त्यांना सेठ भिकारीलाल यांचा फोन आला. हॅलो... मी सेठ भिकारीलाल बोलतोय. माझी तब्येत बिघडली आहे. आपण शक्य तेवढ्या लवकर या. पैशाची चिंता करु नका. मी चोविस तास पैशातच लोळत असतो. यावर डॉ. से. वा. भावे म्हणाले, तुम्ही गरीब असता तर मी यावेळी तुमच्यासाठी अवश्य आलो असतो पण तुमच्याकडे गडगंज पैसा असल्यामुळे मी तुम्हाला माझ्यापेक्षा उच्चशिक्षित आणि खूप हुशार डॉक्टर पाठवू शकतो. डॉ.स. दा. शहाणेचा मोबाईल नंबर घ्या आणि त्याला फोन करा. डॉ शहाणेला फोन गेला. फोन जाताच तो आनंदाने हरकून गेला. दवाखाना उघडून जवळपास एक महिना होऊन गेला. चातकासारखी मी पेशंटची वाट पहातोय. आज पहिला पेशंट मिळतोय. तोही गडगंज संपत्तीवाला, भगवान के घरपे देर है, मगर अंधेर नहीं. यामागे नियतीचा निश्चितच चांगला हेतू असेल. चल जल्दी भाग. स. दा. असे मनाशीच बोलून तो फोर व्हिलर घेवून निघाला. सेठ भिकारीलाल बाहेरच उभे होते. ते गाडीत बसले आणि म्हणाले, गाडी स्टेशनवर घ्या तिथे पेशंट आला आहे. स. दा. शहाणेची गाडी रेल्वे स्टेशनच्या दिशेने सुसाट निघाली. रेल्वे स्टेशनला लागली होती. सेठ भिकारीलाल व त्यांच्यासोबत असलेला नोकर सरळ रेल्वेत जाऊन बसले. स. दा. शहाणे त्यांची बावळटासारखा वाट पहात बसला. थोड्या वेळाने त्याच्या मोबाईलवर कॉल आला. डॉक्टर एवढ्या रात्री आम्हाला रिक्षा मिळत नसल्यामुळे अशी शक्कल लढवावी लागली.

स्टेशनला पोहचून दिल्याबद्दल मनापासून धन्यवाद. स.दा. शहाणे मनाशीच म्हणाला, हा केवळ नावाचाच भिकारीलाल नाही. हा प्रसंग माझ्यावरच का आला? हे मी विसरणेच हिताचे. आपल्या नशिबाला आपण दोष दिला पाहिजे. तो अतिशय वैफल्यग्रस्त अवस्थेत घरी आला. रात्रीचा दिड वाजला होता. रात्रभर तो अस्वस्थ होता. सकाळपर्यंत त्याला झोप आली नाही. माझं नेमकं काय चुकतंय? हा प्रश्न सारखा तो आपल्या मनाला विचारुन विचारुन बेचैन झाला. अगदी सकाळी सकाळी त्याला झोप लागली आणि एक गोड स्वप्न त्याला पडलं. ओळखीचाच एक आवाज त्याच्या कानावर आला. डॉ. शहाणे रुग्णसेवा हे महान मानवी कार्य आहे. आपण जेव्हा हे सेवा कार्य समजून करतो, तेव्हा त्यातला मानसिक आनंद खूप मोठा असतो. तो मिळविणे आपला प्रथम आणि अंतिम हेतू आहे असं समजून कार्यरत व्हा. तेव्हा तुम्हाला पैसाही मिळेल आणि सेवेचा आनंद सुद्धा. सेवाभावात जेव्हा ही अमानवीय वृत्ती येते, तेव्हा तुम्ही मानसिक समाधान गमावून, फक्त धावत सुटता. हे नियतीला मान्य नाही. आपण लुटारु किंवा कसाई नाही. हे सदैव लक्षात असू द्या. शेवटच्या क्षणी डॉ. शहाणेला डॉ. भावेंचा स्पष्ट चेहरा दिसू लागला. तो खडबडून जागा झाला तो कायमचाच. नावाप्रमाणे स. दा. शहाणे राहून केवळ व्यवहारवाद जगणे हे मानवी कार्य होऊच शकत नाही. डॉ. से. वा. भावे जगतात ते खरे मानवी कार्य. त्या कार्यातून मानवी जीवनाच्या कल्याणाचा वसा घेऊन जगणे हेच सदा शहाणपणाचे लक्षण. सदा सेवाकार्याचा ध्यास लागावा. या कार्यात माणूस जोडावा. त्यात मानवता उजळून निघावी.

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

थोडं मनातलं
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

## (भाग ९)

महात्मा गांधी, लोकमान्य टिळक आणि इतर काही महत्वाच्या नेत्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात स्वदेशी वस्तू वापरण्याचे आवाहन लोकांना केले होते. त्याची सुरुवात बंगालमध्येच कलकत्याच्या टाऊन हॉलमध्ये ऑगस्ट १९०५ मध्ये अधिकृतपणे झाली. बंगालच्या फाळणीला लोकांचा विरोध होता. हा विरोध लोकांनी 'वंदे मातरम' गाऊन व्यक्त केला. एकतेचा निर्धार केला. या प्रसंगी रवींद्रनाथांनी 'आमार शोनार बांगला' या गीताची रचना केली. पुढे हे गीत बांगला देशाचे राष्ट्रगीत म्हणून स्वीकारण्यात आले. यावेळी उपस्थितांनी विदेशातून आलेले कापड वापरायचे नाही असा निर्धार केला.

रवींद्रनाथ आणि त्यांचे सहकारी शांतिनिकेतनमध्ये स्वदेशी वापरावरच भर देत होते. स्थानिक कारागिरांनी हातमागावर तयार केलेले कापड रवींद्रनाथ, त्यांचे सहकारी आणि विद्यार्थी वापरत असत. त्या कापडावर स्थानिक कारागिरांनी सुरेख असे नक्षीकाम केलेले असे. टागोरांच्या शांतिनिकेतनात श्रीमंती आणि ऐश्वर्याला स्थान नव्हते. पण तेथील लोकांची मनाची श्रीमंती इतकी मोठी होती की, त्यांना पैशाने मिळणार्या सुखसोयी, भोगविलास आदींची आठवण सुद्धा येत नसे.

माणसे जोडण्याची कला टागोरांपाशी उत्तम होती. अत्यंत विद्वान आणि ऋषितुल्य माणसे त्यांच्या शांतिनिकेतनात मोठ्या आनंदाने राहत होती. तिथे काम करण्यासाठी स्वतःहून येत होती. शिवाय हे सगळे पैशांची कोणतीही अपेक्षा न करता. तेथे जे काही मिळे, त्यावर ते संतुष्ट असत. या मंडळींचे धनभांडार भलेही अल्प असेल, पण त्यांच्याजवळ ज्ञानाची श्रीमंती मोठी होती आणि ती उदार हस्ते ते आपल्या सहकार्यांना आणि विद्यार्थ्यांना वाटत होते.

शांतिनिकेतनमध्ये नंदलाल बोस हे विख्यात चित्रकार होते. ते नवनवीन डिझाइन्स तयार करीत. आज आपण ज्याला ग्राफिक्स म्हणतो, त्या चित्रकलेची सुरुवात त्यांच्यापासूनच झाली असे म्हणायला हरकत नाही. आपल्या चित्रकलेच्या प्राचीन परंपरेचे पुनरुज्जीवन व्हायला तिथूनच सुरुवात झाली. पण रवींद्रनाथांच्या बाबतीत एक गोष्ट मान्य केली पाहिजे की आपल्या



प्राचीन रूढीपरंपरांचं अंधानुकरण त्यांना अमान्य होतं. त्यातील जे-जे उत्तम ते स्वीकारायला ते नेहमीच आघाडीवर असत. त्याचबरोबर आधुनिक विज्ञानाने केलेली प्रगती, सुधारणा यांनाही त्यांचा विरोध नव्हता. किंबहुना त्यांच्या शांतिनिकेतन आणि श्रीनिकेतन यांच्यात प्राचीन आणि अर्वाचीन यातील चांगल्या गोष्टींचा सुरेख संगम झाला होता.

आपल्या देशातील शेतकऱ्यांनी शेती करण्याच्या तंत्रात होत असलेल्या आधुनिक सुधारणा लक्षात घेऊन शेती केली पाहिजे असे त्यांना वाटे. त्या गोष्टी आपल्याकडील शेतकर्यांनी शिकून घ्यायला हव्यात अशी त्यांची इच्छा होती. श्रीनिकेतनची स्थापना याचसाठी झाली होती. रवींद्रनाथांच्या प्रेरणेने तिथे आधुनिक शेतीतील प्रयोगांना सुरुवात झाली. नवनवीन गोष्टींच्या संशोधनाला प्रोत्साहन मिळावे म्हणून प्रयोगशाळांची स्थापना झाली. त्यालाच जोडून ग्रामीण भारतातील लोकांच्या आरोग्याचा अभ्यास करण्यात आला. लोकांना होणारे आजार, त्यावरील उपचार यावर संशोधन सुरु झाले.

शेतीच्या कामात रवींद्रनाथांना मदत करण्यासाठी प्रा. एल्महर्स्ट हे ब्रिटिश शेती तज्ज्ञ श्रीनिकेतनात येऊन राहिले. रवींद्रनाथांच्या कार्यपद्धतीमुळे ते अतिशय प्रभावित झाले होते. शांतिनिकेतन आणि श्रीनिकेतन येथील शिक्षण आणि शेतीचे प्रयोग पाहून त्यांनी इंग्लंडमध्ये परत गेल्यावर तिथल्या एका लहानशा खेड्यात शांतिनिकेतनासारखे शिक्षण देणारी शाळा सुरु केली. रवींद्रनाथांचे शिक्षण आणि शेतीचे प्रयोग पाहून प्रभावित झालेल्या प्रा एल्महर्स्ट यांनी रवींद्रनाथांवर 'The Poet and the Plough' हे सुंदर पुस्तक लिहिले. श्रीनिकेतनातील प्रयोग पाहण्यासाठी आणि त्यांच्या आपल्या शेतीत होणार्या प्रयोगांची देवाणघेवाण करण्यासाठी अनेक जपानी शेतकरी देखील तिथे येऊन राहिले होते.

रवींद्रनाथांच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव एवढा दांडगा होता की विविध क्षेत्रातील दिग्गज मंडळी तेथे येऊन राहत. यात देशातील तसेच विदेशातीलही अनेक मंडळी असत. शांतिनिकेतनात तिबेटातील लामा येऊन राहिले. भारतीय संस्कृतीचा अभ्यास करणार्या सिल्व्हेन लेवींसारख्या फ्रेंच महापंडितांचा निवास तेथे राहिला आहे. सिल्व्हेन आणि रवींद्रनाथांची भेट पॅरिसमध्ये १९२०-२१ च्या सुमारास झाली. ते प्राच्यविद्यापंडित होते. ते पॅरिसमध्ये संस्कृतचे अध्यापन करीत होते. त्यांनी लिहिलेला संशोधनपर ग्रंथ The Indian Thearte हा आजही प्रमाण मानला जातो. या भेटीत रवींद्रनाथांनी त्यांना विश्वभारतीत येण्याचे आमंत्रण दिलं. त्यांनीही ते तात्काळ स्वीकारलं आणि काही काळ येऊन ते शांतिनिकेतनात राहिले. या काळात त्यांनी विद्यार्थ्यांना फ्रेंच, चिनी आणि तिबेटी भाषा शिकवल्या. परत गेल्यावर आपल्या पत्रात त्यांनी रवींद्रनाथांना लिहिले आहे, शांतिनिकेतन जगातील सर्वात विकसित शिक्षण संस्थामंध्ये कधी स्थान प्राप्त करील ते मला माहिती नाही पण तुम्ही एक अतुलनीय शांततेचे निवासस्थान तयार केले आहे. तेथील आम्रवृक्षांच्या रम्य वातावरणात, शाळेच्या परिसरात फिरायला मला आवडेल. तेथील पक्ष्यांचे कूजन, संगीत, श्लोक ऐकणे, प्रिय मित्रांच्या सहवासात काळ घालवणे या गोष्टी माझ्यासाठी आनंदाच्या आहेत. आणि तुमच्या आनंददायी सहवासात पुन्हा कधी वावरायला मिळेल त्याची मला प्रतीक्षा आहे. रवींद्रनाथांच्या आश्रमात मोठ्या आनंदानं राहणारी ही ज्ञानी आणि थोर मंडळी म्हणजे ज्ञान वाटणाऱ्या पाणपोई होत्या. ज्याला कोणालाही काही हवं असेल, त्याच्याजवळ आपल्या ज्ञानाची ओंजळ ही मंडळी आनंदाने खुशाल रिकामी करत. मग ती व्यक्ती विद्यार्थी असो की प्राध्यापक किंवा तिथे असलेली कोणीही सामान्य व्यक्ती. शांतिनिकेतन, श्रीनिकेतन यात वावरणार्या लोकांमध्ये कमालीचा साधेपणा होता. पण या साधेपणातही कमालीचा आनंद भरून राहिला होता. नृत्य, नाट्य, गीत, संगीत, विविध कला यांचा आनंद ही मंडळी घेत असत आणि दुसर्यालाही देत. रवींद्रनाथ जीवनातील सौंदर्याचे उपासक होते. त्यांनी साधेपणाच्या नावाखाली कधीही रुक्षता किंवा कोरडेपणा येऊ दिला नाही. सौंदर्याशी कधीही फारकत होऊ दिली नाही. सत्य, शिव आणि सुंदर ही तिन्ही मूल्ये तिथे हातात हात घालून चालत होती.

साधारणपणे आपला असा समज असतो की पैसा असेल तरच आपण सौंदर्यदृष्टी जोपासू शकतो. पण हा समज रवींद्रनाथांनी चुकीचा ठरवला. त्याचं एक सुंदर उदाहरण या ठिकाणी सांगितल्याशिवाय राहवत नाही. त्यांच्या शांतिनिकेतनमध्ये क्षितिमोहन सेन हे शिक्षक होते. ते अत्यंत विद्वान आणि संत साहित्याचे अभ्यासक होते. त्यांची मुलगी अमिता देखील याच शाळेत शिकत होती. आश्रमात विविध प्रसंगी होणाऱ्या कार्यक्रमांसाठी कलकत्त्याहून श्रीमंतांच्या मुली यायच्या. त्यांच्या अंगावर सोन्याचांदीचे मौल्यवान दागिने असायचे. ते पाहून अमिताला देखील (पान ६ वर)

# ग्रहसंकेत

**(रविवार, ११ ऑगस्ट ते शनिवार, १७ ऑगस्ट २०२४)**

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, ११ ऑगस्ट-** सीतला सप्तमी, सूर्याचे नवनाथ ने पूजन, भानुसप्तमी, भगवान पार्श्वनाथ निर्वाण दिन, गोस्वामी तुलसीदास जयंती, आदित्य पूजन ✻ **सोमवार, १२ ऑगस्ट-** दुसरा श्रावणी सोमवार, शिवपूजन, शिवमुष्टी तीळ, गिरलिंग यात्रा कुकटोळी ता. कवठेमहांकाळ, शंभू महादेव यात्रा शामगाव ता. कराड, जागतिक युवक दिन ✻ **मंगळवार,१३ ऑगस्ट-** दुर्गाष्टमी, नवमी श्राद्ध, मंगलागौरी पूजन, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुण्यतिथी (तारखेप्रमाणे), दुर्गाष्टमी, मंगलागौरी पूजन, आचार्य जयंती ✻ **बुधवार, १४ ऑगस्ट-** दशमी श्राद्ध, पतेती, सदाशिव महाराज पुण्यतिथी अर्जुनवाड ता. शिरोळ, ब्रह्मेद्रस्वामी पुण्यतिथी धावडशी, पतेती, बुध पूजन, सदगुरू सिद्धरामेश्वर महाराज जयंती ✻ **गुरुवार, १५ ऑगस्ट-** फरवर्दिन, स्वातंत्र्य दिन, पारशी नूतन वर्ष १३९४ प्रारंभ, कलश दशमी, बृहस्पती पूजन, कानिफनाथ महाराज पालखी प्रस्थान मोशी ता.हवेली, एकादशी श्राद्ध, पद्मनाभ तीर्थ पुण्यतिथी गुरुमठ कारवार ✻ **शुक्रवार,१६ ऑगस्ट-** पुत्रदा एकादशी, मघा सिंहेर्कः रात्री ७.४४ वाहन-कोल्हा, वरदलक्ष्मी व्रत, जरा जिवंतिका पूजन, द्वादशीश श्राद्ध ✻ **शनिवार,१७ ऑगस्ट-** शनिप्रदोष, भगवान श्री जिव्हेश्वर जयंती, संत नरहरी सोनार जयंती, अश्वत्थ मारुती पूजन, शाकदान, दधिव्रत, विष्णू पवित्रारोपण, शनि प्रदोष, शंकर महाराज पुण्यतिथी कोल्हापूर, शिवयोगी स्वामी पुण्यतिथी अथनी,

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** १३ ऑगस्ट (११नंतर), १५ ऑगस्ट (१५ नंतर) ✻ **डोहाळ जेवण-** १३ ऑगस्ट (११ नंतर), १४ ऑगस्ट (१२ पर्यंत), १५ ऑगस्ट (१५ नंतर) ✻ **जावळ** - मुहूर्त नाही.

### मेष :- अनुकूल- प्रतिकूलही

विसरण्याची सवय सुद्धा खूपच चांगली आहे. सर्व काही आठवलं, तर माणूस कधीच आनंदी राहू शकत नाही. बुधवारी धनस्थानी मंगळ- गुरुची युती तर शुक्रवारी मंगळ- शनी केंद्रयोग होत आहे. त्यामुळे आर्थिक बाबतीत अनुकूल- प्रतिकूलही कालावधी राहील. शिक्षणातून प्रगती होईल. अनावश्यक खर्च टाळणे योग्य. शुभ ता. १५, १६

### वृषभ:- समाधानकारक प्रगती

नातं टिकवण्यासाठी माणूस त्या चुकांची पण माफी मागतो, ज्या चुका त्यांनी कधी केलेल्या पण नसतात. राशीतच बुधवारी मंगळ-गुरुची युती होत आहे. त्यामुळे अंगीकृत कार्यात समाधानकारक प्रगती साधता येईल. नव्या विचारांना चालना मिळेल. स्थावर, वाहनसौख्य लाभेल. फार दगदग करू नका. शुभ ता. १३, १५, १६

### मिथुन:- कला-गुणांचा विकास

नका कोणावर रूसू, आपले जीवन हे घटकाभराचे आज असू तर उद्या नसू. शुक्रवारी व्यातील मंगळाचा शनिशी केंद्रयोग होत आहे. त्यामुळे आर्थिक बाबतीत विचाराने रहावे. कोर्ट प्रकरणे टाळावीत. सरकारी कामे करून घ्यावीत. कार्यक्षेत्रात जागरूक रहावे. कला-गुणांचा विकास होत जाईल. नवे निर्णय विचारपूर्वक स्वीकारावेत. जपून असावे. शुभ ता. १५

### कर्क:- आर्थिक काङ्क होईल

स्वभावाच्या प्रेमात पडलं की चेहरे आपोआप आवडू लागतात. लाभस्थानात होणारी मंगळ- गुरुची युती आपले एखादे आर्थिक काम यशस्वी करणार आहे. प्रशासन सेवेत असणार्यांना विशेष चांगला कालावधी राहील. मंगळ- शनि केंद्रयोग संघर्ष करायला भाग पाडेल. पूर्वार्धात आत्मविश्वास वाढविणार्या घटना घडतील. शुभ ता.१३, १५

### सिंह:- नव्या विचारांना चालना

जशाचं तसं वागावं माणसाने. आयुष्य मजेत जगा. आपण दुःखी असलो, तरी कोणाला काही फरक पडत नाही. कर्मस्थानात मंगळ- गुरुची युती होत आहे. त्यामुळे कार्यक्षेत्रात मनासारख्या घटना घडतील. सुख-स्वास्थ लाभेल. सर्व प्रतिकूलतेवर मात करू शकाल. आनंद वृध्दिंगत करणाऱ्या घटना घडतील. नव्या विचारांना चालना मिळेल. शुभ ता.१३, १५

### कन्या:- वाद वाढवू नका

आपण काय आहोत, हे दुसऱ्यांना ठरवू देऊ नका. भाग्यस्थानी मंगळ-गुरुची युती होत आहे. त्यामुळे संघर्षाची चांगली फळे आपणास मिळणार आहेत. धार्मिक कार्य, एखादी तीर्थयात्रा घडेल. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. विनाकारण कोणतेही वाद वाढवू नका. स्पर्धा, राजकारण यात यश मिळेल. नव्या संधी विचारपूर्वक स्वीकाराव्यात. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. १५

### तुला:- प्रतिकूलतेवर मात

जे इतरांचे भले करतात, त्यांना नेहमीच संकटांना सामोरे जावे लागते. अष्टमातील मंगळाचा पंचमातील शनिशी केंद्रयोग होत आहे. किरकोळ शारीरिक त्रासांकडे दुर्लक्ष करू नका. दैनंदिन कामात अधिक लक्ष द्यावे. कामे मनासारखी होतील. अपेक्षित घटना घडतील. कलाक्षेत्रात मनासारखी प्रगती साधता येईल. प्रतिकूलतेवर मात कराल. शुभ ता. १३, १५

### वृश्चिक:- स्वास्थवर्धक घटना

वाचणे कधी बंद करू नका. कारण ज्ञानाला सीमा नसते. ज्ञानच आपल्याला यशस्वी बनवत असते. सप्तमस्थानी मंगळ- गुरुची युती होत आहे. त्यामुळे स्वास्थ्यवर्धक घटना घडतील. मंगळ-शनि केंद्रयोग होत असल्याने मतभेदाचे प्रसंग टाळावेत. अडचणीतून मार्ग काढावा लागेल. कोणत्याही गोष्टीची चिंता करू नका. शिक्षणात अधिक लक्ष द्यावे लागेल. शुभ ता. १५

### धनु:- भाग्योदयकारक घटना

स्वतःचं व्यक्तिमत्व असं, बनवा की लोक कॉपी करतील, टोमणे मारतील, नाव ठेवतील पण आपली बरोबरी कधीच करू शकणार नाहीत. षष्ठातील मंगळ- गुरु युती कार्यक्षेत्राला पूरक फळे देणारी ठरेल. भाग्योदयकारक घटना घडतील. नव्या विचारांना चालना मिळेल. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका. समस्या आल्या तरी चिंता करू नका. मार्ग निघत जाईल. शुभ ता. १५, १६

### मकर:- समस्यांतून मार्ग निघेल

जिथे तुमची कदर असेल तिथेच भावनांचा पाऊस पाडा, बाकी कोरड्या वाळवंटात किंमत शून्य असते. पंचमात होणारी मंगळ-गुरुची युती आर्थिक बाबतीत विशेष शुभ फलदायी ठरेल. शुक्रवारी महत्त्वाची कामे पूर्ण विचाराने करावी. समस्यातून मार्ग निघत जाईल. अपेक्षित संधी लाभल्याने समाधान वाटेल. चिंता करू नका. शुभ ता. १५

### कुंभ:- चांगल्या घटना घडतील

संघर्ष रडवतो पण आयुष्य घडवितो. राशीतील शनिचा चतुर्थातील मंगळाशी केंद्रयोग होत आहे. स्थावर बाबतीत विशेष जागरूक रहावे. व्यवहार विचारपूर्वक करावेत. नव्या संधी लाभणार आहेत. चिकाटीने रहावे. प्रगती होत जाईल. नव्या कामांना गती मिळेल. अनुकूलता वाढेल. शुभ ता. १५, १६

### मीन:- ठामपणे रहावे

पैसा आल्यावर सुख तर वाढतं पण मी पण नाही वाढतो आणि हा मीपणा माणुसकी संपवतो. व्ययातील शनिचा मंगळाशी केंद्रयोग होत आहे. त्यामुळे एखादा व्यवहार त्रासदायक ठरण्याची शक्यता आहे. नोकरी व्यवसायात जपून असावे. अनावश्यक खर्च टाळावा. ठामपणे रहावे. धरसोडपणा नुकसानीचा ठरू शकतो. विचाराने रहावे. शुभ ता. १५

!! शुभ भवतु !!

# नाठाळाचे काठी देऊ माथा।

सत्ताकारण

सोमनाथ देशमाने
भ्र. ९४२१६३६२९१



भविष्यात संयुक्त पुरोगामी आघाडी कुठल्याही नवीन नावानं पुन्हा सत्तेवर आली तर काँगी, वामी, जिहादी, नक्षली, मिशनरी वगैरे मंडळींच्या अंगात हजार हत्तींचं बळ येईल, सनातनींचं दररोजचं जगणं महाकठीण होऊन जाईल; संघी, भाजपायी आणि त्यांचे समर्थक, सहानुभूतीदार यांच्यासाठी काळ अत्यंत खडतर असेल. 'मोदीजी जब हारेंगे, तब देश के नौजवान हाथों में डंडा लेकर मोदीजी को दौडा दौडाकर पिटेंगे!' अशी जाहीर धमकी राहुल गांधी यांनीच देवून ठेवलेली आहे ना? सनातनींना, हिंदुंना दिलेली धमकी ही या मातीत जन्मलेल्या समस्त धर्म-संप्रदायांना दिलेली धमकी असते, पण लक्षात कोण घेतो. यालाच आत्मघातकी शहामृगीवृत्ती म्हणतात.

कित्येकांना गजाआड डांबलं जाईल, हिंदुंना हिंसक आतंकवादी घोषित करणारी कायदेशीर तरतूद केली जाईल. दंगा नियंत्रण कानून या गोंडस नावाखाली अशी तरतूद करण्याचा प्रयत्न २००४-२०१४ दरम्यान झाला होता. त्या तरतुदीनुसार कुठेही दंगा झाला की, हिंदुंनाच जबाबदार ठरवून पकडता येणार आहे. जातीगणना ही तर राहुल गांधी यांची आवडती संकल्पना आहे. जातीजातींना लालुच दाखविणाऱ्या या योजनेतून हिंदू समाजाला सुटं सुटं करुन बरबाद केलं जाईल. अगणित सनातनी हुतात्म्यांच्या बलीदानातून पाचशे वर्षांच्या प्रदीर्घ संघर्षानंतर महत्प्रयासाने उभे केलेले श्रीराममंदीर जमीनदोस्त केले जाईल. परत एकदा शरयू लालेलाल होईल. हिमालय धाय मोकलून रडेल; गंगा, यमुना, सरस्वती, सिंधुसागर, हिंदमहासागर आक्रोश करतील. सध्या लाखाकडे झेपावणारा वायदेबाजार निर्देशांक कोसळून पडेल, विदेशी निवेशक आपापली धनराशी घेऊन पसार होतील, स्वदेशी उद्योगजगत दिवाळ-खोर होईल, स्वदेशी संरक्षण शस्त्रास्त्र उद्योगाला टाळे लागतील आणि दलाल टोळ्यांमार्फत विदेशी शस्त्रास्त्र खरेदी व्यवहार प्रचंड तेजीत येतील, ल्युटियन्स लॉबीराज पुन्हा भरभराटीला येईल. डॉ.मनमोहन सिंग यांच्याकडून मिळालेली रिकामी तिजोरी नरेंद्र मोदी यांनी महत्प्रयासाने भरभक्कम केली आहे. तिची लयलूट पुन्हा सुरु होईल. भारतीय बाजारपेठा तकलादू चीनी वस्तुंनी पुन्हा एकदा ओसंडून वाहतील, शी जिनपिंग आणि चायना यांच्याशी सोनिया-राहुल काँग्रेसने गुप्त सामंजस्य करार आधीच करुन ठेवलेला आहे. राहुल गांधी पंतप्रधानपदी विराजमान झाले की डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान खुंटीला टांगून ठेवत जनाब स्वतःला तहहयात बादशहा- ए-आलम घोषित करतील किंवा मिस्टर हुकूमशहा होतील. स्वार्थासाठी सध्या आपापसात भाईचारा असलेल्या सनातनविरोधकांच्या भांडणात भारताचा गज़वा-ए-हिंद किंवा लेबनान होईल! कारण, 'मजहब' आणि 'रिलिजन' यांना एकमेकांचे आणि इतर कुणाचे सहअस्तित्व मान्यच नाही. येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत सोनिया-राहुल-काँग्रेस परिवाराचा हुरुप दुर्दैवाने जर वाढत गेला तर २०२९ ची निवडणूक ही भारतासाठी अखेरची संधी असेल, ती दवडली तर पुन्हा एकदा डायरेक्ट ॲक्शन सुरु होईल. नेहरु-गांधी-काँग्रेस परिवाराच्या घुसखोरधार्जिन्या धोरणानुसार पाक-बाँग्ला, रोहिंग्यां मुसलमानांचे लोंढेच्या लोंढे भारतात घुसतील आणि सनातनी भूमीपुत्र देशोधडीला लागतील.

इसवी सनाच्या सातव्या शतकापासूनच अरबी-मुगली टोळ्यांची भारतावर आक्रमणं सुरु झाली होती. त्यांच्या प्रथम भक्षस्थानी पडला तो हिंदू राजा दाहिर शासित सिंध-मुलतान प्रदेश. सनातन भारताचा हिंदू प्रदेश ताब्यात घेणारा पहिला अरब सेनापती मोहम्मद बिन कासिम. मोहम्मद बिन कासिमच्या नेतृत्वाखाली अरब सेना राजा दाहिरच्या सिंध-मुल्तान प्रांतात घुसली. बायाबापड्यांची अब्रु लुटत, प्रचंड नरसंहार करत, गावंच्या गावं पेटवत, हाहाकार माजवत निघाली होती. राक्षशी टोळधाडच ती! एका गावात मोहम्मद बिन कासिमची टोळधाड एका प्रशस्त चिरेबंदी वाड्याच्या भरभक्कम दरवाजावर धडका देत होती. हा वाडा राजा दाहिरच्या सैनिकाचा होता. कासिमच्या टोळधाडीशी लढतालढता जो नुकताच धारातीर्थी पडला होता. वाड्याच्या आतल्या बाजूला गोधन बांधलेलं होतं आणि दाहिरच्या त्या शूर सैनिकाची वीरपत्नी आपल्या दोन उपवर मुली आणि त्यांच्यापेक्षा धाकट्या मुलाला कवेत घेऊन ओसरीवर उभी होती. दरवाजा धाडकन कोसळून पडला, कासिमची टोळधाड वाड्यात घुसली, गोमातांची मुंडकी धडावेगळी केली गेली. गोरक्तप्राशन करुन विकृत नजरा ओसरीकडे वळल्या. तोपर्यंत त्या वीरपत्नीने आपल्या मुलाला सुरक्षित कोनाड्यात लपवलं होतं, दोन्ही मुलींना पदराखाली घेतलं होतं. टोळधाड पुढे सरकू लागली. त्यांचे पापी हात आपल्या आणि आपल्या लेकींच्या पवित्र शरीरापर्यंत पोहचायच्या आत त्या माऊलीने आपल्या दोन्ही लेकींची शीरं धडावेगळी केली आणि तीच तलवार स्वतःच्या काळजात खुपसून घेत इहलोकीची यात्रा संपविली. हिंदू राजा दाहिरच्या शूर हिंदू सैनिकाची धाडशी हिंदू पत्नी होती ती. मोहम्मद बिन कासिमची टोळधाड चडपडत वाड्यातून बाहेर पडली. कोनाड्यात आईने लपवलेला आठ वर्षाचा बालक बाहेर आला. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या आपली माता आणि बहिनींच्या पवित्र शवांचं दर्शन घेऊन हा बालक मागच्या दरवाज्यातून बाहेर पडला आणि जंगलात दिसेनासा झाला, तो काहीतरी दृढनिश्चय करुनच. बघताबघता पंचेवीस वरसं सरली, तो आठ वर्षाचा बालक तेहतीस वर्षाचा तरुण झाला होता. हाच तो सिंधूसिंधपुत्र 'तक्षक' तक्षक आता कन्नौजचा प्रतापी राजा नागभट्ट द्वितीय यांचा मुख्य अंगरक्षक झाला होता. निर्विकार दृढनिश्चयी मुद्रा, आग ओकणारे लालबुंद डोळे. या महाप्रतापी तक्षकाच्या नजरेत असायचा फक्त प्रतिशोध, मोहम्मद बिन कासिम आणि टोळधाड, त्याच्या वाड्यातली ती काळरात्र. सिंध नरेश दाहिरच्या दारुण पराभवानंतर अरबी मोहम्मद बिन कासिम हिंदू सिंधवर राज्य करत होता. अधूनमधून लगतच्या कनौज प्रांतावर आक्रमण करत होता आणि प्रत्येक वेळी शूर राजपूत सैनिक त्याला पिटाळून लावत होते. एक दिवस गुप्तचराकरवी खबर आली की यावेळी मोहम्मद बिन कासिम खूप मोठ्या सैन्यदलासह निकराची चढाई करण्यासाठी कनौजवर चाल करुन येत आहे, दोन-तीन दिवसात कनौज सीमेवर पोहचेल. संभाव्य परिस्थितीवर विचारविनिमय करण्यासाठी महाराज नागभट्ट यांनी सेनानायकांसह सुरक्षा सल्लागारांची सभा आयोजित केली. साधकबाधक विचारविमर्श सुरु होता. सर्वात शेवटी मतप्रदर्शन करण्यासाठी तक्षक उभा राहिला.

'महाराज, यावेळी शत्रूला त्याच्याच पध्दतीने उत्तर द्यावं लागेल!' महाराज म्हणाले, 'तुला काय म्हणायचं आहे, ते जरा विस्ताराने मांड तक्षक?' 'महाराज, अरबी सैनिक राक्षशी प्रवृत्तीचे आहेत, आपण आपल्या सभ्य सत्यसनातनी मर्यादांचे पालन करत आपण आपल्या प्रजेचं रक्षण करु शकत नाही, त्यांच्याच मार्गांचा अवलंब करत त्यांना हरवावे लागेल.' 'परंतु आपण आपला धर्म आणि मर्यादा ओलांडून वागू शकत नाही वीर तक्षक?' 'सभ्यता आणि मर्यादा यांचं पालन त्यांच्याशी केलं जातं महाराज, ज्यांना त्याचा अर्थ समजतो. ते तर राक्षस आहेत महाराज, त्यांच्यासाठी गोहत्या, बालहत्या, स्त्रीहत्या, बलात्कार, लुटालूट, जाळपोळ ही धर्मकार्ये आहेत महाराज, जो आपला धर्म नाही.

राजाचा एकच धर्म असतो, प्रजेचं सर्वार्थाने संरक्षण. कनौजचा पराभव झाला तर कनौजच्या प्रजेला काय काय भोगावं लागेल याची कल्पनासुध्दा करवत नाही, सिंध-मुल्तानच्या प्रजेने ज्या यमयातना सोसल्यात, अजूनही सोसत आहेत, तशी वेळ कनौजवर येऊ नये महाराज.' नागभट्ट महाराजांनी सभोवार नजर टाकली, समस्त सभा तक्षकाच्या मतांशी मौन सहमत असल्याचे संकेत मिळाले. नंतर राजा नागभट्ट आपल्या मुख्य सेनापती, मंत्री आणि तक्षकासह गुप्तमंत्रणा कक्षाकडे रवाना झाले. दुसऱ्या दिवशी तक्षकाच्या नेतृत्वाखाली कनौजसेना युध्दसीमेकडे कूच करती झाली.

मध्यरात्र झाली होती, मोहम्मद बिन कासिमची सेना आपल्या शिबिरात ढाराढूर घोरत होती. 'बेवकूफ काफ़िर हिंदूसेना सूर्यास्त के बाद आक्रमण नही करेगी, सोये हुये दुष्मनों पर वार नही करेगी, खा-पिके सो जाओ!' तक्षकाच्या नेतृत्वाखाली एकचतुर्थांश कनौज सेना मोहम्मद बिन कासिमच्या शिबिरावर तुटून पडली. काही कळायच्या आत सपासप मुंडकी धडावेगळी होऊ लागली. तक्षकाच्या अतुलनीय शौर्यापुढे सूर्योदयापूर्वीच कासिमची दोनतृतीयांश अरब सेना जमीनदोस्त झाली होती. सूर्योदय होता होता बाकी अरबसेना युध्दभूमीला पाठ दाखवून सैरावैरा पळत सुटली होती, तर राजा नागभट्ट आपली शेष राजपूतसेना घेऊन त्यांच्यासमोर दत्त म्हणून उभे होते. दुपार होता होता सगळ्या अरबसेनेचा फडशा पडला! महायोध्दा तक्षकाने जबरदस्त चक्रव्यूह रचला होता, अरबांना त्यांच्याच भाषेत उत्तर दिले होते, सीमापार जावून ठोकले होते. अभूतपूर्व विजयानंतर राजा नागभट्टने युध्दभूमीवरील आपल्या सर्व सेनानायकांवर नजर फिरवली, महावीर तक्षक कुठेही दिसत नव्हता. युध्दभूमीवर प्रेतांच्या गर्दीत महायोध्दा तक्षक शांतपणे झोपला होता, त्याच्या चेहऱ्यावर आज प्रथमच कर्तव्यपूर्तीचं, प्रतिशोधाचं समाधान ओसंडून वहात होतं. त्याचं पवित्र कलेवर महाराजा नागभट्ट यांच्यासमोर आणलं गेलं. महाराज नागभट्ट यांनी आपली तलवार तक्षकाच्या चरणी ठेवत त्याला साश्रू नयनांनी आदरांजली वाहिली. सर्वकालिक संदेश देवून गेला आहे हा महान भारतपुत्र, तक्षक. 'आक्रमण हेच उत्तम संरक्षण' आधुनिक भारताने 'कलिंगा सिंड्रोम', 'पृथ्वीराज सिंड्रोम' आणि 'महात्मा सिंड्रोम'मधून लवकरात लवकर बाहेर येणे अत्यंत गरजेचे आहे. विदुर सांगून गेलेत, 'शठे शाठ्यम् समाचरेत' छत्रपती शिवरायांनी दाखविलेला 'कात्रजचा घाट', संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी लगावलेला तडाखा '**नाठाळाचे काठी देऊ माथा**', अहिंसक 'अशीन विराथु'ने हिंसकांना दिलेला जबरदस्त ठोसा. समस्त सनातनींसाठी आजही अनुकरणीय संदेश आहेत. (समाप्त)

पान २ वरून

## देश हा देव असे माझा': राष्ट्रसंत तुकडोजी

वैराग्यमूर्ती गाडगे महाराजापर्यंत सर्व संत हे क्रांतदर्शी विचारवंत आहेत. 'हा देशची माझा देव' हा भाव त्यांच्या ठायी असल्याने त्यांनी सेवा, भक्ती, शौर्य, तत्परता व नीतिमत्ता यांची रुजवणूक भारतीय समाजमनाच्या सुपीक जमिनीमध्ये केली. त्याद्वारा त्यांनी भारतीय अस्मितेची जागृती केली आहे. उद्योगी भारताने प्रगतीची नवक्षितिजे गाठून शौर्य, मित्रता व सामुदायिक प्रार्थनेच्या माध्यमातून रामराज्य निर्माण होईल, असा आशावाद त्यांनी प्रत्येक भारतीयाच्या मनात मोठ्या आदर व विश्वास निर्माण केला आहे. **सदा रहू उद्योगी तनसे। करू व्यायाम पियारा।। नित्य करू प्रार्थना सामूहिक। लेकर जण-गण सारा।।१।। सुंदर गांव बनाए बहादू। मित्र प्रेम की धारा।। तुकड्यादास कहे घर घर। करू रामराज्य पियारा।।२।।** भारत देशामध्ये सर्व खेडे व गावांचा विकास होऊन रामराज्याच्या निर्मितीचे स्वप्न पाहणाऱ्या वं.राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी भारताला संपन्न करण्यासाठी ग्राम सुधारणेचा मूलमंत्र सर्वांनी स्वीकारणे गरजेचे आहे, असा पुरोगामी विचार मांडला आहे. भारत देशात शिक्षण व्यवस्था व खेड्यांचा विकास या दोन गोष्टींचा अंगीकार करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. भारत हा खेड्यांपासून बनलेला असल्याने खेड्यांचा विकास हाच देशाचा विकास आहे. राष्ट्रसंतांच्या स्वप्नातील भारत घडविण्यासाठी युवक व महिलांनी राष्ट्रकार्यात सहभागी होण्याची आवश्यकता आहे, असे त्यांचे परखड मत होते. 'देश हा देव असे माझा' अशी राष्ट्रवादाची परंपरा आपली असल्याने सर्वांनी त्यागाची भावना व तेजाची भावना जोपासण्याची आवश्यकता आहे. राष्ट्रसंतांच्या विविध ग्रंथातून त्यांचा विचार 'ग्रामगीता'; वंदनीय राष्ट्रसंत, प्रकाशन विभाग गुरुकुंज आश्रम मोझरी व 'श्री गुरुदेव मासिक'; गुरुकुंज आश्रम मोझरी. 'राष्ट्रसंतांचे विचारविश्व', 'लहर की बरखा' या सर्व ग्रंथांच्या माध्यमातून राष्ट्रसंतांचा देशाला देवत्व प्राप्त करून देण्याचा विचार आजही समाज मनामध्ये संक्रमित करण्याचा प्रयत्न करीत असते.

पान २ वरून

## दास्तान-ए- नौशाद



विशेषतः मुकेश यांची मधुर पियानो गीते व लता मंगेशकर यांची 'उठाये जा उनके सितम' व 'तोड दिया दिल मेरा' ही लोकोत्तर विरह गीते नौशाद यांचा दर्जा व प्रभाव दाखवून देतात. चांदनी रात, दिल्लगी (तू मेरा चांद, मै तेरी चांदनी) बाबुल व दास्तान या चित्रपटांच्या संगीतमय यशाने नौशाद चित्रपटासाठी १ लाख रुपये मेहनताना प्राप्त करणारे पहिले संगीतकार ठरले. १९५० चे दशक, विशेषतः पहिले अर्धदशक, जळीस्थळी, काष्ठी-पाषाणी नौशाद आणि नौशादच.. दीदार, जादू, आन व अर्थात 'बैजू बावरा' या चित्रपटांच्या यशात फक्त नौशाद हेच अधिकारी होते. याचवेळेस नौशाद यांचा भारतीय शास्त्रीय संगीताचा दुराग्रह हळूहळू त्यांना सामान्य रसिक व पर्यायाने बड्या निर्मात्यांपासून दूर घेऊन जाऊ लागला. मुगल-एआझम (१९६०) या अतिभव्य मोगलकालीन चित्रपटाचे समर्पक संगीत हा नौशाद यांच्या संगीयात्रेतील मेरुमणी. उस्ताद बडे गुलाम अली खाँ यांना दोन गीतांसाठी तब्बल ५० हजार रुपये मोजून गायला लावण्याचे श्रेय नौशाद यांचेच. मदर इंडिया व गंगा जमुना या चित्रपटांमध्ये नौशाद यांनी लोकसंगीतावर आधारित काही सुरेख गीते दिली. पण त्यांचे संगीत एकसुरी वाटू लागले. तेरे पायल मेरे गीत, आवाज दे कहां है, गुड्डू व २००५ साली आलेला 'ताजमहाल' ही त्यांची अखेर अखेरची कामगिरी. त्यांनी ध्वनी (१९८८) या मल्याळम चित्रपटासाठीदेखील संगीत रचना केल्या होत्या. अनेक पुरस्कारांनी सन्मानित, दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते, पद्मभूषण नौशाद कथाकार व शायरही होते. 'मेला' व 'दीदार' या चित्रपटांच्या कथा कल्पना त्यांच्याच होत्या. 'आठवा सूर' हा त्यांचा शायरीचा संग्रह त्यांचा साहित्यिक दर्जा दाखवून जातो. शकील बदायुनींसमवेत त्यांनी 'दर्द' (१९४७) ते 'संघर्ष' (१९६८) असे तब्बल २१ वर्षे काम केले. स्वतः निष्णात पियानोवादक असलेले नौशाद स्वतःच्या गीतांमध्ये स्वतः पिआनो वाजवत, हे विशेष..! 'चालीस करोड मे एक ही नौशाद!' (लेखक सिनेमाचे अभ्यासक आहेत.)

पान ५ वरून

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

आपल्याला सोन्याचे दागिने हवे असे वाटू लागले आणि आपले वडील क्षितिमोहन यांच्याकडे तिने तो हट्ट धरला. मुलीने लाडाने एखादा हट्ट केला आणि तो पुरवता येत नसेल तर पित्याच्या काळजाला किती वेदना होतात, हे अनुभवीच समजू शकतील. क्षितिमोहन यांनी अमिताला 'बाबा मोशाय' यांच्याकडे जा म्हणून सांगितले. रवींद्रनाथांना सगळे बाबा मोशाय म्हणत असत. सोन्याच्या दागिन्यांचा हट्ट करणार्या लहानग्या अमिताला रवींद्रनाथांनी फुलांचे दागिने किती सुंदर असतात, त्यांचे रंग किती सुंदर आणि वेगवेगळे असतात आणि अंगावर सोन्यांच्या दागिन्यांपेक्षा ते किती शोभून दिसतील हे पटवून दिले. आश्रमात तर विविध प्रकारच्या फुलांची कमी नव्हतीच. त्यांनी फुलांचे सुंदर दागिने बनवून घेतले. अमिताने ते घातले. तिच्याबरोबरच आश्रमातील इतर मुलींनी देखील हे सुंदर, सुवासिक दागिने परिधान केले. जेव्हा कलकत्याहून श्रीमंतांच्या मुली सोन्याचे दागिने घालून आल्या, तेव्हा आश्रमातील या निसर्गकन्या फुलांच्या आभूषणात मोठ्या सुंदर दिसत होत्या. आता कलकत्त्याहून आलेल्या त्या मुलींनी देखील आपल्या आईवडिलांकडे आपल्याला तसे फुलांचे दागिने हवेत म्हणून हट्ट धरला. अशी होती रवींद्रनाथांची समजावून देण्याची पद्धत.

पान ४ वरून

## 'चलत् चित्रव्यूह'मधील कला शिक्षणाचे संदर्भ

त्यांना लेखक ऋत्विकता असे म्हणत. एकदा त्यांनी वर्गात विद्यार्थ्यांना तुमच्यापैकी किती जणांनी झाडावर प्रेम केलंय? असा प्रश्न विचारला. दोन-तीन जणांनी हात वर केला. त्यावर बाकीचे कायमचे घरी गेले तरी हरकत नाही, कारण तुम्हाला कधीच कलाकार होता येणार नाही. असे आपल्या विद्यार्थ्यांना त्यांनी स्पष्ट शब्दाचा सांगितले. ऋत्विंतांचे शिकवणे ही एक अद्भुत आणि सर्व स्पर्शी घटना होती, असे लेखक म्हणतात. त्या तोडीचे शिक्षक किंवा कलाशिक्षक आज अभावाने दिसतात.

सॉक्रेटिसच्या दोन्ही शिष्यांनी आपापल्या दृष्टिकोनातून त्यांची चित्रे रेखाटल्याने, त्यांचे संवाद लिहून ठेवल्याने आपल्याला एकाच वस्तूचे दोन डोळ्यातल्या प्रतिमाच्या किंचित फरकाने जसे त्रिमिती चित्र दिसते तसे त्याचे एक भरीव चित्र दिसते. या शब्दात सॉक्रेटिस आणि त्यांचे शिष्य यातील गुरु-शिष्याचे नाते आणि अध्ययन अध्यापनाची नेमकी पद्धत याबाबत लेखकाने भाष्य केलेले दिसून येते. एकंदरीत सिनेमांमध्ये प्रमुख नटाची भूमिका काही चित्रपटांचे दिग्दर्शक अशा कलावंत म्हणून आयुष्य जगणाऱ्या अरुण खोपकर यांच्या चलत् चित्रव्यूह या साहित्य अकादमी प्राप्त पुस्तकातून कलाक्षेत्रातील विविध अनुभवासह कलाविषयक औपचारिक आणि अनौपचारिक असे विलक्षण कला शिक्षणाचे संदर्भ वाचायला मिळतात.

# आपापल्या विश्वाची सकारात्मकता

सकारात्मकतेचे तत्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

## सकारात्मकतेचे तत्वज्ञान २२८



अडलेरिअन मानसशास्त्र ही मानसशास्त्राची शाखा असं मानते की स्वतःचे व्यक्तिगत विश्वास, श्रद्धा समजून घेत आयुष्याची रणनीती आखणे हे माणसाला सकारात्मकतेकडे नेणारे पायाभूत समीकरण आहे. हे सारं काही बालपणात विकसित होत असतं. याचेच संदर्भ मग भावी स्वभावाला, वर्तनाला लागू होतात आणि स्वतःकडे बघण्याचा, इतरांकडे बघण्याचा आणि जगाकडे बघण्याचा असे सगळे दृष्टिकोन त्यांतून विकसित होत जातात.

विश्वाचे चलन म्हणजे ऊर्जा जेव्हा तुम्ही एखादी गोष्ट निरखून बघता, म्हणजे तो अनुभव तुम्ही विकत घेता. म्हणूनच तुमची दृष्टी अथवा जाणिवा जेव्हा एखाद्या त्रासदायक व्यक्तीकडे अथवा अनुभूतींकडे तुम्ही केंद्रित करता तेव्हा तिथे तुम्ही तुमची ऊर्जा वापरता, तिचा अपव्यय करता आणि ती परतून तुमच्या चिडचिडीला कारणीभूत होते. म्हणूनच स्वतःचं लक्ष कोठे केंद्रित करायचं, एकाग्र करायचं हे आपल्याला ठरविता आलं पाहिजे म्हणजे ऊर्जेचा विनियोग यथायोग्य होतो. याचा लाभ फक्त आपलेच नव्हे तर संपूर्ण विश्व सकारात्मक होण्यास कारणीभूत ठरतो.

प्रत्येकाचे जीवनानुभव वेगळे असतात त्यामुळे सगळ्यांचं घटना, प्रसंग याबाबतीतील आकलन भिन्न असू शकतं. एका व्यक्तीसाठी जे सत्य असेल ते त्याच्याबरोबर शिकलेल्या दुसऱ्या व्यक्तीसाठी असतेच असं नाही. दुसऱ्यांचे अनुभव आपल्याला समृद्ध करण्यास कारणीभूत होतात कारण त्या व्यक्तीच्या खिडकीतून आकाशाचा तुकडा वेगळाच दिसू शकतो. मग समानुभूती आणि मानवी स्वभावाची खोलवर जाणीव आतमध्ये झिरपत जाते.

आपल्याकडे स्वतःच्या वेदनेला ओळखायला शिकवत नाहीत आणि इतरांना, त्यांच्या भावनांना, वेदनेला ओळखायलाही शिकवलं जात नाही. आपल्याला बऱ्याचदा इतरांचे सांत्वन करता येत नाही, समोरच्याच्या मनातील भावना ओळखता येत नाहीत.

व्यक्ती दुःखात बुडलेली असते, त्यामुळे तिचा विवेक काम करत नसतो, अशावेळी आसपासच्या माणसांचे, यंत्रणांचे काय? ते तर शुद्धीवर असतात. जसं माणसांनी स्वतःबद्दल बोलतं व्हायला हवं, तसं माणसांना इतरांच्या डोळ्यातील वेदना वाचता यायला हवी. कधीकधी आपल्या आयुष्यात असे क्षण, वेदना येतात ज्या कुणालाच दिसत नाहीत, समजत नाहीत. बऱ्याचदा आपल्याला त्या इतरांना स्वतःहून सांगायच्या नसतात. इतरांनी त्या ओळखाव्या असं वाटत असतं. त्या अर्थाचे सूचक इशारेही आपण करीत असतो. पण आपल्या हृदयातील कळ कोणी ओळखू शकत नाहीत. वरकरणी आपण हसत- खेळत असतो, गप्पागोष्टी मारत असतो, कामं आपल्या गतीने पार पडत असतात; मात्र मनातील खळबळ निरंतर वाहत असते. फक्त ती पृष्ठभागावर येत नसते. मुखवटा धारण करून आपण जगणे सुरु ठेवलेले असते आणि त्यामुळे सगळ्यांना फसविण्यात आपण यशस्वी ठरतो. लोक आपणांस सशक्त समजत असतात. त्यांना वाटते अशा व्यक्तीला वेदना कुठून होणार, व्यक्ती निभावून नेईल ती सगळं. पण सशक्त असणे म्हणजे एकांतात सहन करणे नक्कीच नसते. मात्र प्रत्येकापुढे आपण स्वतःला उकलून दाखविणेही योग्य नसते. काहींची ते समजून घेण्याची क्षमता नसते.

एखाद्याची वेदना समजून घेण्यात, त्या व्यक्तीसकट तिला आपलेसे करण्यात आपण माणूस म्हणून, एक समाज म्हणून कमी पडतो. भावनांचे पोषण कमी झाले की माणसे पोरकी होत जातात. त्यासाठी फक्त स्वजनांचे निघून जाणे एवढेच कारण पुरेसे नसते. अशावेळी माणसे दोनदा दुखावतात- वास्तवात आणि नंतर सिंहावलोकन करताना. दडवून ठेवलेले दुःख माणसाला गिळंकृत करते. आपल्या जीवनाची गुणवत्ता आपल्या मनाच्या गुणवत्तेवर अवलंबून असते आणि बरेचदा आपल्या शहाणिवेचा उगम आपल्या वेदनेतून होत असतो. म्हणून झालेल्या आघाताचा स्वीकार ही पहिली पायरी असते त्या आघाताचे परिणाम ओलांडण्याची, ते प्रभाव ओसरण्याची. एकदा इतरेजनांच्या आयुष्यातील आपले स्थान दिसले की नंतर दुखापती बंद होतात.

मला तुम्ही हवे होतात, तेव्हा तुम्ही कोठे होतात असा जीवघेणा प्रश्न मग कोणीही विचारला तर त्याचे उत्तर आपल्याकडे नसते. तेव्हा सुधीर मोघेंच्या भाषेत मनाचिया घावावर मनाचीच फुंकर एवढाच पर्याय उरतो. आपलं विश्व घडविण्याची ती सुरुवात असते, तो शुभसंकेत असतो.

आपण उच्चपदी पोहोचलो की आपली कार्यक्षमता, दृढनिश्चय, सहयोग इत्यादींचा गाजावाजा होतो. मात्र दुसऱ्या कोणाला पदोन्नती मिळाली की मात्र चमचेगिरी, भेदभाव, भाग्योदय, नातेबंध,लाच, गुलामगिरी अशी विशेषणे सहजी ओठांवर येतात. मत्सर/हेवा, किंवा हेटाळणी या भावना सहसा विनोदाच्या आवरणाखाली समोर येतात पण त्या जवळून निरखल्या तर निर्णय घेता येतात. आपल्या खिडकीतून दिसणारा आभाळाचा तुकडा म्हणजेच आकाश अशी आपली समजूत असते, तद्वत आपल्या नजरेला पडते, तेवढेच विश्व असते असा आपण सोयीस्कर समज करून घेतो. आणि तेच खरे अशीही स्वतःची समजूत घालतो. मग इतरांचे अनुभव, आकलन आणि दृष्टिकोन सरळसरळ आपण केराच्या टोपलीत भिरकावतो. अशावेळी आपले व्यक्तिगत अनुभव, आस्था आणि स्वतःभोवती घातलेल्या दृश्यादृश्य चौकटी आपोआप आपला तुरुंग बनतात आणि त्यांत आपण बंदिवान होतो.

केव्हातरी या भितींना भेदून आपण स्वतःचे आकलन वाढवायलाच हवे तरच गृहीतकांना आव्हान देता येते आणि भरभराटीकडे पाऊल टाकता येते. मग जाणवते. नजर विस्तीर्ण केली की असंख्य प्रकारचे सत्य अस्तित्वात असते आणि दृष्टिकोनही तितकेच असू शकतात. जगाची क्लिष्टता समजून घ्यायची ती एकमेव चावी असते. सर्वप्रथम दृष्टींमधील विविधता अस्तित्वात असते, हे स्वतःला समजावून सांगणे आणि ते मनाविरुद्ध असेना कां, पण स्वीकारणे हाच अनुभवांपलीकडच्या जगाचा स्वीकार असतो. मग खिडकीतून न दिसणाऱ्या सत्याशीही परिचय होतो, मैत्री होते. खिडकीच्या चौकटीचा आपोआप त्याग होतो. प्रत्येकाचे अनुभव भिन्न, त्यानुसार प्रसंगांचे/घटनांचे लागणारे अर्थ वेगळाले. तेव्हा इतरांच्या अनुभवांचा, चष्म्याचा त्याग क्रमप्राप्त होतो.

नवकल्पनांचे खुले स्वागत करण्यासाठी आपल्या खिडक्या उघडून इतरांच्या मनातील मोकळी हवा फुफ्फुसात भरून घ्यावी आणि दुसऱ्यांच्या नजरा दत्तक घ्याव्यात. आपलेही क्षितीज मग रुंदावते. आपले अनुभव शेवटी खूप व्यक्तिगत असतात आणि त्यांत मोठ्या प्रमाणावर मी भरलेला असू शकतो.त्यातून शिकण्याला मर्यादा असतात.इतरांच्या विश्वात आपण असो वा नसो, त्यांतून काहीतरी अस्सल, न अनुभवलेलं शिकायला नक्कीच मिळतं. याकडे दुर्लक्ष करणाऱ्यांना कधीतरी फटका बसू शकतो.

अपवादात्मक परिस्थितीत माणसे चमचेगिरी/चाटूगिरीचा मार्ग पत्करतात. आत्मविश्वासाचा अभाव आणि अस्थिरतेचे भय बव्हंशी याला कारणीभूत असते. तग धरून राहण्यासाठी स्वतःचे चारित्र्य, नीतिमूल्ये पणाला लावायची खरोखरच आवश्यकता असते कां? तेथे एक मालिका नकळत जन्माला येते- फसविण्याची, विसंगतीची आणि विरोधाभासाची. किंवा स्व- आदराला, सचोटीला बदनाम करण्याची. हे आतील झगडे, संघर्ष दिसतातच असे नाही पण खऱ्या ओळखीला काळोखी फासू शकतात.

त्यापेक्षा असहमत असली तरी स्वतःच्या मतांचा, दृष्टिकोनाचा सन्मान ठेवायला शिकले पाहिजे. तेथे हातमिळवणी, समझोते नसावेत. पोरस राजाने ज्या धीरोदात्तपणे आणि कणखरपणे मला राजासारखे वागव असं सिकंदराला सांगितलं तसं ताठ मानेने सांगता आलं पाहिजे. स्वतःच्या आस्थांवर स्थिर असणे आणि त्यांच्याबाबतीत तसूभरही न हलणे यामधूनच खरा आदर लाभतो, प्रतिष्ठा मिळते.

नैसर्गिक बुद्धिमत्ता आणि मनोभूमिका यांत बरेचदा गल्लत होते. एखाद्याकडे निव्वळ बुद्धी असेल आणि मानसिकदृष्ट्या ती व्यक्ती दुर्बल असेल तर फक्त जन्मजात बुद्धिमत्तेच्या आधारे ती व्यक्ती फार तर वेगाने आणि विनासायास आयुष्याची सुरुवात करू शकेल. एखाद्या विशिष्ट ध्येयावर लक्ष केंद्रित करू शकेल. त्यामुळे कदाचित तात्कालिक यशही प्राप्त करू शकेल पण याला मर्यादा असतात.

याउलट सहज विचार केला की एखाद्याकडे सकारात्मक मनोभूमी असेल आणि तितकीशी बुद्धी नसेल तर काय होईल? अशी व्यक्ती मनात येईल तेव्हा स्वतःचा विकास करून घेईल आणि विश्वास संपादन करेल. भलेही सुरुवात धीमी असेल पण सातत्यपूर्ण नक्कीच असेल. दीर्घकालीन ( दिवार चित्रपटाच्या भाषेत लंबी रेस का घोडा असेल आणि कोठल्याही मर्यादा त्या व्यक्तीला जखडू शकत नाहीत. तेव्हा स्वतःच्या विश्वापुरती सकारात्मकता हवी असेल तर मनाच्या भूमिकेला खतपाणी घालायला हवे.

### विचारांना खाद्य-

जेथे आपण लक्ष देतो त्यावरून आपली ऊर्जा आणि कृती यांची दिशा ठरते. त्यामुळे अधिक सकारात्मक अनुभव हवे असतील तर जाणीवपूर्वक त्यांची जोपासना करावी लागते. याचा एक सोपा मार्ग म्हणजे कृतज्ञतेची रोजनिशी लिहिणे. रात्री झोपण्यापूर्वी त्या दिवसातील कोणत्या तीन गोष्टींबद्दल/ घटनांबद्दल/व्यक्तींबद्दल कृतज्ञता वाटली याची नोंद करावी. असं नातं जोडलं की आपोआप नजर जगण्यातील सुंदर, चांगल्या गोष्टींकडे वेधली जाईल. हे स्वास्थ्यासाठीही चमत्कार घडवून आणतं. मुख्य म्हणजे या नोंदींचे पुनर्वाचन शरीरासाठी/मनासाठी उत्साहवर्धक टॉनिक ठरते.

दी सुशि ट्रेन या जगप्रसिद्ध खेळात आपल्याला विचारांचे दुरून निरीक्षण (ते जगायचे मात्र नाहीत) करायला शिकविले जाते. आपोआप माणूस स्वतःच्या नकारार्थी वैचारिक भूमिकांपासून दूर जातो आणि जीवनाचे अधिक आशादायी चित्र कसे तयार करता येईल याचा विचार करतो.

मागील एका लेखात उल्लेख केलेले पुस्तक दी करेज टू बी हॅपी ( लेखक -इचिरो किश्मी आणि फुमीटेक कोगा) म्हणजे सॉक्रेटिक पद्धतीचा गुरु-शिष्य संवाद आहे. एक निराश, हताश विद्यार्थी आणि त्याचा अनुभवी गुरु फक्त संभाषणातून, प्रश्नोत्तरांमधून सकारात्मक दृष्टिकोन कसा जोपासावा हे सुलभ रितीने कसे उलगडत नेतात याचा हा सर्वोत्तम नमुना आहे. विल्यम हेन्ले यांची १८७५ साली लिहिलेली आणि १८८८ साली प्रकाशित केलेली कविता- इवयाची केवळ पंचविशी गाठली असता एका दुर्धर आजाराने ग्रासलेल्या या कवीने केवढे सकारात्मक काव्य लिहिलेले आहे. आजही जगभर सकारात्मकतेचा झेंडा घेऊन ती उभी आहे. तिचा स्वैर अनुवाद-

अजिंक्य /अपराजित (इन्व्हिक्टस) गुफेत जसा अंधकार असतो. खड्ड्यात जसा अंधकार असतो, तशा अंधाराने त्याने मला झाकलेलं आहे.

जो कोणी भगवंत असेल तर त्याचे मी आभार मानतो. मला अजिंक्य, अजेय आत्मा त्याने दिलेला आहे. माझ्यावर ओढवलेल्या प्रलयंकारी परिस्थितीत मी त्या अंधाराला माझ्यावर कब्जा मिळवू देणार नाही, मी हुंदके देणार नाही आणि मोठ्याने गळा काढणार नाही मी परिस्थितीला सामोरा जाइन नियतीच्या फटक्याला सहन करीन माथा रक्तबंबाळ झाला तरी मी झुकणार नाही. क्रोध आणि अश्रू यापलीकडे डोक्यावर संकटाची टांगती तलवार असो. दहशतीच्या छायेत तरीही- तुम्ही मला निर्भय, भयमुक्त बघाल स्वर्गाचे द्वार कसे असेल हे मला माहित नाही. तिथल्या शिक्षेवरही माझे नियंत्रण नाही पण मी माझ्या जीवनाचा शिल्पकार आहे. मी माझ्या आत्म्याचा नियंता आहे.

# श्रावणी सोमवारची शिवामूठ तीळ





आजीचा बटवा
नारायण कारंजकर
भ्र. ९४२३७५८४०१

प्रत्येक कृत्य श्रद्धेने पण ज्ञानपुर्वक करावे, असे शास्त्र आहे. 'यदेव विद्या करोति तदेव कार्यवत्तरं भवती' जाणून घेतलेले, केलेले कर्म बलवत्तर होते. म्हणून आपण जे कर्म, व्रत, कुलाचार का करतो? त्यामागे विज्ञान काय आहे? हेतू व कारण काय आहे? हे जाणून घेतले पाहिजे.

चातुर्मासातील व्रते, धार्मिक विधी आपण जाणून घेतले पाहिजेत. श्रावणात श्री शिवाचा महिमा असतो. भाद्रपदात श्री गणेशाचा महिमा, आश्विनात श्रीशक्ती देवीचा महिमा असतो, तर कार्तिक महिन्यात श्री विष्णू देवाचा महिमा असतो. मानवी जीवनात संयम व इंद्रिय दमण नसेल तर जीवन स्वैर होते. स्वैर वृत्तीने वागण्यात केवढे अहित आहे, हे सध्या आपण सर्वत्र पाहत आहोतच. ८४ लक्ष योनीनंतर दुर्लभ असा मनुष्य देह प्राप्त झाल्यानंतर मानवी जीवन सफल व कृतार्थ कसे होईल? याचा विचार शास्त्रकारांनी फारच उत्कृष्ट केला आहे. जीवन कृतार्थ होण्यासाठी धर्म, श्रद्धा, संयम, इंद्रिय दमण, चारित्र्य इत्यादी गोष्टींची खूप आवश्यकता आहे. व्रत वैकल्यांनी ह्या गोष्टी साध्य करता येतात. म्हणून व्रत वैकल्यांना मानवी जीवनात फार महत्त्व आहे.

आपली एखादी इच्छा पूर्ण व्हावी, म्हणून व्रत करणे किंवा धार्मिक कृत्य करणे म्हणजे सकाम उपासना होय. विशिष्ट कामनापूर्तीसाठी व्रत, जप, दान इत्यादी करण्यात काहीही गैर नाही. सकामातून निष्कामाकडे जायचे असेल तर त्या-त्या स्वरूपाविषयीची त्याची श्रद्धा मी दृढ करतो असे आपणास भगवंतांनीच भगवद्गीतेत आश्वासन दिले आहे. तेव्हा आपणास श्री विठ्ठलाची भक्ती आवडत असेल तर श्री विठ्ठलाची भक्ती करा, श्री गणपतीची भक्ती आवडत असेल, तर श्री गणपतीची भक्ती करा. एवढेच नव्हे तर आपली जेथे श्रद्धा असेल त्या ठिकाणी भक्ती करा. आपल्या हिंदू धर्मात थोडं थोडके नाही तर ३३ कोटी देव आहेत. कोणत्याही देवाची उपासना करा. उपासना पद्धती भिन्न असली तरी मानवी जीवनाचे कल्याण व मोक्ष प्राप्ती हेच उद्दिष्ट राहू द्यावे. वेदोक्त धर्माचे आचरण स्वतःच्या मन शांतीसाठी सारासार विवेक बुद्धी निरंतर जागृत ठेवण्यासाठी करायची असते. पूजा, मंत्र, जप आदि कितीतरी मार्गाने आपणास इष्ट देवतेची उपासना, आराधना करता येते. असो!

श्रावणातील पहिल्या सोमवारी तांदळाची शिवामूठ श्री महादेवास अर्पण केली. दुसर्या श्रावणी सोमवारी तीळ शिवामूठ म्हणून अर्पण करतात, शिवपिंडीवर वाहतात. तीळ तैलवर्गीय बियाणांत येतात. मकर संक्रांतीस तर आपणाकडे तीळमिश्रित पाण्याने स्नान, तिळाचे उठणे अंगास लावणे, तीळ मिश्रित पाणी पिणे, तीळ खाने, तीळ दान असा तिळाचा उपयोग पापनाशासाठी केला जातो. यामागे धार्मिक भावना जरी असली तरी या निमित्ताने आपल्या आहारात (थंडीच्या दिवसात) तिळाचा वापर व्हावा, हा मुख्य उद्देश आहे. कारण तीळ बलकारक, अंगात उष्णता निर्माण करणारे आहेत. तिळास संस्कृत तील, हिंदी तील, गुजरातीत तल, मराठीत तीळ, इंग्रजीत सीसेम, जिंजेल्ली, लॅटिनमध्ये सीसामुम, इंडिकुम अशी विविध भाषेत विविध नावे आहेत. तिळाचे बलकर, स्निग्ध, अग्नि दीपक, उष्ण मधुर असे विविध गुणधर्म आहेत. आयुर्वेदात तिळाचे कितीतरी औषधी उपयोग सांगितले आहेत.

### तिळाचे औषधी उपयोग-

मुत्राघातावर तसेच दाह यावर तिळाच्या भांड्याची किंवा तिळाच्या पेंडीची राख गायीच्या दुधात कालवून त्यात थोडासा मध घालून ते द्यावे. तारुण्यास्थेत तोंडावर तारुण्यपिटीका म्हणजे मुरूम येतात, त्यावर गोमूत्रात जुनी तिळाची पेंड कालवून लेप ककरावा. अग्निदग्ध वर्णावर तिळाचे तेल चुन्याच्या निवळीबरोबर मिश्रण करून त्याची पट्टी बांधावी. वारंवार पट्टीवर त्या मिश्र केलेल्या तेलाचे थेंब सोडित जावे म्हणजे रुग्णस बरे वाटेल. दात हलत असल्यास तो घट्ट होण्यासाठी सैंधव व तिळाच्या तेलाच्या गुळण्या तोंडात धराव्यात. अर्धशिशी म्हणजे अर्धे डोकेदुखीवर गुळ व तूप एकत्र करून खावे व दुधात तीळ वाटून त्याचा मस्तकावर लेप करावा. तीन दिवसात अर्धशिशी बरी होते. दम्यात खूप त्रास होत असल्यास तीळ तेल दोन चमचे कोमट करून घ्यावे. वातरोगात तिळाच्या तेलाने अभंग करावे. वजन कमी करण्यासाठी तिळाचे तेल त्रिफळा चुर्णासह उपाशीपोटी घ्यावे. दात मजबूत होण्यासाठी एक चमचाभर तीळ चावून-चावून खावेत व वर थंड पाणी प्यावे.

मूळव्याधीमध्ये तीळ, गुळ, लोणी रोज सकाळी घ्यावे. तीळ तेलाचा उपयोग रोज सर्वांगाला मालिश करण्यासाठी करावा. रोज सकाळी तीळ खाल्ल्यास बुद्धी वाढण्यासाठी चांगला उपयोग होतो. श्रावणातील शिवामूठ शक्यतो काळा तिळाची वाहावी. काळे तीळ रोज नियमाने अंगास लावून थंड पाण्याने स्नान केले असता केस पांढरे होत नाहीत. अंगावर सुरकुत्या पडत नाहीत. अंगकांती सतेज बनते. मुतखड्यावर तिळाचा क्षार दोन ग्रॅम मध मिसळून घ्यावा. केसाच्या वाढीसाठी चमचाभर तीळ रोज चावून खाणे. तीळ तेल जंतावर ही उपयुक्त औषध आहे. उष्ण प्रकृती असणार्यांनी तीळ खाऊ नयेत. त्वचा विकार, सोरायसिस, गजकर्ण अशा विकारात तीळ खाऊ नयेत. तीळ व तांदूळ यांची खिचडी तूप व साखर घालून गरम गरम खाल्ली असता, उत्तम संतती जन्मते. तिळामध्ये १८.३% प्रोटीन, ३५ टक्के कार्बो, ४३.३% फॅट तसेच फायबर, मिनरल असतात. ५६३ कॅलरी तिळापासून मिळतात.

# हाचि धरी नेम

चातुर्मासात अनेक जण वेगवेगळे नेम करतात आणि ते नेमाने पाळले जावे असे कसोशीने प्रयत्नही करतात. कांदा-लसूण चातुर्मासात वर्ज्य करणारे बहुसंख्य लोक आहेत तसेच मांसाहार वर्ज्य करणारेही आहेत. चातुर्मासातले नेम करण्याचे प्रमाण पुरुषांपेक्षा स्त्रियांचे अधिक आहे. चातुर्मासात विशिष्ट फुलांचा लक्ष वाहणे, एखाद्या देवाची, संताची पोथी वाचणे, नक्त करणे म्हणजे एकच वेळ जेवणे हे आणि असे काही नेम केले जातात. असे नेम करणे म्हणजे स्वत:वर काही बंधने घालणे; ज्यामुळे परमार्थ केल्याचे समाधान लाभते. अर्थात हे समाधान ज्याच्या त्याच्या वृत्ती-प्रवृत्तीवर अवलंबून आहे. ज्याच्या त्याच्या आवडी आणि सवडीनुसार ज्याला जो नेम करावासा वाटेल तो ते करतात. मात्र, या सगळ्यात एक महत्त्वाचा नेम करण्याची सध्या आपल्या सगळ्यांनाच खूप गरज आहे आणि तो म्हणजे दुसऱ्याशी संवाद साधणे. कारण माणसातला संवाद हरवला आहे.

अलिकडे एकमेकांशी बोलायला अन् बोललेलं ऐकायला कोणाला वेळ नाही. प्रत्येकाजवळ सांगण्यासारखे काहीतरी असतंच; पण सांगणार कोणाला? जो तो आपल्या व्यापात गुंतलेला! बऱ्याच जणांना आणि बऱ्याच जणींना त्यांचं मन मोकळं करायचं असतं. मन मोकळं करायला विश्वासाची, जवळची व्यक्ती हवी असते; ती मिळत नाही. घरातल्या, घराबाहेरच्या भल्याबुऱ्या अनुभवांबद्दल कोणाशी तरी बोलावं, सांगावं असं वाटतं. बोलावंस वाटलं, तरी आपलं बोलणं शांतपणे ऐकून घेईल, असं कोणीतरी हवं असतं. हे ऐकणारे खूप जवळचे काळजाच्या आतली नाती जपणारे असावे की जे आपण बोललेलं दुसऱ्या कुणाला सांगणार नाही, असा विश्वास असणारी व्यक्ती असावी. मी आणि माझे यजमान आम्ही उत्तम श्रोते आहोत. आमच्या जवळचे, दूरचे, नात्यातले, ओळखीचे लोक आमच्याकडे येतात. मोकळेपणाने बोलतात. मन मोकळं करतात. कधी रडून मोकळे होतात. रडणे हा कुठल्याही समस्येवरचा उपाय नाही. रडणे म्हणजे आपण कमकुवत आहोत हे सिद्ध करणे, असं काही जण म्हणतात. मात्र, मला वाटते रडणे म्हणजे मनात साठलेल्या त्रासदायक आठवणींचा, विचारांचा निचरा होणे.

आम्ही समोरच्याचं बोलणं आपलेपणाने ऐकतो. आम्ही काही विशेष करतो असं नाही. आमचा थोडा वेळ अन् सहानुभूतीचे चार शब्द फक्त बोलणाऱ्याला देतो. समस्या कुणाला नाही? सगळ्यांनाच काही ना समस्या आहेतच आणि जो तो आपापल्या कुवतीप्रमाणे त्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न करत असतो. कधी कधी सगळीकडून निराशा वाट्याला येते. 'नको हे आयुष्य' असंही वाटायला लागतं. अशावेळी सावरायला एक हात पुढे यावा लागतो. माणूस आत्महत्या तेव्हाच करतो जेव्हा जगण्यातील सगळा रस संपून गेलेला असतो. आयुष्य ओझं वाटायला लागतं. सगळीकडून निराशेचे ढग दाटून येतात. सगळीकडे अंधाराचं साम्राज्य पसरलेलं आहे असं वाटत. आता कुठेही आशेचा किरण दिसणारच नाही वाटतं. अशावेळी कधी कधी माणूस जगण्याच्या अंतिम टोकावरून स्वत:ला मरणाच्या खाईत लोटून देतो. मरणाच्या खाईत उडी मारण्याआधी त्याला मागे ओढणारे कुणी तरी असावे. प्रत्येक रात्रीला पहाटेचा उ:शाप आहे, हे त्याला सांगणारं, त्याला सावरणारं कोणीतरी असावे. जगणे सोपे नाही आणि मरणेही सोपे नाही. आत्महत्या करायला मनाचा दगड व्हावा लागतो. मध्यंतरी तरुण मुलांनी अगदी शाळकरी मुलांनीही आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या आहेत. घडताहेत.

तंत्रयुगातील मोहाचे जाळे, आयुष्यातली निराशा, भविष्याची मावळलेली आशा, मनाचा कमकुवतपणा, आपण मागू ते ताबडतोब मिळालाय हवे ही स्वार्थी वृत्ती, आयुष्यात अचानक समोर आलेल्या दुर्दैवी घटना अशी एक ना अनेक कारणे आत्महत्या करायला प्रवृत्त करतात. अशावेळी कुणाची तरी खंबीर साथ हवी असते. एकत्र कुटुंबात मनातले सल, अडचणी, समस्या घरातल्या वडीलधाऱ्यांजवळ बोलून मोकळे होता यायचे. मोकळे होता येते. त्यावर उपाय सुचवला जायचा. सुचविला जातो. मदतीला घरातली माणसं तर कधी शेजारीही पुढे यायचे. आता कुटुंबं विखुरली अन् मनं विस्कटली. एकत्र कुटुंबातला रडणाऱ्या पोरांच्या पाठीवरचा आधाराचा, मायेचा हात हरवला. नातेसंबंधात वितुष्ट आले. माणसं एकमेकांपासून दुरावली तरी एकमेकांच्या अडीअडचणींना धावून यायची. भांडण असली, वाद असले तरी संवादही होता. शेजारसंबंध चांगले असायचे. आपल्या मदतीला कोणीतरी पुढे येईल याची खात्री असायची. तंत्रज्ञानाने माणसाची प्रगती झाली, पण परस्परातील आपलेपणा हरवला. माणसांमधला संवाद हरवला. जो अत्यंत आवश्यक आहे. मनात विचार-भावना-शब्द साचले की, मनाचं आरोग्य धोक्यात येतं. आम्ही अशा मनांमधली घुसमटं मोकळी व्हायला मदत करतो. प्रत्येकाच्या दु:खाचं स्वरूप सारखे नसते, पण वेदना सारख्या असतात. ती वेदना बोलकी करण्याचं आणि भरून आलेलं मन हलकं करण्याचं आमचं बारा महिन्यांचं व्रत आहे आणि त्यालाच जोडून अजून एक व्रत आम्ही कसोशीने पाळतो. ते म्हणजे समोरच्याने सांगितलेला प्रत्येक शब्द मनाच्या तळाशी ठेवतो. त्याचा उच्चार कधीच कोणापुढे करीत नाही. माणसाचा मेंदू विलक्षण आहे. मेंदूची आठवणी साठवण्याची क्षमता प्रचंड आहे. साठवलेल्या आठवणी अंतर्मनात कशा जपायच्या हे मेंदूला सांगावे लागत नाही. त्यातील कटू-बोचऱ्या आठवणींचा, अनुभवांचा उपसा केला जात नाही. बोलायचं ते मनात आणि मनाशी. मानसिक स्वास्थ्याला ग्रहण लागण्याची वेळ या मनगोष्टींनी येऊ शकते. प्रत्येकाला आपलं दु:खच सांगावसं वाटतं असं नाही. सुख-दु:खाच्या पलीकडेही काहीतरी सांगण्यासारखं असतं, जे कुणाजवळ बोलावंसं वाटतं. त्यात वंचनेचे, अपमानाचे प्रसंग असतात. काही नाजूक क्षण असतात. त्या क्षणांची कोवळीक आपल्या विश्वासाच्या माणसाजवळ व्यक्त करावीशी वाटते. घरातल्या सभासदांना एकमेकांशी बोलायला वेळ नाही. अलिकडे 'स्पेस' या शब्दाच प्रस्थ वाढलं आहे.

प्रत्येकाला स्वत:ची स्पेस जपायची आहे. त्यांच्या या स्पेसमध्ये दुसरे कोणी आलेलं चालत नाही. घरातल्या शाळकरी मुलांनाही स्वत:ची स्पेस हवी असते. एकाने दुसऱ्याच्या स्पेसमध्ये जराही ढवळाढवळ केलेली चालत नाही. स्पेस जपण्याच्या नादात माणसं एकमेकांपासून दूर जात चालली आहेत, हे कसं कोणाच्या लक्षात येत नाही की लक्षात येऊनही त्याकडे दुर्लक्ष केलं जात आहे. माणसं दुरावत चालली अन् माणसा-माणसातला संवादाचा पूल मोडून पडला. तो संवादाचा मोडून पडलेला पूल जोडण्याचा आमच्यापरीने अल्पसा प्रयत्न करतो. तो प्रत्येकाने करायला हवा. नाहीतर माणसाच्या आतली घुसमट वाढतच जाणार. जीवघेणी स्पर्धा वाढली आहे. शिक्षण क्षेत्रातली स्पर्धा, नोकरी-व्यवसायातील स्पर्धा, चंगळवादी आयुष्य जगण्याची स्पर्धा. या स्पर्धा निरामय जगण्याचे सुख-आनंद हिरावून घेत आहेत. प्रत्येकाला स्वत:चं स्वातंत्र्य जपायचं आहे. कधीकाळी छोट्या घरात राहून मोठ्या कुटुंबातील मोठ्या अडचणी निभवून नेणारे लोक होते. आता मोठ्या घरात राहून छोट्या-मोठ्या अडचणी निभवताना आजचा माणूस थकला आहे. त्याची दमछाक होते आहे. पूर्वी घराची आणि माणसाच्या मनाची दारे उघडी असायची. आता घराची आणि मनाची दारे बंद असतात. ती उघडली नाही तर बाहेरची मोकळी हवा आत येणार कशी? मग वाट्याला येणारी घुसमट सोसण्याशिवाय दुसरा पर्याय नसतो. ही घुसमट कधी कधी जगण्याच्या सगळ्या वाटा बंद करते. तसं होण्यापूर्वी एक मदतीचा हात पुढे करायचा. स्पर्धेच्या या युगात लहान लहान मुलेही मानसिक ताणाखाली वावरत असतात. अभ्यासाचा ताण असतोच; शिवाय गाण्याची, नृत्याची... कुठल्या कुठल्या स्पर्धांमध्ये या मुलांना आई-वडील आपल्या हट्टासाठी उतरवतात, त्या जीवघेण्या स्पर्धेत अपयशी ठरणाऱ्या मुली-मुले खचतात. त्यांना सावरायला खंबीर मन असणारं, त्यांना समजून घेणारं कोणीतरी हवे. संसारात निराश-उदास झालेल्या प्रापंचिकांना आम्ही दोघे मन मोकळे करण्याची दिलाशाची एक जागा वाटतो. तरुणांना आम्हाला त्यांच्या मनातले सांगावेसे वाटते. आजच्या तरुणांच्या समस्या मागल्या पिढीतील तरुण-तरुणींपेक्षा वेगळ्या आहेत. त्यांचे प्रश्न वेगळे आहेत. आम्ही समुपदेशक नाही. मानसशास्त्रज्ञ नाही. आम्ही यापैकी कोणीच नाही. आम्ही आहोत सामान्य माणसं. माणूस समजून घेण्याचा प्रयत्न करणारी सामान्य माणसं... ●●

ज्योती पुजारी

निमीत्त...
**अभिजित वर्तक**



# भारताची फाळणी आणि त्याचे भीषण परिणाम

**येत्या १५ ऑगस्ट रोजी भारतीय स्वातंत्र्याला ७७ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त...**

### जातीय दंगली आणि दूरदृष्टीचा अभाव

लॉर्ड माउंटबॅटन यांचे माध्यम सल्लागार राहिलेल्या ॲलन कॅम्पबेल जोहान्सन यांनी 'मिशन विथ माउंटबॅटन' नावाचे पुस्तक लिहिले होते. या पुस्तकात त्यांनी १ जून १९४७ रोजी आपल्या आईला एक पत्र लिहिल्याचा उल्लेख केला आहे. 'येथे (तत्कालीन अखंड हिंदुस्थान) आम्ही महत्त्वाच्या घटनांच्या उंबरठ्यावर उभे आहोत आणि माउंटबॅटनच्या सत्ता हस्तांतरणाच्या ऐतिहासिक घोषणेच्या प्रचार व्यवस्थेला अंतिम रूप देण्याच्या कामात सतत मग्न आहोत.

वातावरण अतिशय तणावपूर्ण आहे आणि जर निकाल फाळणीच्या बाजूने आलातो निश्चित आहे. तर मोठ्या प्रमाणात जातीय दंगली होऊ शकतात', असे ॲलन जोहान्सन यांनी आपल्या पत्रात स्पष्टपणे नमूद केले होते. त्यांनी पुढे लिहिले, 'संताप अंतरिम आणि परस्पर आहे. ब्रिटिश आज हिंदू आणि मुस्लिम दोघांमध्ये जेवढे लोकप्रिय आहेत तेवढे पूर्वी कधीच नव्हते, हे लक्षात घेण्यासारखे आहे.' यानंतर जवाहरलाल नेहरूंचा उल्लेख करीत त्यांनी लिहिले की, नेहरू म्हणतात की, मोहम्मद अली जिना यांना पाकिस्तान देऊन ते त्यांच्यापासून आपली सुटका करून घेतील. ते म्हणायचे, मस्तक कापून घेऊन आम्ही डोकेदुखीपासून कायमची सुटका करून घेऊ. त्यांचा हा दृष्टिकोन दूरदृष्टीचा वाटत होता. कारण एकामागून एक मागण्या मान्य केल्याने जिना यांची भूक अधिकाधिक वाढतच होती. या पत्रातून चार बाबी समोर येतात. १. स्वातंत्र्य आणि सत्तेचे हस्तांतरण यात काय फरक होता, इंग्रज याला सत्ता हस्तांतरण का म्हणत होते? २. फाळणीच्या आधीपासून प्रत्येकाला याची कल्पना होती की, मोठ्या प्रमाणात जातीय दंगली होऊ शकतात. मात्र, तरीही त्या रोखण्यासाठी प्रयत्न का झाले नाहीत? ३. ज्या स्वातंत्र्यासाठी हजारो क्रांतिकारकांनी सर्वस्व अर्पण केले, बलिदान दिले आणि तुरुंगात गेले, त्या स्वातंत्र्यासाठी काँग्रेस आणि मुस्लिम लीगचे नेते १९४७ मध्ये इंग्रजांचे मित्र बनले? ४. जवाहरलाल नेहरूंसाठी फाळणी हा एक खेळ होता का? त्यांनी फक्त जिनांपासून सुटका करवून घेण्यासाठी अर्थात जिनांची कटकट कायमची मिटविण्यासाठी देशाची फाळणी केली? जातीय दंगलीच्या माध्यमातून माणसातील पशुवृत्ती जागी होऊन सर्वत्र भयानक हिंसाचार सुरू होता. मृतदेहांचा सर्वत्र खच पडला होता. 'विभाजन-गरिबी और शानशौकत' या पुस्तकात त्याच काळातील एक प्रसंग नमूद केला आहे. खरे तर त्या काळात व्हाईसरॉय भवनात म्हणजे आजच्या राष्ट्रपती भवनात बैठकांचे सत्र सातत्याने सुरू होते; ज्यामध्ये काँग्रेससह मुस्लिम लीगचे सर्व बडे नेते सामील होत होते. कॅम्पबेल-जोहान्सनच्या म्हणण्यानुसार, हे सर्व नेते अमेरिकन बनावटीच्या कारमधून बसून येत असत. ५. स्वातंत्र्याच्या नावाखाली महागड्या गाड्यांचा शौक कितपत न्याय्य आहे? वास्तविक हा काळ भारताच्या इतिहासातील सर्वात दारिद्र्याचा काळ होता. आपल्यापैकी किती जणांना माहीत आहे की, जवाहरलाल नेहरू सहसा रोल्स रॉयल्समधूनच प्रवास करीत असत. ही कार एलिझाबेथने माउंटबॅटन यांना भेट म्हणून दिली होती आणि माउंटबॅटन यांनी नेहरूंना.

### पंडित माउंटबॅटन की जय!

आता थेट १५ ऑगस्ट १९४७ च्या दिवसाकडे येऊ. या दिवशी भारतात स्वातंत्र्य दिन साजरा केला जात होता. ॲलन कॅम्पबेल-जोहान्सन लिहितात की, त्या दिवशी दिल्लीच्या रस्त्यावर 'जय हिंद', 'माऊंटबॅटन की जय' आणि 'पंडित माउंटबॅटन की जय'च्या घोषणा दिल्या जात होत्या. ६. या दिवशी, भारत निश्चितपणे आपले स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करीत होता. परंतु, देशाचा एक मोठा भाग विस्थापन आणि भीषण फाळणीचा सामना करीत होता. असे असूनही या अमानुष क्रौर्याला जबाबदार असलेल्यांच्या बाजूने घोषणा देणारे लोक कोण होते? ते काँग्रेसचे लोक होते का?

### भयावह फाळणी

स्वातंत्र्यानंतर पाच दिवसांनी म्हणजे २० ऑगस्ट रोजी, ॲलन कॅम्पबेल-जोहान्सन यांनी त्यांच्या पुस्तकात लिहिले की, दोन लाख लोक तात्पुरत्या विस्थापित छावण्यांमध्ये अडकले होते आणि अशा परिस्थितीत राहत होते की, मोठ्या प्रमाणावर कॉलराचा उद्रेक कधीही होऊ शकतो. भारताच्या या धर्मावर आधारित फाळणीने मानवी इतिहासातील सर्वात मोठी विस्थापन परिस्थिती निर्माण केली होती. १९४१ च्या जनगणनेत, अविभाजित पंजाबची लोकसंख्या ३४,३०९,८६१ होती आणि बंगालची एकूण लोकसंख्या ६१,४६०,३७७ होती. भारताच्या फाळणीचा सर्वाधिक फटका याच दोन प्रांतांना प्रचंड प्रमाणात बसला. त्या काळात एका रात्रीत सुमारे १० कोटी लोकांचे सामान्य जीवन अडचणीत आले. ॲलन कॅम्पबेल-जोहान्सन लिहितात की, २१ सप्टेंबर १९४७ रोजी सकाळी गव्हर्नर जनरलच्या डकोटा विमानाने लॉर्ड माउंटबॅटन, इस्में, व्हर्नन, ॲलन कॅम्पबेल.

-जोहान्सन (स्वतः लेखक), नेहरू, पटेल, नियोगी, राजकुमारी अमृत कौर, जनरल लॉकहार्ट, एच. एम. पटेल आणि व्ही. शंकर यांनी पूर्व आणि पश्चिम पंजाबचा दौरा केला.

- भयंकर उलथापालथीचा पहिला अनुभव या मंडळींना भटिंडा गाठल्यावर आला. ते मोठे रेल्वे स्टेशन आहे. माणसांनी खचाखच भरलेल्या दोन गाड्या स्टेशनवर उभ्या होत्या. काही निर्वासित डब्यांच्या छतावर होते, काही खिडक्या आणि पायऱ्यांवर (फूटबोर्ड) लटकले होते आणि काही तर थेट इंजिनवर चढले होते.

- फिरोजपूरला पोहोचल्यावर पुन्हा विस्थापितांनी खचाखच भरलेल्या गाड्या या मंडळींना दिसल्या.

- रावीला पोहोचल्यावर, लोक-समुदायाच्या या भयंकर उन्मादाचे अक्राळविक्राळ दृश्य आमच्या निदर्शनास आले. आम्ही जे पाहत होतो ते मानवी इतिहासातील सर्वात मोठे निष्कासन होते.

- निर्वासितांच्या पहिल्या ताफ्याची झलक या चमूने फिरोजपूर येथे पाहिली. त्याचा पाठलाग करीत हे लोक विमानाने रावी नदीच्या पलीकडे खूप दूरपर्यंत गेले. विस्थापितांच्या या प्रवाहाबरोबर ते सुमारे ५० मैलपर्यंत पुढे गेले; पण त्याचा अंत सापडला नाही.

- लायलपूर-लाहोर रस्त्यावर मुसलमान विस्थापितांचा ताफा संथगतीने जाताना दिसला. ताफ्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत उड्डाण करण्यासाठी या मंडळींना १५ मिनिटांपेक्षा जास्त वेळ लागला. तर लेखकाच्या मते, त्याच्या विमानाचा वेग ताशी १८० मैल इतका होता. अशा प्रकारे हा ताफा अर्थात काफिला किमान ४५ मैल लांब असावा. हे विस्थापनाचे अधिकृत सर्वेक्षण होते. त्यामुळे ते महत्त्वाचे आहे असे नसून त्या काळाची परिस्थिती किती भीषण असेल, याचा अंदाज घेता येतो. सर्वप्रथम, हे लक्षात घ्यावे लागेल की, ही भेट २१ सप्टेंबर रोजी झाली, म्हणजे फाळणीनंतर ३८ दिवसांनी. यावरून फाळणीच्या जखमा काही दिवस नव्हे तर महिनोन्महिने भळभळत होत्या, याचा अंदाज करता येतो. ७. या भीषण फाळणीच्या इतक्या दिवसांनंतर हवाई सर्वेक्षण का करण्यात आले? फाळणीपूर्वी आणि त्यानंतर ब्रिटिशांसोबत रात्रीचे जेवण, दुपारचे भोजन आणि सकाळच्या न्याहारीत कोण कोण सहभागी होते? फाळणीची शोकांतिका थांबवता आली असती का? याचे उत्तर शोधण्यासाठी आपल्याला २० फेब्रुवारी १९४७ रोजी ब्रिटिश हाऊस ऑफ कॉमन्स येथे झालेली चर्चा पाहावी लागेल. खरे तर त्या दिवशी ब्रिटिश पंतप्रधान क्लेमंट ॲटली यांनी जून १९४८ पूर्वी हिंदुस्थान सरकारकडे सत्ता सोपविली जाईल, असे सांगितले. या कार्यासाठी त्यांनी माउंटबॅटन यांची निवड केली. त्यांनी त्याच दिवशी सभागृहात सांगितले की, वॅव्हेल (तत्कालीन गव्हर्नर) राजीनामा देतील आणि त्यांच्या स्थानी माउंटबॅटन येतील. या संदर्भात आणखी एक पुस्तक उपलब्ध आहे. त्याचे नाव आहे 'द लास्ट डेज ऑफ द ब्रिटिश राज.' या पुस्तकाचे लेखक आहेत लियोनार्ड मोसली. ते ब्रिटिश पत्रकार आणि इतिहासकार होते. त्यांनी सुमारे ३१ पुस्तके लिहिली होती. ते लिहितात, "Mountbatten believed in driving things through, by short cuts if there were any. He approached the problem of Indian independence by June 1948 rather in the manner of a time-and-motion-study expert who has been called into a factory to knock off the wasteful minutes and get out the product before the target date." खरं तर, माउंटबॅटन सतत घाई करणारे व्यक्ती होते आणि आपला वेळ वाया जाऊ नये, याची त्यांना जास्त काळजी होती. या कारणास्तव, भारताच्या फाळणीला आणि त्याच्या शोकांतिकेला माउंटबॅटन सर्वात जास्त जबाबदार होते. मोसेलीने आपल्या पुस्तकात एक किस्सा सांगितला आहे. माउंटबॅटनच्या नावाची घोषणा झाल्यावर सरदार पटेलांनी आपल्या माणसांकडून अहवाल मागवला. तेव्हा त्यांना कळले की, माउंटबॅटन हे क्रांतीकडे ओढा असलेले उदारमतवादी कुलीन होते, असे नोंदवले गेले. सरदार पटेलांची प्रतिक्रिया होती. जवाहरलालजींना एक खेळणे मिळून जाईल, तोपर्यंत आम्ही क्रांतीची व्यवस्था करू. इंग्रजांनी भारत सोडण्याची तारीख १ जून १९४८ हीच का ठरवली? त्यासाठी भारतीय नेत्यांना आणि जनतेला विचारण्यात आले होते का? तर, त्याचे उत्तर 'नाही' असे आहे. मोसली लिहितात की, ही तारीख ब्रिटिश पंतप्रधान ॲटली यांनी नाही तर माउंटबॅटन यांनी ठरवली होती, तीही त्यांच्या वैयक्तिक योजनेनुसार. तेव्हा प्रश्न असा आहे की, ती वैयक्तिक योजना काय होती? याचे उत्तर आपल्याला ॲलन कॅम्पबेल-जोहान्सन यांच्या 'मिशन विथ माउंटबॅटन'मध्ये मिळते. या पुस्तकानुसार, ॲटली यांनी डिसेंबर १९४६ मध्ये माउंटबॅटन यांना भेटीसाठी बोलावले होते आणि त्यांना वेव्हेल यांच्याजागी पुढील व्हाईसरॉय म्हणून येण्यासाठी आमंत्रित केले. तेव्हा माउंटबॅटन यांना ब्रिटिश नौदलात सामील व्हायचे होते. त्यांना प्रथम क्रूझर स्क्वॉड्रनची कमान म्हणून रियर ॲडमिरल बनायचे होते. त्यामुळेच सुरुवातीला माउंटबॅटन व्हाईसरॉय होण्यास तयार नव्हते. माउंटबॅटनच्या या वैयक्तिक इच्छेच्या मार्गात ॲटली आले. मोसली लिहितात की, ॲटली यांनी माउंटबॅटनची समजूत काढली आणि पुढील दोन वर्षांत भारताकडे सत्ता सोपवली जाईल व भारताला स्वातंत्र्य सोपविल्यानंतर ते नौदलात सामील होऊ शकतात, असे त्यांना सांगितले. यावर माउंटबॅटन उत्तरले की, दोन वर्षे नौदलापासून दूर राहणे खूप जास्त होईल.

पंतप्रधान ॲटली यांनी विचारले की, नौदलात त्यांची स्थिती, प्रगती क्रम आणि संधी सुरक्षित असल्यास ते किती काळ सेवा करू शकतात. माउंटबॅटन यांनी या संदर्भात वेळ मागितला आणि आपल्या मित्रांसह राजाला भेटले. दुसऱ्या दिवशी माउंटबॅटन पुन्हा पंतप्रधान ॲटली यांना भेटले आणि सांगितले की, ते आपण हे काम १२ महिन्यांत पूर्ण करू. त्यानुसार मार्च १९४७ मध्ये माउंटबॅटन भारतात आले आणि त्यांनी पुढील पाच महिन्यांत भारतातील सत्तेचे हस्तांतरणाचे काम पूर्ण केले. मोसली लिहितात की, माउंटबॅटनसोबत आलेल्या इस्मे यांना माउंटबॅटनला असलेल्या घाईची पूर्ण माहिती होती. चर्चिलने त्यांना सांगितले की, तू जाऊन मूर्खपणा करशील. तुला काहीही मिळणार नाही. माउंटबॅटन रँक आणि पदवीसाठी भारतात जाणार आहेत. हे लोक भारताला स्वातंत्र्य देत नव्हते तर भारतातून स्वत:ची सुटका करून घेत होते. ज्याची किंमत फाळणी आणि जातीय दंगलींसह मानवी इतिहासातील सर्वात मोठ्या नरसंहाराच्या रूपात चुकवावी लागली. ८. वेव्हेलऐवजी माउंटबॅटनसारख्या उतावळ्या व्यक्तीला का पाठविण्यात आले? त्यांच्याकडे वेळ नव्हता आणि ते कदाचित या कामासाठी योग्य व्यक्तीही नव्हती. त्यामुळे त्या इंग्रजांचे कारस्थान आणि गुपिते उघड करावीच लागतील.

---

विशेष
**अनंत सरदेशमुख**
अर्थकारणाचे अभ्यासक

# अर्थसंकल्पोत्तर बोलके उद्योगचित्र

**गेल्या काही वर्षांचा आढावा घेता केंद्र सरकार उद्योग आणि पायाभूत सुविधा क्षेत्रामध्ये भरीव आर्थिक तरतूद करताना दिसत आहे. याचे सकारात्मक परिणामही दिसत आहेत. उद्योग क्षेत्राच्या वाढीसाठी भरभक्कम तरतुदी करणारे हे सरकार रेल्वे, उड्डाणपूल, बंदरे, भूमिगत मार्ग, पूल, महामार्ग, खास मालवाहतुकीसाठी उभारले जाणारे विशेष कॉरिडॉर या सर्वांच्या माध्यमातून पायाभूत सुविधांवर विशेष भर देत आहे.**



देशातील उद्योग क्षेत्र बहरण्यासाठी उत्तम पायाभूत सुविधांची आवश्यकता असते. गेल्या काही वर्षांचा आढावा घेता केंद्र सरकार या क्षेत्रामध्ये भरीव आर्थिक तरतूद करताना दिसत आहे. अर्थातच याचे सकारात्मक परिणामही बघायला मिळत आहेत. आता एनडीए सरकारची तिसरी खेळी सुरू झाल्यानंतरही हाच मानस स्पष्टपणे समोर येत आहे. उद्योग क्षेत्राच्या वाढीसाठी भरभक्कम तरतुदी करणारे हे सरकार रेल्वे, उड्डाणपूल, बंदरे, भूमिगत मार्ग, पूल, महामार्ग, खास मालवाहतुकीसाठी उभारले जाणारे विशेष कॉरिडॉर या योजनांच्या माध्यमातून पायाभूत सुविधांकडे लक्ष देत आहे. त्यामुळे त्यावर अवलंबून असणाऱ्या अनेक उद्योग व्यवसायांनाही चालना मिळेल.

सरकारने जाहीर केलेल्या रोजगार निर्मितीला मदत करणाऱ्या काही योजनाही येत्या काळात उद्योगविश्वामध्ये महत्त्वपूर्ण बदल घडवून आणू शकतात. कारण त्या लोकांची कार्यशक्तीही वाढवणाऱ्या आहेत. परिणामस्वरूप येत्या काळात वेगवेगळ्या उत्पादनांच्या मागणीमध्ये वाढ झाल्यास उद्योगांची अवस्था सुधारलेली बघायला मिळेल. या आर्थिक वर्षात पायाभूत सुविधांवर जवळपास ११ कोटी रुपये खर्च होणार आहेत. हमरस्त्यांसाठी २.७८ लाख कोटी तर रेल्वेसाठी ३.५५ लाख कोटी इतका खर्च होणार आहे.

या सर्व वाढीव खर्चाचा उद्योगविश्वाला फायदा होणार आहे. पंतप्रधान गतिशक्ती प्रकल्पांतर्गत विस्तारण्यात येणारे रेल्वेचे इकॉनॉमिक कॉरिडोअरही मालाची वाहतूक वेगाने होण्यास मदत करतील. त्याचबरोबर खर्च कमी झाल्याने उद्योगविश्वालाही फायदा मिळेल. अर्थसंकल्पोत्तर अर्थचित्रानुसार स्टील, सिमेंट, विविध प्रकारची यंत्रसामग्री उत्पादित करणाऱ्या प्रकल्पांना चालना देण्याचे काम यापुढील काळात अपेक्षित आहे. ही बाबही त्या त्या उद्योगांमध्ये भरीव बदल घडवून आणू शकते. यातून रोजगार निर्मितीही होणार असल्यामुळे उद्योगांना आवश्यकतेप्रमाणे मनुष्यबळ उपलब्ध होण्यास मदत होईल. साहजिकच मागणीनुसार पुरवठा झाल्यास उद्योगविश्व आश्वस्त होईल.

या अर्थसंकल्पात सरकारने उर्जेसाठी बराच मोठा निधी राखीव ठेवला आहे. शाश्वत उर्जेसाठी सौर उर्जा प्रकल्पांना घरगुती ग्राहक तसेच व्यावसायिक या दोन्ही पातळ्यांवर चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण योजना आणि सवलती जाहीर केल्या आहेत. त्यामुळेच या क्षेत्रातील उद्योगांना (टाटा पॉवर, अडाणी ग्रुपच्या पॉवर कंपन्या) मोठी मदत मिळेल. खेरीज या क्षेत्रातील उदा. हायड्रोपॉवरसारख्या प्रकारात काम करणाऱ्या सरकारी कंपन्यांची कामगिरी उंचावण्यासाठी या निधीची मोठी मदत होईल. येत्या आर्थिक वर्षांसाठी सरकारने इलेक्ट्रॉनिक क्षेत्रासाठी मोठा निधी राखीव ठेवला आहे.

केबल तयार करणाऱ्या वा यासारखे अन्य साहित्य निर्माण करणाऱ्या कंपन्यांना याचा लाभ मिळू शकतो. या निधीमुळे कंपन्यांच्या अंतर्गत वापरासाठी उत्पादित होणारी सामग्री कमी खर्चात निर्माण होऊ शकते. मोबाईल निर्मितीवरील ड्युटी कमी केल्याने देशात उत्पादित होणाऱ्या वा इथे जोडणी होऊन निर्यात होणाऱ्या मोबाईल उद्योगालाही चालना मिळण्याची शक्यता आहे. आजही मोबाईलसाठी लागणारे बरेचसे सामान बाहेरच्या देशातून आयात केले जाते. बदलत्या धोरणानुसार ते देशातच तयार होऊ लागले, तर आयात खर्चात बचत होऊन उद्योगांच्या नफ्यात वाढ होईल.

अगदी चार्जर, केबल यासारखे घटकही कमी खर्चात आणि देशांतर्गत निर्मित झाले तरी मोबाईलच्या किमती कमी होतील. उत्पादकांप्रमाणेच इलेक्ट्रॉनिक साहित्याची किरकोळ विक्री करणाऱ्यांनादेखील याचा लाभ मिळू शकतो. अलिकडेच कर्करोग आणि त्यासारख्या गंभीर आजारांवरील काही औषधे स्वस्त करण्यात आली. त्यामुळे अशा औषधांचे उत्पादन करणाऱ्या तसेच त्याचा वापर करणाऱ्यांना मोठा लाभ मिळू शकेल. थोडक्यात, यामुळे हेल्थ केअर क्षेत्राला मदत मिळेल असे म्हणावे लागेल. सरकारने जाहीर केलेल्या काही योजनांमध्ये आर्थिक कंपन्या, बँका, इन्शुरन्स कंपन्यांना लाभदायक ठरतील, अशा काही तरतुदी करण्यात आल्या आहेत.

भांडवली खर्च वाढवल्यामुळे या आर्थिक सेवांची मागणी १० ते १५ टक्क्यांपर्यंत वाढू शकते. अर्थातच या क्षेत्रातील कंपन्यांना त्याचा फायदा होऊ शकतो. आजच्या घडीला देशात सर्वात महत्त्वाचा ठरत असलेला उद्योग म्हणजे वाहन उद्योग. या उद्योगाला चालना देणारे काही मुद्दे विचारात घेण्याजोगे आहेत. जीएसटीचा मुद्दा बजेटमध्ये धरला जात नाही. परंतु, जीएसटीसारखा एखादा समान कायदा लागू करून कमीत कमी टॅक्सची आकारणी व्हावी, अशी मागणी वाहन उद्योगाकडून करण्यात येत होती.

इलेक्ट्रिक वाहनांची वाढती मागणी लक्षात घेता त्यांची किंमत सर्वसामान्यांना परवडण्याजोगी ठेवली तर अधिक फायद्याचे ठरू शकते. येत्या सहा महिन्यांमध्ये जीएसटीसंदर्भात नव्याने विचार करण्याचाही प्रयत्न केला पाहिजे. तसे झाल्यास वाहन उद्योगाला नक्कीच फायदा होऊ शकतो. अलिकडच्या काळात आयकराचा मुद्दा चांगला चर्चेत राहिला. आयकराची मानक वजावट काही अंशी कमी करण्यात आल्याचे स्वागत होत आहे. सोने, चांदीवरील ड्युटी कमी केल्यामुळे सोन्या-चांदीच्या निर्यातीत वाढ होऊ शकते. परिणामी, नफा वाढण्यास मदत होईल. त्याच बरोबरीने सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना आवश्यक ती यंत्रसामग्री घेण्यासाठी जास्तीचे कर्ज उपलब्ध करून देणाऱ्या योजनांचा विचार अर्थसंकल्पात करण्यात आला. त्यासाठी सरकारी हमी योजनेचा विचार केलेला दिसतो. या योजनेंतर्गत वरील उद्योगांना कोणतेही तारण न ठेवता कर्ज मिळू शकेल, अशीही तरतूद करण्यात आली आहे. ही योजना सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना फायदेशीर ठरू शकते.

सरकार रोजगार निर्मिताच्या संदर्भातही काही मुद्यांवर काम करत आहे. त्यामध्ये कर्मचाऱ्यांच्या प्रॉव्हिडंट फंडामध्ये सरकार काही प्रमाणामध्ये वाढ करणार असल्याचे लक्षात येते. परिणामी, रोजगार निर्मितीमध्ये लक्षणीय वाढ होऊ शकते. या योजनेचा पहिल्यांदाच फायदा घेत असणाऱ्यांना सरकारकडून १० हजारांपर्यंतची मदत करण्यात येणार आहे. छोट्या उद्योगांना याचा फायदा होणार असल्याचे दिसून येते.

सुमारे चार वर्षांपर्यंत कंपन्यांना याचा लाभ घेता येणार आहे. जवळपास ३० लाख नोकरदारांना याचा फायदा होणार आहे. पुढच्या पाच वर्षांमध्ये कौशल्य विकासासाठी परिपूर्ण असलेली सुमारे एक हजार ट्रेनिंग सेंटर उभारण्याचा सरकारचा मानस आहे. २० लाख तरुणांना या सेंटर्समधून प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षण घेण्यासाठी लागणारा पैसा किंवा कर्ज यासाठीची मदतदेखील केली जाणार आहे.

कौशल्य विकास ट्रेनिंग सेंटर्स उभारून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना त्याचा कसा लाभ घेता येईल, हे पाहणे आता महत्त्वाचे ठरेल. त्याचबरोबर १२ नवीन इंडस्ट्रियल पार्क अर्थात औद्योगिक वसाहती उभ्या करण्याचे ध्येय समोर ठेवण्यात आले आहे. यासाठी लागणाऱ्या वीज, पाणी यासारख्या पायाभूत सुविधांची तरतूद आधीच करून ठेवण्यात येणार आहे. नवीन ठिकाणी उद्योग सुरू करणाऱ्यांना या औद्योगिक वसाहतींचा फायदा होऊ शकतो. यामुळे उद्योजकांचा खर्च आणि वेळ वाचू शकेल. बरेचदा उद्योगांच्या ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांच्या वास्तव्याचा प्रश्न उद्भवतो. हे लक्षात घेता सरकार औद्योगिक कामगारांसाठी सर्व सोयी-सुविधा असणारी घरेही उपलब्ध करून देण्याचे सूचित करत आहे. ही घरे कामगारांना भाडेतत्त्वावर मिळणार आहेत. यासाठीही सरकार मदत करणार आहे. याचा फायदा उद्योगविश्वाला होणार आहे. पण याखेरीजही उद्योगविश्वाच्या बऱ्याच समस्यांवर सरकारला तोडगा काढावा लागणार आहे. मुख्य म्हणजे सरकार राबवू पाहात असणाऱ्या सर्व योजनांच्या अंमलबजावणीला कशी आणि कशी सुरुवात होते आहे, हे बघावे लागेल. कारण केवळ सुधारणांची अपेक्षा व्यक्त करून वा निधी राखीव ठेवून काही साधत नाही. त्याची त्वरित अंमलबजावणी आणि प्रयत्नांमध्ये सातत्य राहिले तरच अपेक्षित परिणाम समोर येतात. यादृष्टीने येता काळ योग्य प्रकारे कारणी लावणे गरजेचे ठरेल.